Impact Factor-7.675 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

Peer-Reviewed & Refereed Indexed

Multidisciplinary International Research Journal

July -2021

ISSUE No- (CCXCIX) 299

# आधुनिक महाराष्ट्राच्या निर्मितीत यशवंतराव चव्हाण यांचे योगदान



Chief Editor
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

Executive Editor
Dr. D. B. Tanduljekar
I/C Principal
Yeshwantrao Chavan College,
Ambejogai, Dist.- Beed

Editor
Dr. Anant Dadarao Markale
Head, Dept. of Hist.
Yeshwantrao Chavan College,
Ambejogai, Dist.- Beed

This Journal is indexed in :
Scientific Journal Impact Factor (SJIF)
Cosmos Impact Factor (CIF)
International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

| | | |
|---|---|---|
| ~~40~~ | ~~यशवंतराव चव्हाण : शैक्षणिक आणि सामाजिक योगदान प्रा. डॉ. संजय सुरेवाड~~ | ~~150~~ |
| 41 | यशवंतराव चव्हाण यांचे शिक्षणविषयक कार्य प्रा.डॉ. अमोल गंगणे | 153 |
| 42 | आधुनिक महाराष्ट्राच्या निर्मितीत यशवंतराव चव्हाण यांचे योगदान रमेश गोवर्धन जाधव | 156 |
| 43 | समृध्द महाराष्ट्राच्या शैक्षणिक जडणघडणीत यशवंतराव चव्हाण यांच्या योगदानाचा अभ्यास वैशाली रामकृष्ण सारणीकर /प्राचार्य डॉ. विजय गोरोबा सरपे | 158 |
| 44 | यशवंतराव चव्हाण: एक थोर साहित्यिक श्री काचगुंडे हनुमंत महादेव /प्रा. डॉ. दिलीप भिसे | 161 |
| 45 | आधुनिक महाराष्ट्राच्या निर्मितीत यशवंतराव चव्हाण यांचे योगदान परमेश्वर ज्ञानोबा रूपनर | 164 |
| 46 | अष्टपैलू यशवंतराव चव्हाण श्रीकांत दीनकरराव तांदळे | 167 |
| 47 | Krushnakath: The Inspiring Autobiography of Sensitive Politician Yeshwantrao Chavan. Dr. M. S. Rajpankhe | 171 |
| 48 | Hon. Shri. Yashwantrao Chavan's Educational Thoughts and Works Dr. Sabale Shashikant Gokul, | 174 |

# यशवंतराव चव्हाण : शैक्षणिक आणि सामाजिक योगदान

प्रा. डॉ. संजय शुरेवाड
सहा. प्राध्यापक व विभाग प्रमुख,समाजशास्त्र विभाग,यशवंतराव चव्हाण महाविद्यालय,
अंबाजोगाई, जि. बीड.

आधुनिक महाराष्ट्र अनेक व्यक्तींनी घडविला. आपापल्या व्यक्तिमत्वाची मुद्रा अनेकांनी महाराष्ट्रावर उमटवली, पण स्वातंत्र्यानंतरच्या पहिल्या दोन-तीन दशकात ज्यांनी राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, कृषी, सहकार, औद्योगिकीरण आणि यांच्याबरोबर साहित्य, संस्कृती, कला, क्रिडा आणि संगीत अशा मानवी जीवनाच्या सर्व अंगाच्या विकासाला स्पर्श करून, त्याचा कायापालट करण्याचे कार्य दूरदृष्टी ठेवून, समाजातील सर्वाधिक मागासलेल्या घटकाला विकासप्रवाहात आणण्याच्या कार्याचा प्रारंभ यशवंतराव चव्हाण यांनीच केला व नव्या महाराष्ट्र राज्याला पुरोगामी- प्रगतिशिल महाराष्ट्र राज्य अशी उपाधी मिळवून दिली आणि सर्व क्षेत्रात विकासाचा पाया रचला. तेव्हापासून आजपर्यंत महाराष्ट्र राज्य त्यांनी दाखवून दिलेल्या मार्गावरून आपली वाटचाल करीत आहे. म्हणूनच आपण यशवंतराव चव्हाण यांना आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार म्हणून आदराने संबोधले जाते त्यांचा जन्म १२ मार्च १९१४ रोजी देवराष्ट्र (आजोळी) ता. खानापूर जि. सांगली येथे झाला. कऱ्हाड येथे प्राथमिक शिक्षण घेतल्यानंतर इतिहास व अर्थशास्त्र घेउन बी.ए. पदवी प्राप्त केली. त्यानंतर वकिलीची परीक्षा त्यांनी उत्तमरीतीने पास केली.

महाराष्ट्र राज्य लोकशाही समाजवादाची प्रयोगशाळा व्हावी म्हणून प्रयत्नाची पराकाष्ठा केली. केव्हाही प्रयोगशाळा, मूलतः संशोधनाची व ज्ञाननिर्मितीची प्रयोगशाळा असते. तिचा पाया घालण्याचे व त्या पायावर इमारत उभी करण्याचे कार्य शिक्षणाला करावे लागते हे ओळखण्याराची दृष्टी यशवंतराव चव्हाणांना लाभली होती. इतिहासाचा एक जिज्ञासू, अभ्यास व सृजनशील विचारांनी भारलेला एक द्रष्टा नेता व प्रशासक होण्याचे भाग्य लाभल्यामुळे शिक्षणाची अनिवार्यता त्यांनी लक्षात घेतली.

महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाचा प्रारंभ त्यांनी शिक्षण प्रसाराच्या कार्यापासून केला. साधने कमी असतानाही निर्माण करणाऱ्या हातांना त्यांनी बळ दिले. कारण शिक्षणप्रसाराची व समाजसुधारणेची महात्मा फुले यांनी सुरू केलेली परंपरा व ते स्वतः कर्मवीर भाउराव पाटील यांच्यासोबत रयत शिक्षण संस्थेत कार्यही करीत होते. म्हणून प्राथमिक ते विद्यापीठ्य शिक्षणापर्यंत ई.बी.सी. सवलत त्यांनी सुरू केली आणि त्यामुळे महाराष्ट्रातील शेतकरी, शेतमजूर सामान्य माणसू तसेच मागासवर्गीयासाठी शैक्षणिक सवलती, शिष्यवृत्ती सुरू केल्यामुळे शिक्षणद्वारे प्रगतीची द्वारे सर्वांसाठी खुली झाली. २५ ऑगस्ट १९६० रोजी विधानसभेत लोकशाही नियोजन या विषयावर महत्त्वपूर्ण विचार मांडताना त्यांनी शिक्षणाबाबत आपले विचार स्पष्ट केले. माध्यमिक शिक्षणात व्यावसायिक शिक्षणावर विशेष भर देण्यात आला.हुशार विदयार्थ्यांना शिक्षणाच्या बाबतीत कोणत्याही प्रकारे अडचणी येउ नये म्हणून शिष्यवृत्तीव्दारे साहय करण्यात येईल अशी भूमिका घेतली. या धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी इ.बी.सी. ची सवलत जाहीर केली. महाराष्ट्र राज्याचे स्वतंत्रपणे उचललेले हे पुरोगामी पाउल होते.

भारतीय राज्यघटनेतील वयाच्या चौदा वर्षापर्यंत सर्वांना सक्तीच्या व मोफत शिक्षणाच्या मार्गदर्शक तत्त्वांचा अंमल हा सर्व राज्यांच्या शैक्षणिक धोरणाचा अविभाज्य अंग ठरावा. प्रत्येक राष्ट्राच्या राजकीय अधिकाराचे , आर्थिक विकासाचे आणि सांस्कृतिक संपन्नतेचे दरवाजे उघडण्यात शिक्षणाचाच फार महत्त्वपूर्ण वाटा आहे. असे त्यांचे मत होते म्हणून त्यांनी प्राथमिक शिक्षणाबाबत यशवंतरावांनी समाजातील कोणतीही व्यक्ती शिक्षणापासून वंचित राहू नये यासाठी ठोस निर्णय घेतले ते खालील प्रमाणे,

१. गाव तेथे प्राथमिक शाळा.

२. मोफत व सक्तीचे शिक्षण देण्यात यावे.

३. प्राथमिक शाळेच्या स्वतंत्र इमारती बांधण्यात याव्यात.

४. प्राथमिक शिक्षकांना प्रशिक्षण देउन या शिक्षकाचे समाजातील स्थान, महत्त्व व दर्जा उंचावण्यास मदत होईल.

५. इंग्रजी शिक्षणाची सोय पाचवी इयत्तेपासून करण्यात यावी असे महत्त्वपूर्ण निर्णय घेतलेले आढळतात.

६. शाळा उघडण्याची परवानगी खाजगी संस्थानाही देण्यात आली. एवढेच नव्हे तर या संस्थाना सरकारी अनुदानावर मान्यता देउन आमुलाग्र बदल घडवून आणावा.

७. या धर्तीवर ७ मार्च १९६० रोजी पुणे येथे स्वतंत्र एस.एस. सी. बोर्डाची स्थापना केली

८. तांत्रिक शिक्षणाचीही सोय करण्यात आली.
९. औरंगाबाद व कराड तसेच नागपूर येथे अभियांत्रिक महाविदयालये सुरू करण्यात आली.
१०.सांगली, बार्शी, पंढरपूर, वेंगुर्ले, उरण, इस्लामपूर, वाई या ठिकाण कला, वाणिज्य व विज्ञान महाविदयालच सुरू करण्यात आली.
११.१९५९ मध्ये १४ शेतकी विदयालये स्थापन करण्यात आली
१२.२३ ऑगस्ट १९५८ रोजी मराठवाडा विदयापीठ, औरंगाबाद येथे स्थापन केले.
१३.१८ नोव्हेंबर १९६२ रोजी शिवाजी विदयापीठ, कोल्हापूर येथे स्थापन केले,त्याचे उदघाटन तत्कालीन राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या हस्ते करण्यात आले.
१४. गरीब विदयार्थ्यांना, मागासवर्गीयांना उच्चशिक्षणासाठी शिष्यवृत्तींची अंमलबजावणी करण्यात मान्यता दिली.
१५. आदिवासी मुला-मुलीना खास आश्रमशाळेची तरतूद करण्यात आली.

यशवंतराव चव्हाण यांनी आपल्या कार्यकाळात मागासवर्गीयांना शिष्यवृत्या देण्याचे धोरण आखले. शैक्षणिक प्रभाव मांडलेले विचार एकत्रित अभ्यासल्यास महाराष्ट्राचा शैक्षणिक जाहीरनामा चे स्वरूप प्राप्त होउ शकेल.लोकभाषा ही ज्ञानभाषा झाली पाहिजे हा मुददा अतिशय मूलगामी स्वरूपाच्या होता.शिक्षण हे संस्कृतीचे प्रवेशव्दार असते.शैक्षणिक क्षेत्रात सतत प्रयोगशाळा येत राहावी अशी त्यांची अपेक्षा होती.

खाजगी संस्थांना तंत्रनिकेतन व इंजिनियरींग कॉलेज काढण्याच्या निर्णयाची महाराष्ट्र शासनाची परवानगी हे क्रांतिकारक पाउल म्हणून यशवंतरावांनी स्वागत केले. विज्ञान व तंत्रज्ञानाच्या साहाय्याने भारताला सुजलाम सुफलाम करू असा त्यांचा विश्वास होता. उदयोगधंधाच्या विकासासाठी प्रशिक्षिण दयावे, कामगार प्रशिक्षित झाल्यास औदयोगिक विकासाला फायदा होईल. नव्या तंत्रच्या व यंत्राचा, उत्पादन पध्दतीचा वापर करण्यास प्रवृत्त होईल. उत्पादन क्षेत्रातील नवे तंत्रज्ञान प्राप्त कोशल्य संपादन केल्यास नवीन उन्नतीचा मार्ग कामगारास प्राप्त होईल. त्यातून दारिद्रयाचे प्रमाण कमी होउन रोजगाराच्या संधीत वाढ होईल.

शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे एक प्रभावी साधन आहे. यावर त्यांचा दृढ विश्वास होता. शेतीच्या शास्त्रीय पध्दतीने जर शेतकऱ्यांच्या मुलाला शिक्षण दिले तर नक्कीच महाराष्ट्राचा व पर्यायाने भारताचा कृषी क्षेत्रात होईल यावर त्याचा प्रचंड विश्वास होता. यासाठी त्यांनी आपल्या कार्यकाळात वेगवेगळया कृषी विदयापीठ व कृषी महाविदयालय, विदयालय स्थापनेवर त्यांनी भर दिला त्यातून विदयार्थ्यांनी शिक्षण घेउन महाराष्ट्राला कृषी क्षेत्रातस्वावलंबी बनविले.आणि पर्यायाने देशाचा विकास होत गेलेला दिसून येतो.

समाज परिवर्तनाची प्रक्रिया मूलभूत स्वरूपाची असते हे जाणून त्यांनी शेतकरी कामगार, श्रमजीवी समाजाला मार्गदर्शन केले. देशाचा विकास म्हणजे कोणत्याही एका भागाचा विकास नसून सर्वत्र सारखाच विकास आवश्यक आहे. राष्ट्राचे सामर्थ्य सर्वांत दुबळया घटकांनी निर्यंत्रित होत नसते. म्हणून विकास योजना आखताना अविकसित भागाचा प्रथम विचार व्हावा असा समतोल विकासचा पुरस्कार केला. एखादा भागाचा विकास करताना त्या प्रदेशाचे औदयोगिक स्थान, राजकारण, भाषा, संस्कृती यासारख्या घटकांचा विचार न करता विकास करावा.एखादा प्रदेश विकासात मागे पडत असेल तर त्या प्रदेशात उदयोगधंधाचे जाळे निर्माण करून औदयोगिक क्षेत्र वाढवावे.विकसित भागाबरोबर मागास भाग आणण्यासाठी सर्वसाधारण कालखंड निश्चित करावा.एखादा प्रदेश मागास असू शकतो, परंतु त्याला निसर्गाचे वरदान लाभलेले असते. तेव्हा असा नैसर्गिक साधन सामुग्रीची व मनुष्यबळाची विचार करून तेथील नियोजन करावे. ग्रामीण भागाचा मागासलेपणा दूर करण्यासाठी त्या भागात विकास कार्यायासाठी स्वयंप्रेरित शक्ती निर्माण करावी.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी फार वर्षे लावून धरलेली महार वतने नष्ट करण्याची मागणी हाती सत्ता येताच यशवंतराव पूर्ण केली. नवबौध्दांना सवलती देउ नयेत, असा एक मोठा प्रवाह भारतीय राजकारणात होता. परंतु यशवंतराव ठामपणे नवबौध्दांच्या बाजूने उभे राहिले आणि त्यांना सवलती मिळवून दिल्या यातूनच यशवंतरावाची दूरदृष्टी आणि पुरोगामित्व सिध्द होते. यशवंतरावांनी घालून दिलेला फुले, शाहू, आंबेडकर हा मंत्र कुणालाच सोडता आला नाही. कोणताच पक्ष फुले, शाहू, व आंबेडकराशिवाय पुढे जाउ शकत नाही.

यशवंतराव चव्हाण यांनी धर्म आणि जाती यात दुभंगलेल्या समाजामध्ये सामाजिक एकता निर्माण करण्याचे काम केलेले आहे. अस्पृश्य समाजाला या समाजव्यवस्थेत बळकट करण्यासाठी त्यांचे कार्य महत्वपूर्ण ठरते. मुख्यमंत्री असताना १९५८ मध्ये यशवंतरावांनी महार वतन ही पध्दत नाहीशी करण्याचा एक ऐतिहासिक निणर्य घेतला. १९१८-१९१९ मध्ये जी महार वतने नाहीशी करण्याचे कार्य केले होते ही संस्थापुरती मर्यादित होते. त्यांच्या कार्याला विशाल स्वरूप यशवंतरावांनी दिले होते

महाराष्ट्रातील समाज जातीनिरपेक्ष राहाव, सर्व जण एकत्रित मिळून मिसळून राहावेत, यासाठी दलित समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी जे प्रयत्न केले तशी त्यांची मते ओढण्यासाठी प्रामणिक प्रयत्नदेखील केलेले दिसून येतात. एवढेच नव्हे तर १ मे १९६० रोजी महाराष्ट्र स्थापनेच्या दिवशी यशवंतरावांनी ब्राम्हण समाजातील जळीत बब्रप्रकरणासंबधीची कर्जे माफ करण्याची घोषणा केली. यातून आपणासा सामाजिक एकता निर्माण करण्याचा प्रयत्न त्यांच्या अंगी होते हे दिसून येते. यातून अल्पसंख्याकांना एक प्रकारे दिलासा मिळाला हे तितकेच खरे

यशवंतरावांचे समाजप्रबोधन कार्य हे डोळस स्वरूपाचे होते. समाजामध्ये माणसाच्या अंगी सामाजिकता टिकविण्यासाठी समाजप्रबोधनाची गरज असते यांची जाणीव त्यांना होती. या धर्तीवरच यशवंतरावांनी साहित्यनिर्मितीकडे लक्ष घातले. साहित्य आणि संस्कृती या मंडळाची स्थापना केली.

१९६७ च्या जिल्हा परिषद निवडणुकाच्या निमित्ताने त्यांनी दलित व दलितेतर याच्यातील दरी कमी करण्याचा प्रयत्न केला. कॉंग्रेस व रिपब्लिकन यांच्यात युती करून त्यांनी जिल्हा परिषदेच्या निवडणुका लढविल्या हि खऱ्या अर्थान सामाजिक युतीच यशवंतरावी केली होती. उत्तम सुर्यवंशी यांनी संपादित केलेल्या यशवंतराव चव्हाण यांच्यावरील एका ग्रंथात एस.एम. जोशी या राजकारणतल्या जेष्ठ माणसाचा एक लेख आहे. त्यात यशवंतरावांच्या जातनिपेक्ष दृष्टीकोनाविषयी एस.एम. जोशी लिहितात, सर्व जातीजमातीच्या लोकांना बरोबर घेउन जाण्याची त्यांची मनोमन इच्छा होती.

यशवंतरावांविषयी आपल्या आठवणी सांगताना लक्ष्मण्न माने लिहितात, डॉ. बाबासाहेब आंबेडकराबदल तर त्यांनी अतिव प्रेम होते. बाबासाहेबांना ते फार मानत असते. एका चव्हाणसाहेब मला म्हणाले, ज्या स्वातंत्र्यासाठी डॉ. आंबेडकर संघर्ष करीत होते त्यांचे आकलन आम्हाला फार उशिरा झाले. लक्ष्माण खरे सांगायचे तर या राष्ट्राने डॉ. आंबेडकरांच्या प्रति आत्यंतिक आदर आणि कृतज्ञता व्यक्त केली पाहिजे. जोवर त्यांनी संविधान लिहिले नव्हते तोपर्यंत आम्ही सर्वजण त्यांना कॉंग्रेसचे विरोधक, गांधीचे विरोधक असे संबोधयाचे. त्यांच्या परिवर्तनाच्या अनेक चळवळीकडे, उपक्रमापुढे कॉंग्रेसचे लोक फारसे गंभीरपणे पहात नसत. त्यांना विरोधक समजत असत. पण भारतीय संविधानाची त्यांनी केलेली रचना पाहिल्यांवर हजारदा त्यांच्या पायावर नतमसत्क झाल पाहिजे, एवढे उपकार त्यांनी देशावर केले आहेत.

यशवंतराव चव्हाण यांची शिक्षण क्षेत्रात महत्वपूर्ण भूमिका बजावलेली दिसून येते. यशवंतरावानी शिक्षण क्षेत्राचा जो काही विकास केला त्यांची आस्था व भूमिकस किती व्यापक होती याचा आढावा आपणासा त्यांच्या शब्दातून जाणवतो. व ते म्हणतात, मी महाराष्ट्राचा मुख्यमंत्री होतो, केंद्रस्थानी संरक्षणमंत्री, गृहमंत्री, अर्थमंत्री आणि परराष्ट्रमंत्री या नात्याने प्रदीर्घ काळ काम करण्याची संधाी मला मिळाली, पण शिक्षणमंत्री होण्याची संधी मात्र कला मिळाली नाही.अशा सर्व बाबीचा विचार करताना असे दिसून येते, की आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक आणि शैक्षणिक क्षेत्रात आमूलाग्र बदल घडवूनद आणण्याचे कार्य त्यांनी केले आहे.

**संदर्भ ग्रंथ**

१. यशवंतराव चव्हाण गौरव ग्रंथ, स. लक्ष्मणशास्त्री जोशी, प्राज्ञ प्रकाशन, वाई (सातारा), १९६०.
२.यशवंतराव ते विलासराव, मधुकर भावे, मनोविकास प्रकाशन, पुणे, २००८.
३.यशवंतराव चव्हाण यांचे समाजकारण, रा.ना. चव्हाण प्रतिष्ठान, पुणे, २०१०.
४. यशवंतराव चव्हाण : नवमहाराष्ट्राचे शिल्पकार, सं. उत्तम कांबळे, सकाळ प्रकाशन, पुणे, २०१२.
५. यशवंतराव चव्हाण सुसंस्कृत नेतृत्वाचे घराणे, इंद्रजित भालेराव, साक्षात प्रकाशन, औरंगाबाद, २०१४.
६.आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतरा चव्हाण, संपा. प्रा. अशोक नाईकवाडे, औरंगाबाद, २००९
७. यशवंतराव चव्हाण, ना.धों.महानोर,साकेत प्रकाशन, औरंगाबाद, २००६.
८. सहयाद्री, आनंद पाटील, साकेत प्रकाशन, औरंगाबाद,२००८
९.महाराष्ट्राचे भाग्यविधाते यशवंतराव चव्हाण, संपादक डॉ. अशोक नाईकवाडे, विदयाभारती प्रकाशन, लातूर, २०१२.

Impact Factor-7.675 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

**Peer-Reviewed & Refereed Indexed**

**Multidisciplinary International Research Journal**

**October-2021**

ISSUE No- (CCCXXII) 322

## २१व्या शतकातील कोरोना महामारीच्या काळात सध्यस्थितीत निर्माण झालेल्या समकालीन सामाजिक समस्या



**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Executive Editor**
Dr. D. B. Tanduljekar
I/C Principal
Yeshwantrao Chavan College,
Ambejogai, Dist.- Beed

**Editor**
Dr. Sanjay Surewad
Head, Department of Sociology,
Yeshwantrao Chavan College,
Ambejogai, Dist.- Beed

**This Journal is indexed in :**
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

| | | |
|---|---|---|
| 19 | काया-स्पर्श : मनोविश्लेषण का साहित्यिक दस्तावेज **डॉ. रमेश माणिकराव शिंदे** | 67 |
| 20 | पुरुष केंद्रित अर्थनीति और भारतीय नारी **डॉ. अरविंद अंबादास घोडके** | 70 |
| 21 | उपन्यास में चित्रित प्रेम में असफल पुरूष पात्र ( विशेष संदर्भ : आना इस देश- कृष्णा अग्निहोत्री ) **शेख अली जाफर** | 72 |
| 22 | कोरोणा महामारी आणि भारतीय अर्थव्यवस्था **प्रो. डॉ. डी. बी. तांदुळजेकर** | 74 |
| 23 | साहित्यातील वृद्धांची समस्या(उपरे : एकांकिका) **डॉ. विठ्ठल केदारी** | 76 |
| 24 | करोना काळाचा शिक्षणावर झालेला परिणाम **डी.एन.रिठे** | 78 |
| 25 | समाजिक स्तरीकरण **डॉ. साधना लांजेवार** | 81 |
| 26 | भारतीय समाजातील वृद्धांच्या समस्या : कारणे व उपाय **प्रा. डॉ. टी. आर. फिसफिसे** | 84 |
| 27 | आंध जमातीच्या शैक्षणिक समस्या **प्रा.डॉ. गितांजली सदाशिवराव मोटे** | 90 |
| 28 | संगीत क्षेत्रातील समस्या व आव्हाने **प्रा. डॉ. शिवदास विठ्ठलराव शिंदे** | 95 |
| 29 | कोरोना काळातील वाढते महिला अत्याचार : एक आढावा **डॉ.विलास चव्हाण** | 98 |
| 30 | भारताची लोकसंख्या वाढ : एक सामाजिक समस्या **सुप्रिया गणपतराव गडलवाड** | 101 |
| 31 | आरोग्य **प्रा. ततापुरे जे.जी.** | 104 |
| 32 | आत्महत्येची समस्या **श्रीमती. धुमाळ सीमा काशिनाथराव** | 107 |
| 33 | स्त्रीभ्रुण हत्या : एक सामाजिक समस्या **प्रा.संजय सुरेवाड** | 109 |
| 34 | सामाजिक स्तरीकरण **कुमिदिनी जोशी रामचंद्र याडाराम** | 112 |
| 35 | हुंडा बळी एक सामाजिक समस्या **प्रा. डॉ. अनंत दादाराव मरकाळे** | 116 |
| 36 | संत रविदासांच्या काळातील धार्मिक स्थिती **डॉ. मिलिंद बळीरामजी भगत /नितीन आनंदराव अंडेलकर** | 119 |
| 37 | भारतीय संविधानातील मूलभूत हक्क आणि सामाजिक न्याय **श्रीकांत दिनकर तांदळे /प्रो. डॉ.डी.आर.तांदळे** | 124 |
| 38 | केंद्रीय कार्यशाळा ताडाळी येथील कर्मचा–यांच्या कार्यसमाधानकारकतेचे अध्ययन **प्रिया कृपाशंकर निमजे /प्रा. डॉ. फुलचंद वासुदेव निरंजने** | 128 |
| 39 | ग्रामीण महाराष्ट्रातील पारंपरिक समाजसंरचनेत दलित व सवर्ण यांच्या संबंधातील सातत्य आणि बदल : एक समाजशास्त्रीय अभ्यास **डॉ.नागोराव आर.कांबळे** | 132 |
| 40 | कोविड-१९, भारतीय पर्यटना समोरील आव्हाने : एक राजकीय अध्ययन स्वामी विरभद्र गुरप्पा | 136 |
| 41 | स्त्रीभ्रुणहत्या : एक सामाजिक समस्या **प्रल्हाद दत्तराव भोपे** | 141 |

# स्त्रीभ्रूण हत्या : एक सामाजिक समस्या

**प्रा. संजय पुरीवाड**
सहा. प्राध्यापक व विभाग प्रमुख, समाजशास्त्र विभाग, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय,
अंबाजोगाई,जि. बीड. ४३१५१७

सामाजिक समस्या प्रत्येक समाजात अस्तित्वात असतात. समाजातील लोक सामुदायिक पातळीवर त्या समस्येचे निवारण करण्याचे प्रयत्न करतात. प्रत्येक काळात सामाजिक समस्या असतात. प्राचीन काळात सामाजिक समस्या होत्या, त्याचप्रमाणे आधुनिक समाजातसुध्दा सामाजिक समस्या आढळतात. परंतु प्राचीन काळातील समस्या आज अस्तीत्वात आहे नाही. बदलत्या सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय परिस्थितीनुसार, नवीन सामाजिक समस्या निर्माण होतात. १९ व्या शतकात बालविवाह,सतीप्रथा, अस्पृश्यता, केशवपन, विधवा विवाह इ. सामाजिक समस्या निर्माण झाल्या होत्या. मात्र अलिकडे या सामाजिक समस्या आढळून येत नाहीत. सामाजिक बदलानुसार कुटुंब विघटन, बालगुन्हेगारी, लोकसंख्येची समस्या, बेकारी, घटस्फोट, काळाबाजार, भ्रष्टाचार, शेतकरी आत्महत्या, नोकरी करणाऱ्या स्त्रियांच्या समस्या इ. नव नवीन समस्या निर्माण झालेल्या आढळतात.

निसर्गातून मानवाने आजच्या युगात जास्तीत जास्त भौतिक सुखसमृध्दी मिळवणे हाच जवळपास सर्वच व्यक्तीच्या विचाराचा केंद्रबिंदु बनवला आहे. भौतिक सुखसमृध्दी प्राप्तीसाठी आज मानव आपले विचार, शक्ती खर्ची घालत आहे. त्यात त्याला यशही प्राप्त होत आहे. पण त्याचबरोबर मानवाने आपल्या सुखसमृध्दीसाठी निसर्ग नियमाला बदलण्यास सुरूवात केलेली दिसून येते. त्यामुळे मानवी समाजावर अनेक समस्या निर्माण झालेल्या पहावयला मिळतात. त्या अनेक समस्यापैकी स्त्रीभ्रुण हत्या ही समस्या मानवी समाजाने स्वतःच्या स्वार्थासाठी निर्माण केलेली आहे. या समस्येमुळे मानवी समाजात स्त्री-पुरूष प्रमाणात असमानता निर्माण झालेली आढळून येते आणि या समस्येचा परिणाम फक्त भारत देशापुरताच मर्यादित नाही तर, संपूर्ण जगाला या समस्येला सामोरे जावे लागत आहे. या समस्येमुळे अनेक समस्या निर्माण झालेल्या दिसून येतात. परंतु इतर देशापेक्षा भारत देशाला या समस्येमुळे अनेक संकटाला व परिणामाला सामोरे जावे लागणार आहे. हे मात्र निश्चित पणे सांगता येईल.

लिंगभाव असमानतेची समस्या ही जवळपास सर्वच देशात आहे. व्यक्तीचा दर्जा जातीच्या आधारावर निश्चित केला जातो. त्यामुळे वेगवेगळया जातीच्या लोकांमध्ये सामाजिक विषमता आढळून येते. लिंगानुसार पुरूषाचा दर्जा श्रेष्ठ तर स्त्रीचा दर्जा कनिष्ठ मानला जातो. अशा प्रकारची स्त्री आणि पुरूषामध्ये असलेली विषमता म्हणजे लिंग विषमता होय. जगात सर्व लिंगाच्या आधारावर विषमता आढळून येते. या विषमतेमुळे स्त्रीयांचे होणारे शोषण, त्या शोषणातून निर्माण होणारे मागासलेपण, अन्याय, अत्याचारचा प्रश्न, स्त्रीयाची दुय्यम भुमिका व दुय्यम स्थान हे सर्व मानवी अधिकाराच्या दृष्टीने चिंतनाचा विषय बनला आहे. पुरूष प्रधान समाज रचनेमुळे पुरूष वर्गाच्या हितसंबंधाना प्रत्यक्ष अप्रत्यक्ष पोषक ठरणारी सामाजिक व सांस्कृतिक व्यवस्था निर्माण होउन ती दृढ होत गेलेली आहे. निसर्गाच्या विविधतेच्या तत्वावर आधारलेली स्त्री पुरूष विषमता ही लिंग भेदाची वास्तविकता, विषमदर्जा व विषम व्यवहारात रूपांतरीत झाली त्यामुळे पुरूषांसाठी अनुकूल तर स्त्रीयासाठी प्रतिकुल असे वर्तन व्यवहार रूढ होत गेले. लिंगानुसार स्त्री पुरूषांचा सामाजिक दर्जा निश्चित केला जातो.

प्रस्तुत स्त्रीभ्रुण हत्या : एक सामाजिक समस्याश शोध निबंधामध्ये स्त्रीभ्रुण हत्येशी संबधीत असलेले स्पष्टीकरण देण्यात आले आहे. त्याचबरोबर या समस्येवर अनक कायधे निर्माण करूनही ही समस्या थांबत नाही यांचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे. प्रस्तुत शोधनिबंध हा दुयम स्त्रोतावर आधारित आहे. विविध अभ्यासक, संशोधकानी लिहलेल्या लेखांचा, पुस्तकांचा, संदर्भ ग्रंथाचा, संशोधन पत्रिका, मासिके व इंटरनेट इत्यादी चा वापर या निबंधासाठी करण्यात आला आहे.

स्त्री भ्रूणहत्या म्हणजे स्त्री गर्भलिंग निदान करून गर्भपात करणे याला स्त्री भ्रूणहत्या संबोधले जाते', पुरूषप्रधान संस्कृती आणि पुरूषवर्चस्वी समाज अशा प्रकारची मानसिकता असलेल्या समाजात, कुटुंबात मुलांच्या (पुरूषांच्या) जन्माला प्राधान्य देऊ न स्त्रियांच्या जन्मास विरोध केला जातो. अशा प्रसंगी स्त्रीच्या पोटातील गर्भाचे निदान करून तो गर्भ स्त्रीचा असल्यास गर्भपात करून त्याला नष्ट करण्यात येते. हयासाठी भारतात कायद्याने लिंग निदानाला बंदी आहे.

गर्भलिंग निदान चाचणी करून स्त्रीभ्रुण असल्याचे सिध्द झाल्यास जन्माला येण्यापूर्वीच स्त्री-भ्रुण संपविला जातो, त्याला स्त्रीभ्रुण हत्या असे म्हणतात. गर्भातील स्त्री अर्भक हे परीपक्व होउन नैसर्गिकरीत्या जन्माला येण्यापुर्विच तिला ठार मारल्या जाते, त्याला स्त्रीभ्रुणहत्या असे म्हणतात. जन्माला येण्या अगोदरच कन्यारत्नाचा विकृत, हिंसक, संवेदनहिन व अन्यायकारक पध्दतीने बळी घेणे म्हणजे स्त्रीभ्रुण हत्या होय.

१९०१ साली ९७२ स्त्रियांची संख्या प्रति १००० पुरूष होती. २००१ साली ९३३ स्त्रियांची संख्या प्रति १००० पुरूष होती. महाराष्ट्रातील सहा वर्षांच्या खालील मुलींचे प्रमाण सन २००१ मध्ये ९१३ असे होते. मात्र २०११ च्या जनगणनुनार हे प्रमाण ८८३ इतके म्हणजे जवळ जवळ ३० टक्के खाली उतरले आहे.

सेंटर फॉर ग्लोबल हेल्थ रिसर्च तर्फे करण्यात आलेल्या सर्वेक्षणातून असे समोर आले आहे की, भारतात गेल्या तीन दशकात एक कोटी विस लाख बालीकांची भ्रुणहत्या करण्यात आलेली आहे. तसेच संयुक्त राष्ट्र बाल अधिकार समितीच्या म्हणण्यानुसार आशिया खंडात विशेषतः भारत आणि चीन या दोन देशात अकरा कोटी सत्तर लाख बालीकांची भ्रुणहत्या झालेली आहे. तर स्त्रीभ्रुण हत्या विरोधी चळवळीतील डॉ. सुधा कांकरिया यांच्या मते, गेल्या वीस वर्षात अंदाजे दिड कोटी भ्रूणाची हत्या करण्यात आलेली आहे. असे म्हटले जाते. की महाराष्ट्रात दररोज १०७ ते१५० भ्रुणहत्या केल्या जातात. यावरून हे स्पष्ट होते की, स्त्रीभ्रुण हत्या मोठया प्रमाणात होत असल्यामूळके एक हजार पुरूषांमागे स्त्रियाचे प्रमाण हे कमी होत आहे. पुरोगामी महाराष्ट्रात स्त्रीभ्रुण हत्या चे प्रमाण वाढत आहे. स्त्रीभ्रुणहत्या हि मानसिक विकृती चे निदान करून त्यावर उपाययोजना करण्याची वेळ आल्याचे चित्र जनगणना २००१ ते२०११ च्या जनगणने वरून स्पष्ट होते. दिवसेंदिवस ० ते ६ वयोगटातील मुलांची संख्या वाढत आहे, तर मुलीची संख्या कमी होत आहे.

२००१ च्या जनगणनेनुसार देशाच ० ते ६ वयोगटातील लिंग गुणोत्तर ९२७ होतं. महाराष्ट्रासाठी हे गणोत्तर ९१३ होतं. त्यातही कोल्हापूर, सांगली आणि सातारा या तीन जिल्हयांमध्ये हे प्रमाण ८७८ हून कमी होत. एस आर एस च्या आकडेवारीनुसार २००६ ते २००८ साली महाराष्ट्राचे जन्माच्या वेळचे गुणोत्तर १००० मुलांमागे ८६६ मुली इतके कमी झाले आहे. यातून राज्यामध्ये गर्भलिंगनिदान होत आहे हे स्पष्टपणे दिसून येते.

हे कमी होण्याचे कारण म्हणजे व्यक्तीची मानसिकता होय. हा एक सामाजिक रोग होय. त्याचा प्रादुर्भाव आज सर्वत्र जसे षहरी, ग्रामीण, श्रींमत, गरीब, शिक्षित, अशिक्षित, विकसित, अविकसित, भेंदाना ओलाडून जात आहे. अलिकडे मराठवाडयातील बीड जिल्हयातील परळी वैजनाथ येथिल एका नाल्यात नउ स्त्री अर्भके सापडली. या घटनेने सर्वत्र खळबळ उडाली. हा प्रश्न चर्चेला सामोरा आला. एवढेच नव्हे तर विद्येचे माहेरघर असलेल्या, फुले आणि कर्वे यांच्या पुण्यात गर्भलिंग चाचणीचा अमानवी प्रकार उघडकीस आला. मुलगी होणार असल्याचे निदान करून तो गर्भ मारून टाकण्याचे काम करणाऱ्यामध्ये शिकलेल्यांची संख्या जास्त आहे.

गर्भधारणेच्या किंवा प्रसुतीच्या आधी गर्भाचे लिंग जाणून घेण आणि जर मुलींचा गर्भ असेल तर गर्भपात करणे म्हणजे गर्भलिंग निवड. पुरूष प्रधान समाजात मुली आणि स्त्रियांना असणांर दुयम स्थान आणि मुलींबाबत केला जाणारा भेद हेच यामागच मूळ कारण आहे. मुलाच्या हव्यासापी सोनोग्राफीच्या तंत्रज्ञानाचा वापर गर्भाचा लिंग जाणून घेण्यासाठी केला जातो आणि मुलीच गर्भ असेल तर तो पाडला जातो.

अलीकडील बदल म्हणजे स्त्री भ्रूणहत्या रोखण्यासाठी भारत सरकार कडून सर्व सोनोग्राफी सेंटरवर सायलेंट ऑब्झर्व्हर मशीन बसविले जाणार आहे. याद्वारे संबंधित डॉक्टरने स्त्री भ्रूण असल्याची तपासणी केली का ? याची नोंद होणार आहे. त्याशिवाय प्रत्येक तपासणींची नोंद होईल. त्या आधारे जिल्हा रूग्णालयाचा पथकाला संबंधित डॉक्टरांवर कारवाई करणे सोयीचे होणार असून स्त्री भ्रूणहत्या थांबण्यास मदत होईल.

प्रसर्वपूर्व परिक्षणतंत्र कायद्याच्या अन्वये गर्भलिंग चाचणीवर बंदी घालण्यात आली आहे. तरीही अवैद्य पध्दतीने हया चाचण्या केल्या जातात. हे प्रकार रोखण्यासाठी शासनामार्फत गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व निदानंतत्र लिंगनिवडीस

प्रतिबंध कायदा १९९४ आणि सुधारित कायदा २००३ उपलब्ध आहेत. मात्र ह्या कायद्याची म्हणावी तशी अमलबजावणी होताना दिसत नाही.

१९९४ च्या गर्भधारणा पूर्व व प्रसूतीपूर्व निदान तंत्र वापर (गर्भलिंग निदान प्रतिबंध) या कायद्यानुसार गर्भलिंगनिवड गुन्हा आहे. सोनोग्राफीसारख्या तंत्राचा वापर गर्भाचा लिंग जाणून घेण्यासाठी केला जाउ नये म्हणून हा कायदा अस्तित्वात आला. या कायद्यानुसार पहिल्या गुन्हासाठी ३ वर्षापर्यंत कैद आणि १०,००० रु. दंडाची शिक्षा होउ शकते. परंतु या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी होउ शकलेली नाही आणि त्यामुळे थोडयाच लोकांना शिक्षा होउ शकली आहे गुन्हा सिध्द करणं हेच सर्वात मोठा आव्हान आहे. कारण गर्भलिंग निदान उघडपणे होत नाही आणि बहुदा दोन्ही पक्षांच्या संमतीने घडत असते. त्यामुळे तक्रार कोण दाखल करणार?

काही जण याची पाठराखण करतात की समाजात मुली कमी असल्या तर त्यांच स्थान उंचावेल. पण प्रत्यक्षात मुलीची संख्या जर कमी झाली तर त्यांच्यावरती बंधन अजूनच वाढतील. तसच अपहरण, हिंसा आणि बलात्काराच्या घटनाही वाढतील. एका बाईशी एकाहून अधिक पुरूषांनी लग्न करण्याच्या जुन्या प्रथाही परत सुरू होतील. देशाच्या काही भागात आजही लग्नासाठी मुली मिळत नसल्यामुळे बायका विकल्या जात आहेत. अशाही वातम्या प्रसारमाध्यमां मध्ये येत आहेत.

स्त्रीभ्रुणहत्या साठी अंधश्रध्दा, रूढी, परंपेरचा प्रभाव, मुलगा हा वंशाचा दिवा मानण्याची प्रवृत्ती, पुरूषप्रधान समाज, स्त्रियांचे आर्थिक परावलंबन, हुंडा पध्दती, खर्चिक विवाह विधी पध्दती, शासनाची उदासीनता, गर्भजल परीक्षण बदी कायदयातील उणीवा, व्यावहारीक व अमानुष प्रवृत्ती इत्यादी घटक जबाबदार आहेत. आजचे युग हे जागतिकीकरणातील युग आहे. परंतु या युगात स्त्रीयांचे प्रमाण कमी होत राहिल्यास बलात्कार, वेश्याव्यवसाय,छेडछेडीचे प्रमाण वाढेल, लैगिंक शोषण, असुरक्षितता इत्यादी सारखे प्रश्न निर्माण होतील व वैवाहिक, कौटुंबिक, सामाजिक जीवन अस्थिर बनेल, अविवाहित पुरूषांमागे गुप्तरोग व तत्सम रोगाचे प्रमाण वाढेल. त्यांच्यात आपण जास्त श्रम करावेत ही प्रेरणाच राहणार नाही, कदाचीत बहुपतीत्वाची पध्दत रूढ होउ शकेल.

आंतरराष्ट्रीय स्तरावर स्त्रीचा प्रभाव प्रत्येक देशाच्या समाजव्यवस्थेवर, पर्यायाने महिलांच्या दर्जावर पडला. भारतीय समाजव्यवस्थेत सुध्दा बदलत्या परिस्थितीत उत्पन्न झालेल्या अनेक सामजिक, आर्थिक व राजकीय प्रभावाने स्त्री जीवनात महत्वपूर्ण बदल घडून आलेत. परिणामतः महिलांच्या भुमिकेत व दर्जात आतुलाग्र बदल होणास सुरूवात झाली. धार्मिक परिवर्तना, सामाजिक प्रतिष्ठा आणि मालमत्ता विषयक अधिकार या बाबतीत समाजाच्या मुलभूत सामाजिक संरचनेत परितर्वन झालेले दिसून येत आहे.

**संदर्भ ग्रंथ :**

१.भारतातील सामाजिक समस्या, शिवाजी विद्यापीठ (दूर शिक्षण केंद्र) कोल्हापूर.
२. समाजिक समस्या, प्रा. काळदाते सुधाताई.
३. प्रा. आहुजा राम (१९९४ ) सामाजिक समस्यांए रावत प्रब्लीकेशन, जयपूर.
४. प्रा. विलास संगवे (१९७९ ) भारतातील सामाजिक समस्या, पापूलर प्रकाशन, मुंबई.
५. प्रा. पेंडसे सचिन ( २०२४) पर्यावरण आणि समाज य.च.म.मु. वि. नाशिक.
६. प्रा. आगलावे प्रदिप ( २००६) आधुनिक भारतातील सामाजिक समस्या विद्या प्रकाशन, नागपूर.


पर्यावरणीय
समस्या
संपादक
डॉ. वसंत सातपुते
डॉ. सुनिता टेंगसे
डॉ. मुकुंदराज पाटील

२२.जागतिक तापमान वाढ :कारणे,परिणाम व उपाययोजना /
जयदीप सोळूंके १०९
२३.प्रदुषण : प्रकार, कारणे, परिणाम आणि उपाय / नरसिंग आ.पवार ११६
२४.व्यावसायीक पर्यावरण काळाची गरज / बी. आर शिंदे १२१
२५.व्यवसायावर पर्यावरणाचे परिणाम करणारे घटक
पवार बी. एस १२४
२६.पर्यावरण जनजागृती काळाची गरज /अंभुरे एस. डी. १२८
२७.ध्वनिप्रदूषण परिणाम आणि उपाय / मानसी स. सरदेशपांडे १३२
२८.जागतिक तापमान वाढीचा कृषी क्षेत्रावर होणारा परिणाम /
शिवकुमार के. पांचाळ १३५
२९.घनकचरा व्यवस्थापनातुन पर्यावरण संवर्धन / सुनिता आ. टेंगसे १३९
३०.पर्यावरण शिक्षण आणि त्याची आवश्यकता
दिपक द. जोगडे, ए. के. फाजगे , ए. पी. बर्वे १४४
३१.प्रदूषण: प्रकार, कारणे, परिणाम / वसंत पां. सरवदे १५०
३२.शाश्वत विकासातून पर्यावरण संवर्धन / अशोक का. जाधव १५४
३३.जलप्रदूषण आणि आरोग्य /एस.जी. अन्सारी १६०
३४.आंतरराष्टीय पर्यावरणीय वाटाघाटी / आंधळे बी व्ही १६३
३५.ध्वनी प्रदुषण : कारणे, परिणाम व उपाय / मा. धो. कच्छवे १६७
३६.औष्णिक विदयुत प्रकल्प आणि पर्यावरण /सुरेवाड एस.जी १७२
३७.पर्यावरण संवर्धन काळाची गरज /सोमवंशी मुक्ता (गंगणे) १७६
३८.जैवविविधतेचा एक चिकित्सक अभ्यास / सुनंदा भद्रशेटे १८१
३९.पर्यावरणाची हानी : एक गंभीर समस्या /गोलेकर के.एम. १८४
४०.मराठी साहित्यातील नैसर्गिक पर्यावरण / श्रीहरी दा.चव्हाण १८८
४१.21 वी सदी की कविता में महानगरिय,पर्यावरणीय विमर्श /
दिग्विजय टेंगसे १९२
४२.वाङ्मयीन पर्यावरण / सखाराम बा. कदम १९९
४३.भारतीय संस्कृति एवं पर्यावरण / व्यास सी.पी. २०३
४४.असंतुलन का असमंजस एवं इक्कीसवीं सदी /कुलकर्णी वनिता २०६
४५.पर्यावरणावर प्रदुषणचे होणारे परिणाम /
जी.एन.सोनटक्के, एस.एस. गव्हाणे २१०

३६

# औष्णिक विदयुत प्रकल्प आणि पर्यावरण

## (विशेष संदर्भ : परळी वैजनाथ शहर)


सुरेवाड एस.जी

सहा. प्राध्यापक व विभाग प्रमुख, समाजशास्त्र विभाग

यशवतराव चव्हाण महाविदयालय, अंबाजोगाई


महाराष्ट्रातील बीड जिल्हयात परळी वैजनाथ शहर हे बारा ज्योतिलिंग मंदिरापैकी एक ज्यातिलिंगाचे मंदिरे असलेले शहर म्हणून प्रसिध्द आहे. संपूर्ण जगातून पर्यटक, भाविक, भक्त दर्शनासाठी येत असतात. त्याचबरोबर याच शहराच्या जवळ काही शहरातच औष्णिक विदयुत प्रकल्प कार्यरत आहे.

स्वतंत्र भारताने भारतातील मुलभुत समस्या कमी करण्यासाठी पंचवार्षिक योजना ची सुरूवात केली. पहिली पंचवार्षिक योजना ८ डिसेंबर १९५१ (१९५१ते १९५६) ला भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली. दुसरी पंचवार्षिक योजनचा कालावधी हा १९५६ ते १९६१ पर्यंत होता. या दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत औविगिकीकरणावर जास्तीत जास्त भर दिला गेला. तर तिसऱ्या पंचवार्षिक योजना १९६१–१९६६ च्या कालावधीत उद्योग विकासावर भर दिला गेला. तर तिसऱ्या उघोगाला अतिशय महत्वाची अशी वीज निर्मिती साठी देशात वेगवेगळ्या ठिकाणी वीज निर्मिती केंद्र निर्माण करण्यावर जास्तीत जास्त भर दिला गेला. त्यातील एक प्रकल्प म्हणुन औष्णिक विद्युत केंद्र परळी वैजनाथ, जि.बीड, महाराष्ट्रात निर्माण झाला. या प्रकल्पातुन बऱ्याच प्रमाणात वीज निर्मिती केली जाते. तीव वीज उद्योग, शेती, घरगुती कामासाठी वापरली जाते. निश्चित काही अंशी या प्रकल्पाचे यश अतिशय चांगले आहे. पण चांगल्या बाबी बरोबरच काही वाईट बाबी ही येत असतात. त्या बाबींचा अभ्यास करणे अतिशय महत्वाचे आहे.

औष्णिक विद्युत केंद्र म्हणजे कोळसा जाळून, त्याद्वारे मिळणाऱ्या उष्णतेवर पाणी तापवुन, त्याच्या वाफेवर जनित्र फिरवुन विज बनवणारे यंत्र, प्रकल्प होय. असे प्रकल्प महाराष्ट्रात पारस (जि. अकोला), परळी वैजनाथ (जि.बीड), भुसावळ (जि. जवळगाव), खापरखेडा (जि. नागपूर), कोराडी (जि. नागपूर), चंद्रपुर (जि. चंद्रपुर), डहाणु (जि. ठाणे), एकलहरे (जि. नाशिक) आहेत. त्यापैकी नमुना म्हणुन महाराष्ट्रातील बिड जिल्ह्यातील परळी वैजनाथ येथिल औष्णिक विद्युत केंद्राची निवड करण्यात आलेली आहे.

परळी वैजनाथ हे बारा ज्योतिलिंग मंदिरापैकी एक आहे. हे ज्योतिर्लिंग भारतातील बीड जिल्हयात असून परळी वैजनाथ हे दक्षिण मध्य रेल्वेवरील एक स्टेशन आहे. परळी वैजनाथहे परळी वैधनाथ म्हणूनही ओळखले जाते.

मराठवाडयातील पहिले औष्णिक विदयुत केंद्राचा मान या केंद्रास मिळाला आहे. दिनांक २९मे १९६६ रोजी तत्कालीन संरक्षण मंत्री श्री. यंशवतराव चव्हाण यांच्या हस्ते या विदयुत केंद्राचा कोनशिला संभारभ पार पडला. १५नोव्हेबर१९७१ रोजी ३०मेगावॅटचे पहिले जनित्र कार्यान्वित करण्यात आले.

जनगणना २०११ नुसार बीड जिल्हयाची लोकसंख्या २,५८५,९६२ इतकी होती. त्यापैकी ९०,९७५ म्हणजे लाखाच्या आसपास ची लोकसंख्या परळी शहराची आहे. औष्णिक विदयुत केंद्राचा परळी शहरावर झालेला पर्यावरणातील परिणामाचा शोध घेणात आलेले आहे.

१. ध्वनीप्रदुषण :

औघोगिक क्रांतीबरोबरच पाश्चिमात्य देशात औघोगिक ध्वनिप्रदुषण मोठया प्रमाणावर वाढले आहे. या काही भागांमध्ये ध्वनिप्रदुषण मोठया प्रमाणात असते. या विभागात काम करणाऱ्या कामगारांना बहिरेपणा, रक्तदाब वाढणे, आम्लता वाढून पोटात अल्सर होणे यांसारख्या भयंकर व्याधी जडण्याची शक्यता असते. कामावरून घरी आल्यावरही या प्रदुषणाचा त्रास कामगारांना जाणवत असतो. तसेच त्या परीसरातील नागरिकांनाही जाणवत असतो. स्वभाव चिडचिडा व भांडखोर बनतो. घरी आल्यावर पाहिजे तशी शांतता न मिळाल्यास त्यांच्यामधील हिंसकवृत्ती वाढ झालेली दिसून येते. त्यामुळे परळी शहरात गुन्हेगारीत वाढ झालेली आहे.

२. भूप्रदुषणात वाढ :

औष्णिव विद्युत केंद्रातुन निर्माण होणारा कचरा हा भुप्रदुषणात वाढ करत असतो. भुप्रदुषणात कचरा म्हणजे टाकाऊ पदार्थाचा मोठा वाटा असतो. कचऱ्याची नीट विल्हेवाट लावणे महत्वाचे असते. कचरा व घाण पदार्थ लवकर नाश पावत नाहीत. म्हणुन कचऱ्यास प्रदुषणास कारण ठरते. कचरा प्रदुषणामुळे दुर्गंधी, जीवजंतुचा प्रसार, रोगराई, अनारोग्य निर्माण होते व त्याचे परिणाम सभोवतालच्या लोकांना भोगावे लागतात. या प्रकल्पातुन निघणारा कचऱ्या, धुळ ही आसपासच्या परिसरातील शेत जमीनीवर पडुन ती शेत जमीन नापिक बनलेली आहे. काही शेत जमीनीची उत्पादकता संपुष्टा येत आहे. ही बाब शेती उत्पादन व शेतकरी या दोन्हीसाठी धोकादायक आहे. परळी

शहर व शहराच्या आसपास जमीन नापिक बनलेली दिसून येते. हि बाब परळी शहरातील नागरीकांसाठी धोकादायक आहे.

३. प्रदुषणात प्रचंड वाढ :

सातत्याने वाहनाच्या संख्येत होणाऱ्या वाढीमुळे सल्फर डायऑक्साईड, नायेट्रोजन ऑक्साईड, कार्बन मोनाक्साईड, बेन्झीन, शिसे, इत्यादी घटक हवा प्रदुषित करण्यास कारणीभुत ठरतात. १९६० पासुन सल्फर डायऑक्साईड एक महत्वाचे प्रदुषक म्हणुन ओळखले जाते. या वायुचे हवेतील प्रमाण वाढायला मुखत्वे औद्योगिकीकरण व शहरी वाहतुक यांतील बेसुमार वाढ कारणीभुत असते. जड इंधन तेल व कोळसा यांच्या ज्वलनामुळे हा वायु तयार होतो.

नायट्रोजन ऑक्साईड हा वायू एक घातक प्रदुषक तर आहेच, पण तो दुसऱ्या एका प्रदुषक वायूच्या ओझेनच्या निर्मितीलासुध्दा मदत करतो. या वायुंच्या पातळीमध्ये १९९० नंतर अचानक वाढ झालेली आढळते. या बाबीमुळे परळी शहरातील जनतेवर आरोगाचा परिणाम जाणवतो.

४ आरोग्याची समस्या :

औष्णिक विदयुत केंद्रातून निर्माण झालेल्या प्रदुषणामुळे येथिल लोकांना,कामगारांना दमा,क्षयरोग, फुफुसाचा कॅन्सर, बहिरेपणा, इत्यादी आजाराचे प्रमाण या परिसरात वाढलेले दिसून येते. जागतिक आरोग्य संघटनेच्या एका अहवालानुसार या परिसरातील होणाऱ्या प्रदुषणामुळे अनेक आजार निर्माण झालेले आहेत. त्याच बरोबर पुढील काळात यावर जर वेळीच उपाययोजना जर केली नाही तर परळी शहरातील मानवी जीवन संकटात असेल. मानवाच्या फायदयासाठ, विकासासाठी, कल्याणासाठी जो हा प्रकल्प तयार झालेला आहे. यांचा बहुतांश फायदा ही झालेला आहे. परंतु या फायदा बरोबर या परिसरातील मानवी जीवननावर अनेक वाईट परिणाम होत आहेत. हे परिणाम मानवा साठी अतिशय घातक आहेत की ज्यामुळे मानवी जीवन संपुष्ठात येईल.

५ स्थंलातराचे प्रमाण जास्त :

स्थंलातर हाही लोकसंख्येच्या गतिमानतेतील एक महत्वाचा घटक आहे. ज्या परिस्थितीत लोक राहतात त्यामध्ये काही असे घटक असतात, की ते व्यक्तीला दुसऱ्या ठिकाणी वास्तव्य करण्यास भाग पाडतात. चरितार्थाचा शोध, आर्थिक अडचणी, सामाजिक भेदभाव, दमन, नैसर्गिक आपत्ती, इत्यादी कारणांमुळे लोक स्थंलातर करतात. अगदी याच प्रमाणे परळी शहराच्या आसपासच्या ग्रामीण भागातून मोठया प्रमाणावर लोक शहरी भागाकडे चरितार्थाचा शोध घेण्यासाठी

आलीत. त्यामुळे शहरांची लोकसंख्या वाढली. ही वाढ मर्यादिबाहेर झाल्यास शहरी भागातील मानवी जीवनाच्या अत्यावश्यक गरजांवर ताण पडला.

ग्रामीण भागातील लोक मोठया प्रमाणावर शहराकडे आली. त्यामुळे ग्रामीण हातमाग, कुदिरउदयोग यांसारखे स्थानिक व्यवसाय बंद पडले.

६. गलिच्छ वस्त्यांची निर्मिती:

औष्णिक विदयुत केंद्रात रोजगारासाठी आलेले कामगारांना अपुरे वेतन व कामाची हमी नसल्यामुळे त्यांना वास्तव्यासाठी गलिच्छ वस्त्यांचा आधार घावा लागतो. कारण उत्पन्न कमी असल्यामुळे त्यांना चांगल्या ठिकाणी रहाणे परवडत नाही.त्यामुळे त्या कामगार लोकांनी गलिच्छ वस्त्यांची निर्मिती केलेली आहे. या गलिच्छ वस्त्या ची संख्या व तेथिल लोकांची संख्या वाढली आहे. परळी शहरीतील गलिच्छ वस्त्यांत प्रंचड प्रमाणात लोकंसख्या वाढलेली दिसून येते. या ठिकाणी गुन्हेगारीचे प्रमाण ही जास्त आहे. त्या बरोबरच जीवनआवश्यक गरजा पूर्ण होत नसल्यामुळे या ठिकाणी अनेक अनैतिक व्यवसाय सुध्दा चालततातही बाब परळी शहरासाठी अतिशय घातक आहे.

संदर्भ

१. २०११ जी जनगणना
२. परळी शहरांची माहिती.
३. मराठी विश्वकोश
४. इटरनेट

□□□

ISSN-2320-4494
RNI No.MAHAUL03008/13/2012-TC
Impact Factor : 2.7286

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal

## August Special Issue II



ARTS | COMMERCE
SCIENCE | AGRICULTURE
EDUCATION | MANAGEMENT
MEDICAL | ENGINEERING & IT | LAW
PHARMACY | PHYSICAL EDUCATION
SOCIAL SCIENCE | JOURNALISM
MUSIC | LIBRARY SCIENCE |

www.powerofknowledge.co.in
E-mail : powerofknowledge3@gmail.com

Editor
Prin.Dr.Shivdas Shirsath

## अनुक्रमणिका


| अ. क्र. | प्रकरण | संशोधक | पृ. क्र. |
|---|---|---|---|
| १ | जागतिकीकरण आणि आदिवासी बोली | अजय मारोती पाटील | १-४ |
| २ | जागतिकीकरण आणि आदिवासी बोली | श्री. कांचगुंडे हनुमंत<br>प्रा. डॉ. दिलीप ज्ञानोबा भिसे | ५-९ |
| ३ | जागतिकीकरण व आदिवासी लोकगीते | श्री. भगत किशोर बाबुराव<br>प्रा. डॉ. दिलीप ज्ञानोबा भिसे | १०-१३ |
| ४ | जागतिकीकरण व आदिवासी लोकनृत्य | प्रा. डॉ. पंजाब शेरे | १४-१७ |
| ५ | मराठी लोकसाहित्यातील गोंधळ एक लोककला" | प्रविण शंकर सोलनकर | १८-२२ |
| ६ | जागतिकीकरण आणि आदिवासी गोंड समाजातील दंडारनृत्य | प्रा. डॉ. राजू मोतेराव | २३-२७ |
| ७ | पारंपरिक भारतीय आदिवासी समुदायातील लोककथेचा समाजशास्त्रीय अभ्यास | प्रा. डॉ. संजय सुरेवाड | २८-३३ |
| ८ | जागतिकीकरण आणि आदिवासी बोली | सारिका संदिपान फरांडे | ३४-३७ |
| ९ | जागतिकीकरण आणि आदिवासी लोकगीते | शारदा किशन धामणगांवकर | ३८-४१ |
| १० | जागतिकीकरण आणि आदिवासी लोककथा | प्रा. डॉ. शोभा डहाळे | ४२-४५ |
| ११ | जागतिकीकरण आणि गोमंतकीय आदिवासी जीवन | डॉ. स्नेहा सुवास प्रभु महांबरे | ४६-५२ |
| १२ | जागतिकीकरण आणि आदिवासी लोकगीते | प्रा. सुपारे यू. पी. | ५३-५८ |
| १३ | आदिवासी बोलीभाषा | डॉ. विठ्ठल केदारी | ५९-६१ |
| १४ | स्वातंत्र्याच्या क्षितिजावर उगवलेला शौर्यतारा : भगवान बिरसा मुंडा | डॉ. कुंदा बाळासाहेब कवडे | ६२-६६ |
| १५ | जागतिकीकरण आणि आदिवासी बोली | प्रा. पंडित मोरे | ६७-७१ |
| १६ | जागतिकीकरण आणि आदिवासी लोकगीते | प्रा. डॉ. वाल्मिक शंकर आढावे | ७२-७८ |
| १७ | जागतिकीकरण आणि आदिवासी बोली | प्राचार्य डॉ. शिवदास शिरसाठ | ७९-८८ |
| १८ | मराठी आदिवासी कविता आणि बोली | प्रा. डॉ. गोविंद काळे | ८९-९१ |
| १९ | जागतिकीकरण आणि आदिवासी लोकगीते | प्रा. डॉ. वसुमती पी. पाटील | ९२-९५ |
| २० | जागतिकीकरण आणि आदिवासी साहित्य | प्रा. लालबा दुमटकर | ९६-१०० |
| २१ | जागतिकीकरण आणि आदिवासी बोली | प्रा. डॉ. देविदास खोडेवाड | १०१-१०४ |
| २२ | वैश्वीकरण और आदिवासी लोककथाः हिंदी साहित्य के संदर्भ में | अशोक बाळू पाटील | १०५-१०९ |
| २३ | आदिवासी लोकगीत और जनजागरण | वनिता कुमारी डोडियार | ११०-११३ |

# पारपांरिक भारतीय आदिवासी समुदायातील लोककथेचा समाजशास्त्रीय अभ्यास

प्रा. डॉ. संजय सुरेवाड
सहा. प्राध्यापक व विभाग प्रमुख,
समाजशास्त्र विभाग,
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय अंबाजोगाई. जि. बीड.

समग्र भारताचा समाज ाास्त्रीय विचार करतांना भारतीय समाजाचे नागरी समुदाय, ग्रामीण समुदाय आणि आदिवासी समुदाय असे मिळून बनला आहे. 19 .व्या शतकात मानव ाास्त्रज्ञांनी आदिवासी किंवा आदिवासी समुदाय ही संज्ञा विकसित केली. अंत्यत साधेभोळे, स्वतःची विशिश्ट संस्कृती जोपासत, सामाजिक, आर्थिक, राजकीय, भौक्षणिक दृश्टया हा समाज खूप मागासलेला आहे. एकाच भूभागावर राहणारा, एकच भाशा बोलणारा, विवाहसंबध आणि व्यवसायाच्या बाबतीत एका विशिश्ट प्रकारची मूल्ये, विचारप्रणालीची जोपासना करणाऱ्या समुहाला आदिवासी समुदाय (Tribal community) असे म्हणतात.

आदिवासी हजारो वर्शांपासून या धरतीवर निवास करीत आहेत. पुरातन काळी संस्कृत साहित्यात आदिवासी जमातीचा उल्लेख आलेला आहे. "रामायणात निशाद, किरात, भावरी, रक्श असा उल्लेख आहे, कच्चे मांस खाणारे म्हणून किरातांचा उल्लेख आहे. महाभारतात पुलिंद आणि किरात हे हिमालयात राहणारे आदिवासी म्हणून उल्लेख आढळतो. एकलव्य. भाबरी. नि ादराज, गुह हे आदिवासी होते."[1] रामायण महाभारत या ग्रंथाचा कालखंड साधरणत चार–पाच हजार वर्शापूर्वीचा असावा या ग्रंथात आदिवासी जमातीचा उल्लेख आढळतो. "भारतीय स्मृतीग्रंथात आदिवासी जमाती या अनुलोम–प्रतिलोम, शरीरसंबधातून निर्माण झाल्या असा उल्लेख आहे"[2] आदिवासी लोक नागरी वस्तीपासून अगदी दूर डोंगरदऱ्यामध्ये, जंगलामध्ये राहतात. त्यामुळे असा एक समज पसरविण्यात येतो की, सपाट, दाट वस्तीच्या प्रदे ातील लोकांनी वनवासी लोकांनी लढाया करुन, त्यांना परभूत करून दऱ्याखोऱ्यात दूर हाकलून दिले."[3] बाहेरुन येणाऱ्या सबलांनी त्यांचे सखल प्रदेश व्यापले. त्यामुळे त्यांना जंगल, दऱ्याखोऱ्याचा आश्रय घ्यावा लागला आणि आदिवासी हा कायमचा प्रगत समाजापासून दूर झाला. आदिवासींबद्दल लोकांची सर्वसाधारण कल्पना म्हणजे जंगल–दऱ्याखोऱ्यांत राहणारे रानटी, जंगली लोक म्हणजे आदिवासी. आदिवासी समुदायचा सर्वप्रथम स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटीश प्रशासक, धर्मप्रसाराचे काम करणारे मिशनरीज व काही प्रमाणात प्रशासकीय सेवेत असलेले अधिकारी यांना आदिवासी समुदायाचे भास्त्रीय अध्ययन करण्याचे श्रेय दिले जाते. आदिवासींना "आदिम अगर आदिवासी (Primitive Tribes)असे नामविधान हट्टनने केले आहे."[4] "आदिवासींना गिअरसन, ठक्कर बाप्पा यांनी 'मूळचे रहिवासी' म्हटले आहे."[5] "रिसले, लॅस्की, एल्विन, ग्रिगसन, भूवर्न, टॅलेट, सेडविक, मार्टिन, ए.व्ही. ठक्कर यांनी या लोकांना 'अगदी प्राचीन'(Aboriginal)किंवा 'अगदी मूळचे रहिवासी'(Aborigines)म्हटले आहे."[6] यामुळेच आदिवासी समुदायचा वस्तूनिश्ठ व शास्त्रीय अभ्यास करणे महत्वाचे आहे.

## आदिवासी समुदाय :

भारतीय आदिवासींना इंग्रजीमध्ये Tribes'असे म्हणतात. आदिपासून म्हणजे सुरुवातीपासून दऱ्याखोऱ्यात किंवा जंगलात निवास करणारे म्हणजे आदिवासी होत: असा सर्वसामान्य अर्थ रुढझाला आहे. त्यामुळे जंगलांत किंवा डोंगराळ

भागात राहणाऱ्या लोकांना आदिवासी असे संबोधले जाते. आर्यांचे भारतात आगमन होण्यापूर्वीच आदिवासी या देशाचे मूळ रहिवासी होते. "आदिवासी हे लोक भारतातील आद्य वसाहतकार होत. हे लोक आत्मसंरक्षणास तितकेसे समर्थ नव्हते. त्यामुळे भारतात पश्चिम, वायव्य व मोगोलियन या लोकांपुढे त्यांचा टिकाव लागला नाही. नवागत लोक हे संख्याबलानेच नव्हे तर शस्त्रास्त्रांमुळेही वरचढ असल्यामुळे वन्य जमातींना त्यांच्यापुढे हार खावी लागली. व त्यांना डोंगर-दऱ्यांचा किंवा जंगलाचा आश्रय करावा लागला. आजही ते अशाच जागी कायमची वस्ती करून राहिलेले दिसतात." आदिवासी शब्दाची उकल केल्यास आदिवासी म्हणजे 'आदि' हा शब्द संस्कृत भाषेतला आढळतो. तो मूळनिवासीयांच्या बोलल्या जाणाऱ्या भाषांमध्ये नाही. म्हणजे आदिवासी हे नामसंबोधन आर्यांच्या बोलीभाषेतून आले आहे हे स्पष्ट होते.. भारतीय संविधानात जमातीची व्याख्या देण्यात आलेली नाही. मात्र राष्ट्रपती आवश्यकतेनुसार आदिवासी जमाती किंवा त्या अंतर्गत काही गट किंवा समूह यांना अनुसूचित जमाती म्हणून जाहीर करू शकतो. भारतीय संविधानात आदिवासींना अनुसूचित जमात(Scheduled Tribes )असा उल्लेख आहे. भारतीय संविधानातील कलम 342 नुसार, "ज्यांचा समावेश अनुसूचित जमातीच्या यादीत केला आहे त्यांना अनुसूचित जमाती असे म्हणतात"[8] अनुसूचित जमातींना, आदिवासी, मूलनिवासी, आदिम जाती व टोळ्या, वन्यजाती, गिरीजन अशी विविध नांवे आहेत. त्यापैकी आदिवासी हे नांव राष्ट्रीय परिभाषेत जास्त प्रचलित आहे. आदिवासींना गिअरसन, ठक्करबाप्पा यांनी 'मूळचे रहीवासी' म्हटले आहे. हटन यांनी 'आदिम जमाती' असे म्हटले आहे तर डॉ. जी. एस. घुर्ये यांनी मात्र "so called aborigines"म्हणजे तथाकथित मूळ रहिवासी किंवाBackward Hindusम्हणजे 'मागसलेले हिंदू' म्हटले आहे."(the so-called Aborigines who form the bulk of the Scheduled Tribes and hae been designated in the censuses as An imists are best described as Backward Hindu's )"[9]"धरतीची लेकरे ' म्हणून ज्यांचा सर्वार्थाने उल्लेख करता येईल, 'अ ा आदिवासी समाजाची दुनियाही वेगळी आहे. डोंगरकपाऱ्यात राहणाऱ्या, आपल्याच रुढी व परंपराना पालीसारखे चिटकून राहणाऱ्या, फळाफुलांच्या व झाडपाल्यांच्या चवीने समाधान पावणाऱ्या आदिमांचे जीवन स्वच्छंदी पाखरासारखे असते."[10]

आदिवासी समुदायाच्या व्याख्या !

1- गिलिन व गिलिन यांच्या मते, (एका विशिष्ट भूप्रदेशावर राहणारा, समान बोलीभाषा बोलणारा व समान सांस्कृतिक जीवन जगणारा पण अक्षर ओळख नसलेल्या स्थानिय गटांच्या समुच्चयाला आदिवासी समाज असे म्हणतात. -"(Any collection of preliterate local groups which occupies a common general territory, spells a common language and practiceses common culture is trible)"[11]

2- डॉ. रिव्हर्स च्या मते, ( ज्या समूहातील सदस्य एक समान बोलीभाषा बोलतात, युध्द वैगेरेसारख्या उदिश्टपूर्तीकरिता एक होऊन झटतात अशा सरळ व साध्या सामाजिक समूहाला 'आदिवासी समाज' असे म्हणतात, -"("A tribe is a social group of a simple kind, the members of which speak a common dialect and act together in such common purposes as welfare. – Geelin and Geelin)"[12]

3 डॉ. मुजुमदार डी. एन. यांच्या मते, " आदिवासी समूदाय म्हणजे समान नाव धारण करणाऱ्या, एकाच भूप्रदेशावर राहणाऱ्या, एकच भाषा बोलणाऱ्या व् विवाह, व्यवसाय इत्यादी बाबतीत समान निशेध नियम पाळणाऱ्या व परस्पर उत्तरदायित्वाच्या दृष्टीने निश्चित सुसूत्र पध्दती स्वीकारणाऱ्या कुटुंबाचा समूह म्हणजे आदिवासी समाज होय."(A

Tribe is a collection of families or groups of families bearing a common name, members of which occupy the same territory, speak the same language and observe certain taboos regarding marriage, profession or occupation and have developed a well assessed system of reciprocity and mutuality of obligations. – D.N. Majumdar)"[13]

४. भारतीच संस्कृती कोशात. 'आर्य व द्रविड हे भारतातील दोन मोठे मानव समाज सोडून त्यांच्याही पूर्वी भारतात राहणारा किंवा बाहेरच्या दे ातून येऊन वने व पर्वत यांच्या आश्रयाने स्थायीक झालेल्या जमातींना वन्य जाती किंवा आदिवासी असे म्हणतात.'असे आदिवासींचे स्पष्टीकरण केले आहे."[14]

वरील वेगवेगळ्या विचारवंतानी केलेल्या व्याख्येवरुन आदिवासींचा अर्थ असा स्पष्ट होतो की, आदिवासी समाज हा इतर कोणत्याही समाजापेक्षा अनेक दृश्टीने वेगळा समाज आहे. एकंदरीत आदिवासी समाजाविशयी सांगावयाचे झाल्यास समान जीवन पध्दती, एका वि ाश्ट भूपदे ात निवास, एकाच रक्तसंबंधावर आधारित, समान धर्म, स्वतःची वेगळी अ ी लिपी विरहीत बोलीभाशा, विज्ञानाच्या बाबतीत मागसलेला, सामाजिक एकजिनसीपणा, पारंपारिक रुढी, प्रथा, चालीरिती, साधी अर्थव्यवस्था, सीमीत तंत्रविद्या, इत्यादी वेगळेपणा जोपासणारा समाज म्हणजे आदिवासी समाज, त्याचबरोबर सरळ व साधा सामाजिक समूह, एकाच पूर्वजापासून उत्पत्ती सांगणारा, रीतिरिवाजांचे प्रामाणिकपणे पालन करणारा, समान भाशा व संस्कृती असलेला, प्रामुख्याने डोंगर दऱ्या खोऱ्यात व ग्रामीण भागात वस्ती करुन राहणारा व एकाच भूप्रदेशावर वास्तव करणारा. मानव समूह म्हणजेच आदिवासी समुदाय म्हणता येईल.

## आदिवासी लोककथा :

कथा म्हणजे काय व तिची लक्षणे कोणती हयासंबंधीची सविस्तर चर्चा भारतीय व प्रा चात लोकसाहित्यवि ारदांनी केलेली आहे. ब्राम्हणे, उपनिशदे, वेद, संहिता, पुराणे, श्रुती व स्मृती इत्यादींमध्ये देखील कथा म्हणजे काय ? हयाची चर्चा केलेली आढळते. कथा म्हणजे सांगणे किंवा निवेदन करणे असा धातु संहितेत सापडतो. आख्यायिका हा भाब्द तैतिरीय आरण्यकात आणि आख्यान हा भाब्द ऐतरेय ब्राम्हणात सापडतो. अन्वाख्यान म्हणजे आख्यानाला अनुसरणारे किंवा पूरक असे निवेदन किंवा उपकथा. हा भाब्द भातपथ ब्राम्हणात तीन ठिकाणी वापरलेला आहे, अशी माहिती दुर्गा भागवत हयांनी आपल्या लोकसाहित्यांची रूपरेशा हया ग्रंथात दिलेली आहे. ऋगवेदात भुनः ेपकथा, गौतमकथा, त्रितकथा, भृंगारकथा इत्यादी अनेक कथासुक्ते आढळतात.

स्वातंत्र्यानंतर आदिवासी लोकसाहित्याचे संकलन पा चात्य आणि भारतीय या दोघांनीही केले. पाश्चात्य अभ्यासकांच्या नामावलीत व्हेरीअर एल्वीन, जे.एफ.हेवीट, क्रिस्टॉप हैमनडार्फ, स्टेफन फक्स, डब्ल्यू.व्ही. ग्रीक्सन, आर.ई. एथोव्हेन यांच्या नावांचा प्रामुख्याने करांवा लागतो. ज्या भारतीयांनी आदिवासी लोकसाहित्यांचा संग्रह व अभ्यास केला, त्यांची नामावली फार मोठी आहे. डॉ. सरोजिनी बाबर, डॉ.म.ना.सहस्त्रबुध्दे, साने गुरूजी, डॉ. तारा भवाळकर, ना.रा.भोंडे, डॉ. रा.चि.ढेरे, वामन चोरघडे, डॉ.भाउ मांडवकर, डॉ. नरे ा कवडी, डॉ. मधुकर वाकोडे, डॉ. सौ. भैलेजा देवगावकर, डॉ एस.जी. देवगावकर, प्रा. माधव बावणे, सोपनदेव चौधरी, सिंधुताई अंबिके, कविता महाजन, डॉ. प्रदीप विटाळकर, दा.गो. बोरसे आणि डॉ. अलका हिवाळे यांचा नामावलीत प्रामुख्याने उल्लेख करावा लागतो. याि ावाय अलीकडे अनेक आदिवासीतर अभ्यासकांनी आदिवासी लोकसाहित्याचे संकलन व अध्ययन करून ते उजेडात आणले आहे. या नामवलीत आदिवासी अभ्यासकांचाही समावेश आहे.

आदिवासी लोकसाहित्याचा संग्रह करून ते प्रसिध्द करण्याचे भरीव कार्य ज्या सुशिक्षित आदिवासी मंडळीने केले आहे, त्यात गंगाराम जानू आवारी (आदिवासी लोकगीते, 1982, आदिवासी विकास प्रतिष्ठान, पुणे व आदिम साहित्य, पुणे), महादेव गोपाळ कडू व डॉ. गोविंद गारे (आदिवासींची गौंड गाणी, 1981, आदिम साहित्य, पुणे), डॉ गोविंद गारे (आदिवासी लोकगीते, 1986 आदिवासी सं शोधन साहित्य व प्रशिक्षण संस्था, पुणे), वंकटे श आत्राम (परधानांचा शिमगा फाग 1979, परधानांचा लग्नोत्सव 1993, मोहेंजोदारोतील शिल्पे आणि गोंडी संस्कृतीचे संदर्भ 1979, गोंडी भाषेतील वाड.मय 1979, भारतीय शिल्पे आणि गोंडी संस्कृतीचे संदर्भ 1981 इत्यादी लेखांमधून त्यांनी परधान व गोंड जमातींच्या लोकगीतांचे व लोककथांचे दर्शन घडविले आहे.), भुंजग मेश्राम (गोंडी म्हणीतून दिसणारे लोकजीवन 1982 गोंडी लोकगीतांमधील सौदर्य आणि वास्तवता 1980 या लेखांमधून त्यांनी गोंडांच्या म्हणी व त्यांची लोकगीते यावर प्रकाश टाकला आहे.). एम.सी कंगाली (पारीकुपार लिंगो गोंडी पुनेम द र्शन, 1989), वाहरू सोनवणे, काळुराम धोदडे, डॉ. विनायक तुमराम, विठलराव कन्नाके गुरूजी, चामुलाल राठवा (देहवाली साहित्य 2001, साहित्य अकादमी, दिल्ली) या नावांचा प्रामुख्याने गौरवपूर्ण उल्लेख करावा लागतो. या सर्व अभ्यासकांनी वेगवेगळ्या आदिवासी जमातींमध्ये जाउन, त्यांच्यात मिसळून त्यांच्या लोकसाहित्याला शब्दबध्द केले आणि ते प्रसिध्द करून आदिवासींच्या नवपिढीपुढे ठेवले.

डॉ. गोविंद गारे, "आदिवासी लोककथा", कॉन्टिनेन्टल प्रका शन, पुणे यांच्या ग्रंथातील कोकणा आदिवासी लोककथा पृ.क्र. 21 ते 68, वारली आदिवासींच्या लोककथा पृ.क. 74 ते 113, भिल्ल, पावरा आदिवासींच्या लोककथा पृ.क. 116 ते170, गोंड परधान, मांडिया गोंड आदिवासींच्या लोककथा पृ.क. 173 ते 186, कोरकू आदिवासींच्या लोककथा पृ.क्र. 188 ते 191, आदिवासींच्या संकीर्ण लोककथा पृ.क. 193 ते 195 या संदर्भीय लोककथेचा समाजशास्त्रीय अभ्यास केला असता असे दिसून येते की, आदिवासींच्या लोककथेत प्राणीकथा, लोककथा, लोककथागीत, स्थानिय लोककथा, आख्यायिका, पराकमकथा, परिकथा, वीरकथा, विधीकथा, संमिश्र कथा, नीतीकथा, दैवतकथा, अदभुत कथा, उत्पतीकथा, दंतकथा, बोधकथा, हांस्यकथा, अनुभव कथा, देवदेवतांवर आधारित लोककथा, पशुपक्षांवर आधारित लोककथा आहेत.

कथा आणि आदिवासी हयांचा अगदी निकटचा संबंध आहे. त्यांच्या लोककथा त्यांच्या अस्तित्वाबदल प्राचीन आहेत. लोककथा हया आदिमांच्या ऋचा आहेत. ज्ञान विज्ञानाची सांगड त्यात आढळून येते. आदिमांच्या प्राचीन सांस्कृतिक हालचाली त्यातून दिसून येतात. त्यांचे गतकालीन अस्तित्व, त्यांचे सर्व प्रकारचे व्यवहार, त्यांचा आचारधर्म, नीति नियम, कुळगोत्रापध्दती, जीवनपध्दती, जीवनवि षयक दृश्टिकोन, भाव भावना, आश आकांक्षा, इत्यादींचे वर्णन त्यांच लोककथांमधून होत आहे.

आदिवासी लोककथा म्हणजे आदिवासी लोकसाहित्याच्या महानगरातील एक भव्य, गगनचुंबी व चित्तवेधक, मिनार होय. आदिवासी लोकसाहित्याच्या राजगृहातील एक कोरीव व नक्षीदार स्तंभ म्हणजे आदिवासी लोककथा, लोकगीते, लोककथागीते, वाक्यप्रचार, म्हणी, उखाणे हे जे आदिवासी लोकसाहित्याचे अंतःप्रवाह आहेत, त्यातील एक सशक्त व प्रभावी अंतःप्रवाह म्हणजे आदिवासी लोककथा होय. आदिवासींच्या जगण्यावागण्यातील बारकावे धारण करणाऱ्या त्यांच्या कथा अ शाच कुठेतरी रानोमाळ व पाडया टोल्यावर विखुरलेल्या होत्या. गिरिकुहरात व जंगलजिव्हाळ्यात बंदिस्त होत्या. आदिवासींच्या लोककथेत आदिवासींचे चित्कार, हुंकार, त्यांचा हाकार, त्यांची दृश्टी सृश्टी, सामूहिक मानसिकता, कौटुंबिक धारणा, पथ्ये, त्यांच्या आ शा, आकांक्षा, भाव भावना, श्रध्दा अंधश्रध्दा, रूढी परंपरा, प्रेरणा प्रवृत्ती, कृती, रागजुती स्व व

समष्टी मानसिकतेचे त्यांचे आकलन, त्यांचे रीतिरिवाज, परिस्थितिजन्य वैशिष्ट्यांची छाप घेऊन आलेले त्यांचे अस्सल जीवनानुभव आणि तंत्रमंत्र, जादुटोणा व गंडेदोरे यात आदिवासींच्या लोककथेचे रूप दिसून येतात.

लोककथा हे लोकवाङ्मयाचे एक स्वतंत्र व समृद्ध दालन आहे. लोककथेची प्रदीर्घ परंपरा त्याच्यामागे उभी आहे. लोकसाहित्याच्या संग्राहकांनी व अभ्यासकांनी आपआपल्या परीने हे दालन समृद्ध करण्याचा प्रयत्न केलेला आहे. ह्या प्रयत्नांची नोंद घ्यायची म्हटले आहे त्यात सर रिचर्ड, अलेक्झांडर कोप, ऑटो आर्ने, स्टिथ थॉम्पसन, लिन डेग, मॅक्सम्युलर, डी. एल्विन, पारकर कुक,ॲंड्रयू लॅंग, मेरी फॉक्टर, फ्रेझर आणि लिन मारिया इत्यादींच्या नावांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागतो.

प्रत्येक समाजात जो वयोवृद्ध, ज्ञानवृद्ध आणि अनुभवी वर्ग असतो त्या वर्गाजवळ कथांचा भरणा अधिक असतो. खेड्यापाड्यात आजही कथा मोठ्या चवीने आणि आवडीने ऐकल्या जातात. त्यात राजाराणीच्या कथा, पशुपक्ष्यांच्या कथा, रामायण आणि महाभारतातील कथा अशा अनेक प्रकारच्या कथा असतात. त्याच प्रकारच्या लोककथा आदिवासींच्या लोककथेत दिसून येतात. वारली, भिल्ल, गोंड, परधान, माडिया, कोकणा, महादेव कोळी, इत्यादी जमातीच्या लोककथेत दिसून येतात. या लोककथेत बोधप्रद कथा, अंतर्मुख करणाऱ्या आणि धार्मिक, सांस्कृतिक मूल्यांनी ठासून भरलेल्या दिसून येतात. सर्वसाधारण आदिवासींच्या लोककथेत पशु, पक्षी, फळे, फुले, वृक्ष, नाले, जलाशय, पहाड, चंद्र, तारे, देवदेवता, धर्मविधी, सणोत्सव यांचा आढळ आदिवासी लोककथामध्ये दिसून येतो. आदिवासी जमाती परस्परांहून भिन्न दिसत असून, भिन्न भौगोलिक वातावरणात व भूप्रदेशात त्या राहतात, तरीही त्यांच्या लोककथांमध्ये भाषिक वेगळेपण सोडल्यास एकसारखेपणाच्या कथा वाटतात.

1. आदिवासी लोककथा पारंपारिकतेने एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे चालत आलेली मौखिक स्वरूपातील ही देणगी असल्याचे दिसून येते.
2. आदिवासी लोककथेतून लोकसमूहाची(आदिवासी जमाती) निर्मिती कशी झाली, याचा विचार झालेला आहे.
3. आदिवासी या मूळ निर्मिता अज्ञात असतो. तरी पण त्यात व्यक्तिविशिष्टत्व न राहता समूह म्हणून ओळखला जात आहे.
4. आदिवासी च्या लोककथा म्हणजे त्यांच्या समाज जीवनाच्या व लोकसंस्कृतीच्या अभ्यासाचे ते एक महत्वाचे साधन असते. कारण त्यात मानवाने युगानुयुगे घेतलेल्या अनुभवांचे सार आहे.
5. आदिवासी लोककथेचा प्रमुख आधार म्हणजे स्वाभाविकता असल्याने भाषेच्या प्राचीन रूपाचा वेध जाण्याचा लोककथेत दिसून येतो.

आदिवासी समुदायांच्या लोककथा ह्या त्यांच्या अस्तित्वाइतक्याच प्राचीन आहेत. लोककथा ह्या आदिवासींचा जीव की प्राण आहेत. त्या प्राचिन आहेत. ज्ञान, विज्ञानाची सांगड त्यात आढळून येते. आदिवासींच्या प्राचीन सांस्कृतिक हालचाली त्यातून दिसून येतात. त्यांचे गतकालीन अस्तित्व, त्यांचे सर्व प्रकारचे व्यवहार, त्यांच्या आचारधर्म, नीती नियम, कुळगोत्रपध्दती, जीवनविषयक दृष्टीकोन, भाव भावना, आशा आकांक्षा इत्यादींचे दर्शन त्यांच्या लोककथांमधून दिसून येते. लोककथा ही आदिवासी समुदायाच्या सामूहिक चेतनेचे प्रतिनिधित्व करणारी असते. आदिवासी समुदायांच्या लोककथा ह्या जशा रोचक, भावपूर्ण तशा त्या गंभीर व बोधप्रदही दिसून येतात.

आदिवासी समुदाय हा निर्धन असेल, निरक्षर असेल पण तो असंस्कृत नाही हे आदिवासींच्या लोककथेतून दिसून येते. त्याला स्वतःची बोलीभाषा आहे, रितिरिवाज आहेत, दैवते आणि धर्मविधी आहेत, सणसमारंभ आणि साहित्यकलाही आहे. ह्य

समाज विपुरिमुख, सुंडकाली अणि दिकावार व सुरीन्द्रक अस्तित्व जो बारता हे त्याला लाभलेला पुढे सांस्कृतिक वारसा हेच वारसा हेच.

संदर्भ सूची


१ शिराळे धेवेंशील (2002)' आदिवासी कथा आणि कथा स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे पृ. क.13

२. डॉ. कुलकर्णी शौनक .(2009)' महाराष्ट्रातील आदिवासी डायमंड पब्लिकेशन, पुणे पृ. क. 02.

३. डॉ. गारे गोविंद (1993)आदिवासी समस्या आणि बदलते संदर्भ. सुगावा प्रकाशन, पुणे पृ.क. 7

४. डॉ गारे गोविंद (2002)'महाराष्ट्रातील आदिवासी जमाती' कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे पृ.क. 01.

५. Thakkar Bapa and Grigasun (1941) "Hamare Adivasi Bhai," New Delhi. Parkshan Vibhang pp – 87

६. डॉ गारे गोविंद (2002)'महाराष्ट्रातील आदिवासी जमाती' कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे पृ.क. 01.

७. म.महादेवशास्त्री जोशी संपा.(1962)भारतीय संस्कृती कोश' भारतीय संस्कृती कोश मंडळ, पुणे खंड पहिला पृ.क. 427

८. Constitution of India Article – 275

९. Ghurye G.S. (1963) 'The Scheduled Tribes', (Third Edition), Popular Prakashan, Bombay, p.p. 20

१०. गुरुनाथ नाडगोंडे, (2003)'भारतीय आदिवासी' कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, पृ. क.1

११. Geelin and Geelin, 'Note on the Bhonde Koomurs,'Journal of Anthropological Society of Bombay vol. I, 1989, pp. 35.

१२. Dr. Revers, ' The Ethnic and'Cultural Units in Tribes,' Indian Institute of Advanced Study, Simla, 1969, pp. 79.

१३. Dr. Majumdar D.N., 'Race and Cultivate of India,' Asia publishing house, Bombay, 1961, pp. 48.

१४. महादेव शास्त्री जोशी संपा.(1962)भारतीय संस्कृती कोश' भारतीय संस्कृती कोश मंडळ, पुणे खंड 9 पृ. क्र. 425

१५. डॉ. गोविंद गारे, आदिवासी लोककथा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.

१६. डॉ. गोविंद गारे, (1998) आदिवासी विकासातील दीपस्तंभ, श्रीविद्या प्रकाशन, पुणे.

१७. संपादक डॉ. प्रमोद मुनघाटे,(2007), आदिवासी मराठी साहित्य स्वरूप आणि समस्या, प्रतिमा प्रकाशन,पुणे.

१८. डॉ. विनायक तुमराम, (1994), आदिवासी साहित्य स्वरूप आणि समीक्षा, विजय प्रकाशन, पुणे.

१९. डॉ. अलका हिवाळे, (2002), आदिवासी लोकगीतांतील स्त्री जीवन, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद.


◆◆◆

Impact Factor – 6.625

E-ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

January 2021

Special Issue 259 (B)

## वैश्विक परिदृश्य में भारतीय भाषाएं, संस्कृति और साहित्य की पारस्पारिकता




Guest Editor -
Dr. Babasaheb M. Gore,
Principal,
Janvikas Mahavidyalaya Bansarola,
Tq.- Kaij, Dist.- Beed

Executive Editors :
Prof. Dr. Murlidhar A. Lahade
Dr. Gopal S. Bhosale
Dr. Ramesh M. Shinde
Dr. Arvind A. Ghodke

Chief Editor : Dr. Dhanraj T. Dhangar

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | शीर्षक | लेखक/लेखिका | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| 1 | उत्तर भारत की रामलीला की विशेषताएं | डॉ. अमिला दमयंती | 07 |
| 2 | वैश्विक परिप्रेक्ष्य में हिंदी भाषा | प्रधानाचार्य डॉ. बाबासाहेब गोरे | 10 |
| 3 | प्रतिरोध की आत्माभिव्यक्ति : शिकंजे का दर्द | डॉ. रमेश शिंदे | 14 |
| 4 | हिंदी उपन्यासो में आदिवासी विमर्श | डॉ. के. बी. गंगणे | 19 |
| 5 | हिंदी कहानियों में किन्नर विमर्श | डॉ. विरश्री आर्य | 22 |
| 6 | हिंदी साहित्य में दलित चेतना | डॉ. विश्वनाथ मालेराव | 26 |
| 7 | भारत के सांस्कृतिक संघर्ष में दलित साहित्य की भूमिका | प्रा. किरण भोसले | 29 |
| 8 | मराठी लेखक श्रेणीक अन्नदाते की कहानियों में व्यक्त जैन जीवन | डॉ. महावीर उदगीरकर | 33 |
| 9 | वैश्विकरण और बाजारवाद के दौर में हिंदी की बदलती भूमिका | डॉ. यशोदा मेहरा | 37 |
| 10 | हिंदी की वैश्विक स्थिति | डॉ. रेविता कावळे | 40 |
| 11 | भारतीय संस्कृति तथा प्राचीन साहित्य | डॉ. कुमारी प्रेमलता | 43 |
| 12 | 'जूठन' आत्मकथा में दलित विमर्श | अमृता तौर, डॉ. बी . आर. नळे | 47 |
| 13 | भारत की धार्मिक एंव व्यापारिक यात्राएं : धर्म संस्कृति एंव भाषाओं की संवाहक | डॉ. संदीप कालभोर | 50 |
| 14 | समकालीन हिंदी उपन्यासों में किन्नर विमर्श | डॉ. अमरनाथ तिवारी | 53 |
| 15 | हिंदी साहित्य की महिला प्रवासी साहित्यकार | डॉ. द्वारका गीते - मुंडे | 57 |
| 16 | विश्व साहित्य में प्रवासी हिंदी साहित्य का योगदान | डॉ. अमित शुक्ल | 60 |
| 17 | स्त्री विमर्श का सौंदर्य : जोतिबा फुले | छत्रसींग तडवी | 64 |
| 18 | कृष्णा सोबती के उपन्यासो में नारी का संघर्ष | डॉ. गजानन बने | 67 |
| 19 | छायावादी काव्य में सांस्कृतिक चेतना | डॉ. ज्ञानेश्वर गाडे | 69 |
| 20 | लोकसाहित्य में लोकगीतों का महत्व | डॉ. नरसिंगदास बंग | 72 |
| 21 | सांस्कृतिक पर्व और मुस्लिम कथाकार | डॉ. यतींद्र सिंह | 75 |
| 22 | आदिवासी जन-जीवन एवं वर्तमान शिक्षा व्यवस्था | डॉ. मो. माजिद मियाँ | 79 |
| 23 | मराठी दलित साहित्य का हिंदी साहित्यपर प्रभाव | डॉ. सुधीर वाघ | 84 |
| 24 | वैश्विक परीदृश में भारतीय संस्कृति और साहित्य : हिंदी उपन्यासों के संदर्भ में | डॉ. कल्पना पाटोळे | 87 |
| 25 | भारतीय संस्कृति और साहित्य | डॉ. अंजली कायस्था | 90 |
| 26 | भारतीय संस्कृति और साहित्य | विनिता कुमार | 95 |
| 27 | भारतीय संस्कृति व संस्कार | डॉ. सुषमा पुरवार | 98 |
| 28 | भारतीय संस्कृति और साहित्य | डॉ. अनिता प्रजापत | 102 |
| 29 | भारतीय संस्कृति और साहित्य | डॉ. राम खलंग्रे | 105 |
| 30 | समकालीन आदिवासी कविता के नये स्वर | डॉ. अनिलकुमार राठोड, प्रा. हिरामण टोंगारे | 109 |
| 31 | आदिवासी लोकसाहित्यातील स्त्री –जीवनाचा समाजशास्त्रीय अभ्यास | डॉ. गंगाराम सुरेवाड | 113 |
| 32 | भारतीय संस्कृति एवं साहित्य | डॉ. अमिता श्रीवास्तव | 117 |
| 33 | भारतीय संस्कृति और साहित्य | प्रा. सुनील शिंदे | 121 |
| 34 | कृष्णा सोबती की कहानियों में व्यक्त नारी समस्याएँ | डॉ. वंदन जाधव | 123 |

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.625 (2019),
Special Issue -259 (B) 'वैश्विक परिदृश्य में भारतीय भाषाएं, संस्कृति और साहित्य की पारस्पारिकता'
Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
Jan. 2021

# आदिवासी लोकसाहित्यातील स्त्री-जीवनाचा समाजशास्त्रीय अभ्यास

**प्रा. डॉ. संजय गंगाराम सुरेवाड**
सहा. प्राध्यापक व विभाग प्रमुख,
समाजशास्त्र विभाग
यंशवतराव चव्हाण महाविदयालय, अंबाजोगाई.

आधुनिक भारताचा समाजशास्त्रीय अभ्यास करताना वहुधा शहरी भारत आणि ग्रामीण भारत असे विभाजन केले जाते. असे विभाजन करताना एका महत्वाचा समुहाकडे दुर्लक्ष होतांना दिसून येते. हा महत्वाचा विभाग म्हणजे वनवासात राहणारा आदिम भारत होय. हा आदिम भारताचा शोध मानववंश शास्त्रज्ञ, धर्मप्रसारक, व लोकसाहित्याचे संग्राहक यांचा कसोशीने घेत आहेत. स्वांतत्र्योत्तर काळात आपल्या देशामध्ये ज्या विविध राजकिय आणि सामाजिक घडामोडी घडताहेत त्याचा परिणाम म्हणून हा आदिवासी समाज वेगाने जागृत होत आहे. त्याला एक नवे आत्मभान प्राप्त होत आहे. हया समाजात साक्षरांची आणि शिक्षितांची संख्या अत्त्यल्प असली तरी मूठभर का होईना नवशिक्षित आणि उच्च शिक्षित तरूण हा समाजातून पुढे येत आहेत.

आदिवासी समाज निर्धन असेल , निरक्षर असेल पण तो असंस्कृत नाही हे लक्षात ठेवले पाहिजे. त्याला स्वतःची स्वतंत्र आणि अर्थपूर्ण संस्कृती आहे. त्याला स्वतःची बोली आहे, रीतिरिवाज आहेत, दैवते आणि धर्मविधि आहेत. सण-समारंभ व साहित्या-कला आहेत. शहरी समाजापेक्षा आदिवासी समाजाचे हे वैशिष्टे नेहमी वेगळे असतात. हा समाज विभूतिपूजा व प्रगत समाजाच्या दुर्गणापासून अलिप्त आहे. हयाचे कारण त्याला लाभलेल्या सुदृढ सांस्कृतिक वारसा लाभलेला आहे. हया समाजाजवळ परंपरागत मौखिक लोकसाहित्य आहे हयाची जाण बहुतेक अभ्यासकांना झाली आहे. परंतु हया समाजातील अल्पशिक्षित आणि उच्चशिक्षित तरूणवर्ग आज नव्या जाणिवे साहित्य-निर्मिती करतानाद दिसून येत आहे.

वैदिक आणि त्यानंतरच्या काळात हया आदिवासी समुदायाकडे पाहण्याचा भारतीय समाज व्यवस्थेतील जनसामान्यांचा व पुढारलेल्या दृष्टिकोन हा उपहासात्मक व विघटनात्मक होता. आदिवासी संस्कृतीचे अभ्यासक व संशोधक डॉ. गोविंद गारे हयाविषयी लिहितात, आदिवासी म्हणजे निबीड अरण्यात नग्रार्धग्रावस्थेत राहणारे नरभक्षक, कच्चे मास खाणारे, शिकार करून जगणारे तसेच त्यावेळी लोकांना वाटत होते. आदिवासी हे नावही त्यावेळी रूढ झालेले नव्हते. आदिवासी हे निषाद, किरात, वाल्या कोळी आणि शबरी हयांचे वंशज आहेत व त्यामुळे तु दुराचारी दुष्ट आणि क्रूर आहेत अशी लोकांची कल्पना होती. रामायण, महाभारताच्या काळापासून जुन्या वाङ्.मयात त्यांचे वर्णन कावळयापेक्षा काळे, धरतीचे पापी प्राणी, खुजे चपटया नाकाचे, लुटारू, राक्षस, नरभक्षक वगैरे उपहासात्मक व हीन लेखणाऱ्या शब्दांनी केलेले आढळते.

इंग्रज संशोधक, मानववंश शास्त्रज्ञ व समाजशास्त्रज्ञांनी भारतातील वन्य जमातींच्या सामाजिक जीवनाचा, भाषेचा, संस्कृतीचा, वंशाचा व लोकवाङ्.मयाचा शास्त्रीय अभ्यास केला व आपला दृष्टीकोन मांडला अनेक ग्रंथ लिहिले आणि हे वन्य जीवन व सुसंस्कृत समाजाच्या पुढे उभे केले. त्यांचे हे ग्रंथकर्तृत्व अभ्यास करण्याच्या दृष्टीने व भूतकाळातील घटनांचा मागोवा घेण्यासाठी फार मोलाचे ठरले आहे. आदिवासी म्हणजे निश्चित कोण याविषयी गिलीन आणि गिलीन हयांच्या मते, एका विशिष्ट भू-प्रदेशावर राहणारा, समान बोली बोलणारा व समान सांस्कृतिक जीवन जगणारा पण अक्षरओळख नसलेल्या स्थानीय गटांच्या समुच्चयाला आदिवासी म्हणतात.

लोकसाहित्य म्हणजे पारंपारिक लोकजीवनपध्दती, लोकमानसाची अभिव्यक्ती असल्याने लोकजीवनाच्या अभ्यासात लोकसाहित्याचे अनन्यसाधारण महत्व आहे. लोकजीवनाचा अभ्यास करताना त्या लोकजीवनात प्रचलित

असलेल्या परंपरा, लोकसमजुती, लोकश्रध्दा, लोकभ्रम, आचार-विचार, रूढी-प्रथा, विधी-विधाने तसेच मौखिक रूपातील शाब्द आविष्कार इत्यादी घटक विचारात घ्यावे लागतात. लोकजीवनातील मौखिक परंपरेने घडणाऱ्या शाब्द आविष्कारातून लोकवाङ्मयाला सपंन्नता येत असते. लोकवाङ्मय हे त्यास पारंपरिक लोकजीवनाचे एक अविभाज्य अंग असल्याने लोकजीवनाचे प्रतिबिंब त्यात पाहावयास मिळते. म्हणजेच लोकजीवनाचा अभ्यास करताना लोकसाहित्य महत्वाचे ठरते. लोकसाहित्याचा बराच भाग लोकगीतानी त्यातला त्या स्त्री-गीतें व्यापला आहे. मौखिक रूपात स्त्रियांनी निर्माण केलेली आणि मौखिक रूपानेच स्त्रियांत कित्येक शतकांपासून प्रचलित असलेले लोकगिते म्हणजेच स्त्री-गीते. स्त्री-गीते स्त्री-जीवनाचा अविभाज्य भाग असल्याने व जीवन जगण्याच्या पध्दतीतुन स्त्री-गीताची निर्मीती झालेली असल्याने स्त्री जीवनाचा अभ्यास करताना ही गीते महत्वाची ठरतात. स्त्री-गीतांतून स्त्री-जीवनाचे स्त्री-मनाचे ,जसे नितळ आणि उत्कट प्रतिबिंब पडलेले पाहावयास मिळत तसेच पारंपारिक स्त्री-जीवनाच्या अभ्यासाचे एक महत्वाचे साधन म्हणूनही स्त्री-गीतांना महत्व आहे. अशा स्त्री-गीतांचा स्त्री-जीवनाच्या संदर्भात सामाजिक आणि सांस्कृतिक पार्श्वभूमीवर अभ्यास होणं महत्वाचे आहे.

स्त्री-गीतांतून तत्कालीन वास्तव स्त्री-जीवनाचे चित्र पहावयास मिळते. पुरूषप्रधान संस्कृतीत स्त्रीवर लादलेली बंधने, तिच्यावर असलेले पुरूषाचे वर्चस्व आणि त्यातून नाकारलेले तिचे अस्तित्व, त्यामुळे स्त्री-जीवनाची होणारी अवस्था समाजव्यवस्थेत तिलार दिलेले गौण स्थान अशा स्त्री-जीवनाच्या अभ्यासाच्या दृष्टीने स्त्री-गीते महत्वाची ठरतात. सामाजिक आणि सांस्कृतिक पार्श्वभूमीवर स्त्री-गीतांचा अभ्यास महत्वाचा ठरला आहे. प्रस्तुत संशोधन विषयाचा अभ्यास करताना आदिवासी लोकसाहित्यातील स्त्री-गीते इतकाच मर्यादेत ठेवलेला आहे.

आदिवासी स्त्री-गीतांतून अविष्कृत होणाऱ्या स्त्री- जीवनात व्यक्तिजीवनावरोबर कौटुंबिक आणि सामाजिक जीवनाचे संदर्भ पाहावयास मिळतात.अशा या गीतांतून स्त्री जीवनात तिच्या बालपणीचा मुक्त आनंद, तारूण्यातील नवथर भवना, लग्न, संसार, संयुक्त कुटुंबातील सुखःदुखे, अनुभव, पतिसहवासाचे सुख मातृत्वातील वात्सल्य, अपत्यप्रेम, या विविध प्रसंगाचे अनुभव व दर्शन स्त्री-लोकगीतांतून घडते. आदिवासी स्त्री-लोकगीतांतून धार्मिक, सांस्कृतिक जीवनाचे दर्शन घडते. आदिवासी स्त्रियांच्या गीतांत परंपरा विचारांचे दर्शन घडते. कधी कधी त्यातून हलकाफुलका विनोद तर कधी मनोरंजन आढळते. शिक्षणाच्या वाढत्या प्रसारमुळे आज जरी आदिवासी भागात जाणीव जागृती होत असल्याचे चित्र दिसत असले तरी त्याच्या फायदा खऱ्या आदिवासीपर्यंत पोहोचत नाही ही वस्तुस्थिती आहे. दैनदिन जीवनातील गाण्यात पुरूषांपेक्षा स्त्रियाच अधिक भाग घेतात. गाणे म्हणताना अनेक भावभावना त्यात प्रदर्शित होतात. त्यातल्या त्यात वात्सल्य, संसार, नात्यागोत्यातील माणसांवरचा लोभ आशा भावनांना प्रमुख स्थान आहे.

आदिवासी स्त्री-गीतांच्या ज्यावेळेस सामाजिक अभ्यास करताना असे दिसून येते की, त्या समाजाच्या धारणाही लक्षात घेणे महत्वाचे ठराते. कारण या धारणतेतूनच आदिवासी स्त्री- मनावर संस्कार होत असतात. धर्मविधी, व्रतवेकल्ये, पूजाअर्चा, उपासना, नवससायास इत्यादी धार्मिक बाबी स्त्रीला स्वतःच्या आत्मिक उन्नतीपेक्षा पुरूषांच्या सुखी जीवनासाठीच पाळाव्या लागतात. पतीला दीर्घयुष्य लाभावे, त्याला त्याच्या व्यवसायात यश मिळावे, पुत्रप्राप्ती व्हावी यासारख्या उदेदशांनी ही स्त्री व्रत करीत असते. असे आदिवासी लोकगीतातून दिसून येते.

आदिवासींच्या विविध बोलीभाषा आहेत. परंतु त्यांना लिपी नाही. काहींना (गोंडी) लिपी आहे. परंतु लोकांना ते माहित नाही. त्यामुळे लिपींशिवाय साहित्य असेच आदिवासी साहित्याचे आजचे स्वरूप आहे. आदिवासी साहित्य हे व्यापक स्वरूपाचे साहित्य आहे. मग ते कोरकू जमातीवरील साहित्य असो वा गोंड, भिल्ल, परधान, कोलाम, आंध महादेव कोळी, वारली हया जमातीवरील साहित्य असो किंवा आणखी इतर कोणत्याह जमातीवरील साहित्य असो, त्या सर्वांचा समावेश आदिवासी साहित्यातच होईल. आदिवासी जीवन-संस्कृतीच्या अभ्यासकांनी आदिवासींच्या लोकसाहित्याचाही अभ्यास अलिकडे सुरू केल्यामुळे बरेचसे लोकसाहित्य उजेडात आले आहे. त्यांचया प्रामाणिक व भरीव प्रयत्नांमुळे

चटकन नजरेत भरावे असे हया लोकसाहित्याचे दखलपात्र अस्तित्व आज सिध्द झाले आहे. असे असले तरी हया लोकसाहित्याचा फार मोठा भाग अजूनही अप्रकाशितच आहे. अलिखित आहे. हया दृष्टीने विचार केल्यास आदिवासी साहित्याचे मुख्यतः दोन भाग पडतात. १. लिखित साहित्य २. अलिखित साहित्य., आदिवासींच्या अलिखित साहित्याचा शोध घेणे सुरू असल्यामुळे भविष्यात त्या साहित्याचा चेहरामोहरा दिसणारच आहे, अभ्यासही होणारच आहे. लिखित साहित्यात आदिवासींचे प्रकाशित लोकसाहित्य, नवशिक्षित आदिवासी कवी-लेखकांनी नव्या जाणीवेने, प्रेरणेने व पोटतिडकीने लिहिलेले आणि नियमतकालिकांमधून प्रसिध्द झालेले नवसाहित्य, (उदाहरणार्थ - कथा, कविता, समीक्षा व वैचारिक लेख इत्यादी ) तव्दतच स्वतंत्र ग्रंथिक साहित्य इत्यादींचा अंतर्भाव होतो. भिन्न- भिन्न भाषामध्ये निर्माण झालेले, वेगवेगळया भौगोलिक पर्यावरणात वाढलेले आणि परिस्थितीजन्य वैशिष्टयांची छाप असलेले हे आदिवासीचे साहित्य आहे.

भारतातील ज्या जमातींना आदिवासी म्हणून ओळखले जाते, त्यापैकी गोंड ही एक जमात होय. गोंड स्वतःला कोयवंशीय कोयतूर म्हणवून घेतात. त्यांचा वेगळा धर्म व संस्कृती असून ती कोयतून संस्कृती हया नावाने ओळखल्या जाते. गोंड ही एक जात नसून तो अनेक उपजाती मिळून बनलेला समाज आहे. गोंडी भाषा ही वन्य भाषा आहे. प्रादेशिक सान्निध्यामुळे तिच्यात मराठी, हिंदी, तेलगू, कानडी शब्द आले आहेत. व अशी मिश्रीत भाषा हल्ली प्रचलित आहे. असे असले तरी गोंडी भाषेवर मराठी, हिंदी, तेलगू, कानडी, संस्कृत हया भाषांमधील शब्दांचा प्रभाव वैगेरे मुळीच पडला नसून प्रादेशिक सान्निध्यामुळे शब्द आले आहेत. गोंडी भाषेतील शब्द : उंदी ( एक), हिल्ले ( नाही), होर ( तो), बोर ( काही), वातुर( आला), हात्तुर ( गेला), इत्तुर ( घेतला), नावा ( माझा, माझे), होना ( त्याचा), सिम ( देणे), पुळी ( वाघ), येर ( पाणी), अवा ( आई), मळ्ठा ( टेकडी), मंदा ( आहे) इत्यादी शब्द दिसून येतात.

आदिवासींमध्ये भिन्न-भिन्न जाती आहेत. त्यांची स्वतंत्र संस्कृती आहे. पाश्चात्य संशोधकांनी त्याची आपल्या ग्रंथातून मांडणी केली आहे. आदिवासी लोकगीतातून ते स्त्री-जीवन घडविले आहे तेही तितकेच मौलिक आहे. कोणत्याही समाजाचे साहित्य हा त्याचा सांस्कृतिक आरसा असतो. आदिवासींच्या साहित्यातून स्त्री-जीवनाचे जे विविध पैलू प्रकाशात येतात ती एक सांस्कृतिक साखळीच असते. त्यातून कौटुंबिक, मानसिकता, विवंचना, आर्थिकता, नैतिकता आणि रीतीरिवाज यांचे अनोखे दर्शन घडते. परंपरा सांभाळत भोगावे लागणारे भोगही त्यातून व्यक्त होतात. तिचे कठोरपणे, तिची कलात्म ओढ जशी प्रतित होते तशीच तिची सहद्रयता आणि सश्रध्दताही प्रतीत होते. आदिवासी स्त्री ही आदिवासी पुरूषाप्रमाणे अंधश्रध्दा आणि देवभोळी आहे.

आदिवासी स्त्री जी जुन्या मुल्यांमध्ये अडकलेली आहे. अनेक लोकगीतांतून त्याचे दर्शन घडते तसेच नव्या युगाची चाहूल लागताच आणि त्यातून घडत जाणारे परिवर्तन ही स्त्री कशी स्विकारू इच्छिते, तिचे अंतर्मन दिसेते . आदिवासी गीतांत व नृत्यात श्रोत्याची तटस्थ भूमिका नाही तर स्वतः त्या गाण्यात व नृत्यात सहभागी होउन समूहात मिसळून कलाविष्कारांचा व गीतांचा आनंद घेण्याची प्रवृत्ती दिसते. या लोकगीतांतून त्याचे निर्व्याज मन, निसर्ग प्रेम, अज्ञान, समजुती व विधीची माहिती, त्यांचे जीवनविषयक तत्वज्ञान, कुटुंबातील व्यक्तीबददलच्या भावभावना व देवाविषयाची भक्ती आदिवासी स्त्री लोकगीतांत प्रतिबिंबित होते.

शहरी लोकांच्या ज्या आदिवासी जमातीवर प्रभाव पडला त्या जमाती सुधारत आहेत. त्यांच्या गीतांतही शहरी शब्दांचा उपयोग झालेला दिसून येतो. तरीही बऱ्याच आदिवासी जमातीचा अजूनही शहराशी काहीच संबंध नसल्यामुळे त्यांची आपली शेकडो मूळ संस्कृती दिसून येते. ती संस्कृती जतन करण्याचे कार्य आदिवासी स्त्री-लोकगीतेच करतात असे दिसून येते.

आदिवासी स्त्री-जीवनातील घटनाप्रसंग आणि आवडीनिवडी, ताणतणाव, समाज व्यवस्थेने स्त्रीला घालून दिलेली जगण्याची चौकट, त्यातून बनलेली तिची मानसिकता, तिच्यात आलेला दुबळेपणा, जीवन जगताना तिला येणारे

सुख:दुखाचे अनुभवच तिची पारंपरिक दृष्टी गीतातून व्यक्त होते. त्यातले भावसंवेदनेने आदिवासी स्त्री-गीते वाङ्:मयाच दृष्टीने आस्वादनीय तर कौटुंबिक स्त्री-जीवनाच्या दृष्टीने ती समाजशास्त्रीय बनली आहेत. त्यामुळे समाज वाङ:मयाच दृष्टीने ती समाजशास्त्रीय बनली आहेत. त्यामुळे समाज वाङ्:मयाच्या दृष्टीने आदिवासी गीतांना महत्त्व आहे.

संदर्भ :

१. डॉ. अलका हिवाळे, आदिवासी लोकगीतांतील स्त्री-जीवन, कैलास पब्लिकेशन्स औरंगाबाद, २००२.
२. डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, मराठी कविता आकलन आणि आस्वाद, स्वरूप प्रकाशन औरंगाबाद,२००५.
३. प्रा. संध्या जाधव, स्त्री लोकगीतातील अंतरंग,सुर्यमुद्रा प्रकाशन, नांदेड, २०१६
४. संपादक : डॉ. प्रमोद मुनघाटे, आदिवासी मराठी साहित्य स्वरूप आणि समस्या, प्रतिमा प्रकाशन २००७.
५. डॉ. विनायक तुमराम, आदिवासी साहित्य स्वरूप आणि समिक्षा, विजय प्रकाशन नागपूर १९९४

ISSN-2320-4494
RNI No.MAHAUL03008/13/2012-TC
Impact Factor : 2.7286

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal

VOLUME - I ISSUE - I
April to june 2021



ARTS | COMMERCE
SCIENCE | AGRICULTURE
EDUCATION | MANAGEMENT
MEDICAL | ENGINEERING & IT I LAW
PHARMACY | PHYSICAL EDUCATION
SOCIAL SCIENCE | JOURNALISM
MUSIC | LIBRARY SCIENCE |

www.powerofknowledge.co.in
E-mail : powerofknowledge3@gmail.com

Editor
Professor Dr.Sadashiv H. Sarkate

| | | | |
|---|---|---|---|
| 52 | महिला सबलीकरणाची सद्यस्थिती आणि आव्हाने | ज्योती श्रीपती जोगदंड | 214-217 |
| 53 | अहमदनगर जिल्हयातील सत्यशोधक समाजाचे निवडक लेढे व घटना - चिंतन | डॉ. पानखडे अनिल पांडूरंग | 218-222 |
| 54 | भारतातील आदिवासी जमातीच्या लोकसंख्येचा समाजशास्त्रीय अभ्यास | प्रा. डॉ. संजय सुरेवाड | 223-226 |
| 55 | भारतीय स्त्रियांच्या जीवनात झालेल्या परिरवर्तनात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान :-एक समाजशास्त्रीय अभ्यास | डॉ. दत्ता एम. तंगलवाड | 227-231 |

# भारतातील आदिवासी जमातीच्या लोकसंख्येचा समाजशास्त्रीय अभ्यास

प्रा. डॉ. संजय सुरेवाड
सहा. प्राध्यापक व विभाग प्रमुख,
समाजशास्त्र विभाग,
यशवंतराव चव्हाण महाविदयालय अंबाजोगाई. जि. बीड.

भारत देशाचे भौगोलिक स्थान उत्तर गोलार्धात ८०.४० ते ३७.६० अक्षांशाच्या दरम्यान व पूर्व गोलार्धात ६८.७० ते ९७.२४० या रेखांशांच्या दरम्यान असणाऱ्या भारताचे क्षेत्रफळ ३२,८७,२६३ चौ. कि. मी. आहे. भारताची उत्तर-दक्षिण सरासरी लांबी ३,२१४ कि. मी. आहे भारताला ७,५१७ कि. मी. लांबीचा समुद्रकिनारा लाभला आहे. बंगालच्या उपसागरात अंदमान व निकोबार बेटांचा समूह तसेच अरबी समुद्रात लक्षद्वीप बेटांचा समूह हे ही भारताचे अविभाज्य भाग आहेत. भारताच्या चतु:सीमा पश्चिमेकडे अरबी समुद्र आणि पाकिस्तान, वायव्य व उत्तरेकडे अनुक्रमे पाकिस्तान, चीन, तिबेट, नेपाळ, भूतान, पूर्वेकडे बांगला देश म्यानमार(ब्रम्हदेश) आणि बंगालचा उपसागर, दक्षिणेकडे श्रीलंका आणि हिंदी महासागर आहे.

भारतीय आदिवासी लोकंससख्येच्या जागतिक दृष्टिकोनातून अभ्यास केल्यास 'आफ्रीकानंतर भारत देश आदिवासी लोकसंख्येत जगात दुसऱ्या स्थानावर आहे'०१ 'भारतात आतापर्यंत एकूण ५८७ आदिवासी जमातीची'०२ नोंद झाली असून २००१ च्या जनगणनेनुसार देशाची एकूण लोकसंख्या १,०२८,७३७,४३६ आहे. व आदिवासी लोकसंख्या ८४,३२६,२४० असून हे प्रमाण एकूण लोकसंख्येच्या ८.२ टक्के एवढे आहे. २०११ च्या जनगनणेनुसार भारतामध्ये एकूण लोकसंख्या १,२१०,१९३,४२२ आहे. त्या लोकसंख्येत आदिवासीची लोकसंख्या १०४,२८१,०३४ एवढी आहे एकूण लोकसंख्येच्या टक्केवारीतून आदिवासीची लोकसंख्येची टक्केवारी ०८.६१ टक्के एवढी आहे.

२००१ च्या जनगणनेनुसार देशाची एकूण लोकसंख्या १,०२८,७३४,४३६ असून त्या एकूण लोकसंख्येत आदिवासी लोकसंख्या ८४,३२६,२४० इतकी होती. एकूण लोकसंख्येत आदिवासी लोकसंख्येची टक्केवारी ०८.२ इतकी होती. २०११ च्या जनगणनेनुसार भारताची एकूण लोकसंख्या १,२१०,१९३,४२२ एवढी आहे. त्यापैकी आदिवासी लोकसंख्या १०४,२८१,०३४ आदिवासी लोकसंख्येचे एकूण लोकसंख्येची प्रमाण ०८.६१ टक्के आहे. २००१ व २०११ च्या जनगरणनेचा अभ्यास केल्यास असे लक्षांत येते की २००१ ते२०११ या काळात आदिवासीची लोकसंख्या ०.४१ टक्के इतकी वाढली असून सर्वाधिक आदिवासी लोकसंख्येचे राज्य म्हणून मध्य प्रदेश राज्याचा प्रथम कंमाक लागतो. मध्य प्रदेश राज्याची आदिवासी लोकसंख्या १५,३१६,७८४ असून एकूण लोकसंख्येत आदिवासी लोकसंख्येची टक्केवारी २५.३६ इतकी आहे. आदिवासी लोकसंख्येत महाराष्ट्र राज्य दुसऱ्या कंमाकावर आहे. २०११ जनगणनेनुसार महाराष्ट्र राज्याची एकूण लोकसंख्या ११२,३७२,९७२ इतकी असून आदिवासी लोकसंख्या १०,५१०,२१३ इतकी आहे. महाराष्ट्र राज्याच्या एकूण लोकसंख्येत आदिवासी लोकसंख्येची टक्केवारी ०९.३५ इतकी आहे.

अनुसूचित जमातीची सर्वाधिक लोकसंख्या नैऋत्य भारतातील राज्यात आणि केंद्रशासित प्रदेशात असून नॉगालॅड, मेघालय, अरूणाचल प्रदेश, लक्षद्विप येथील ८० टक्के हून अधिक लोकसंख्या आदिवासी आहे. देशातील अर्ध्याहून अधिक आदिवासी लोकसंख्या ही मध्य भारतात आहे.

२०११ च्या जनगणनेनुसार प्राप्त झालेल्या लोकसंख्येच्या आकडेवारीनुसार पंजाब, हरियाणा, आणि दिल्ली हे राज्य आणि चंदीगड, पांडिचेरी या केंद्रशासित प्रदेशात आदिवासी नाहीत. वरील राज्य आणि केंद्रशासित प्रदेशाचा अपवाद वगळता भारतातील सर्वच राज्यात आणि केंद्रशासित प्रदेशात आदिवासी लोक आहेत.

केंद्रशासित लक्षद्विप प्रदेशात एकूण लोकसंख्येच्या ९४.८६ टक्के लोकसंख्या आदिवासी आहे. तर मिझोरम राज्यातील एकूण लोकसंख्येत आदिवासी लोकसंख्या ८२.७४ टक्के इतकी आहे. नागालॅंड राज्यातील एकूण लोकसंख्येत आदिवासी लोकसंख्या

८६.३८ टक्के इतकी आहे. मेघालय राज्यातील एकूण लोकसंख्येत आदिवासी लोकसंख्या ८६.२२ टक्के इतकी आहे.
भारताच्या २०११ च्या जनगणनेनेच्या अभ्यास केल्यास असे आढळून येते की, पुरूषांपेक्षा स्त्रियांची संख्या कमी आहे "२०११ च्या जनगणनेनुसार भारताची लोकसंख्या १,२१०,१९३,४२२ इतकी होती यामध्ये आदिवासी लोकसंख्या १०४,२८१,०३४ इतकी होती.पुरूषाची संख्या ५२४०९८२३ इतकी आहे. तर स्त्रियांची संख्या ५१८७१२११ इतकी आहे. २०११ च्या जनगणनेनुसार भारताच्या एकूण लोकसंख्येत दर हजार पुरूषामागे स्त्रियांचे प्रमाण ९४४ इतके आहे. आदिवासी लोकसंख्येचे दर हजारी पुरूषामागे स्त्रियांचे प्रमाण ९८९ इतके आहे. "१९९१ च्या जनगणनेनुसार दर हजारी पुरूषांमागे स्त्रियांचे प्रमाण ९९७ "०३ तर "२००१ मध्ये हे प्रमाण ९३३ होते"०४आदिवासी समाजात देखील इतर समाजाप्रमाणे पुरूषापेक्षा स्त्रियांची संख्या कमी होत आहे.

आदिवासी समुदाय विभाजन अभ्यासकांच्या सोयीसाठी आदिम जमातीचे विविध निकषांवर वर्गीकरण करण्यात आले आहे.

**१ भौगोलिक निकषावरील वर्गीकरण :-**

अ) ईशान्य विभाग ;छवतजी.म्ेंजमतद त्महपवदद्ध :- यात आसाम, अरूणाचल प्रदेश, मिझोरम, नागालॅड, व त्रिपुरा या विभागाचा समावेश होतो. गारो कुकी, मिझो, खासी, मुंडा, सेमा, नागा, रियांग, मिरी, आपातानी इत्यादी जमाती यात येतात.

ब) हिमालय लगतचा विभाग ;ैनइ भ्पउंसंलंद त्महपवद त्महपवददद्ध :- या उत्तर आणि वायव्य भारत, हिमाचल प्रदेश अंर्तभूत होतात आणि त्यात गुर्जर, गड्डी, थेरू, जौन्सारी इत्यादी जमाती येतात.

क) मध्य आणि पूर्व भारत ;ब्मदजतंस ंदक म्ेंज प्दकपंद्ध :- यात पं. बंगाल, बिहार, ओरिसा, मध्यप्रदेश आणि उत्तरप्रदेश हे विभाग येतात. यात बैंगा, बोडो, जुआंग, कोल, खोंड, संथाल, उरॉव, हो, मुण्डा, लेपचाश कोरवा, भिल्ल, आणि पहाडिया इत्यादीचा समावेश होतो.

ड) दक्षिण भारत ;ैवनजी प्दकपंद्ध :- यात तामिळनाडू, केरळ, व आन्धप्रदेश हे विभाग येतात. आणि टोळ, कोल, कादर, चेंचू, कोया, गोंड, चोलानायकेन, गडबा इत्यादीचा समावेश होतो.

ठ) पश्चिम भारत ;ॅमेजमतद प्दकपंद्ध :- यात राजस्थान, गुजरात आणि महाराष्ट्र हे विभाग येतात. या मधील जमातींमध्ये भिल्ल, गराशिया, सहारिया, गौंड, कोलाम, परधान, कोळी, ठाकर, काटकरी, काथेडी, वारली, पावरा, मुण्डा, कोल, खोंड, दुबला, कोंकणा इत्यादीचा समावेश होतो. ०५

अ) रॉय बार्मन यांनी केलेले विभाजन :- रॉय बार्मन यांनी, 'भारतीय आदिवासी समुदायाचे पाच' विभागात केले आहे. ते विभाजन पुढीलप्रमाणे.०६

१ उत्तर पूर्व भारत :- 'उत्तर पूर्व भारत' या भागात आसाम, अरुणाचल प्रदेश, नागालॅड, मणीपूर, त्रिपूरा याचा समावेश होतो.

२ हिमाचल क्षेत्र उत्तर - पश्चिम भारत :- 'हिमाचल क्षेत्र उत्तर - पश्चिम भारत' भागात उत्तर प्रदेशातील पर्वतीय क्षेत्र, हिमाचल प्रदेश , याचा समावेश होतो.

३ मध्य व पूर्व क्षेत्र:- मध्य पूर्व क्षेत्र या भागात बंगाल, बिहार, ओरिसा, मध्यप्रदेश आंध्र प्रदेश या भागाचा समावेश 'मध्य व पूर्व क्षेत्र' या भागात होतो.

४ दक्षिण भारत :- 'दक्षिण भारत' या भागात तामीळनाडू, केरळ, कर्नाटक, या राज्याचा समावेश होतो.

५पश्चिम भारत :- 'पश्चिम भारत' या भागात राजस्थान, गुजरात, महाराष्ट्र या राज्याचा समावेश होतो. या भौगोलिक क्षेत्रात वसलेले आदिवासी वंश, भाषा, कुंटुब, विवाह, आर्थिक जीवनाचा विचार करता वेगवेगळे दिसून येतात. डॉ. बी. एस. गुहा०७ यांनी भारतातील आदिवासी जमातीचे तीन मोठया भौगलिक प्रदेशात वर्गीकरण केले आहे.

१ उत्तर आणि उत्तर पूर्व भारत ;छवतजी ंदक छवतजी.म्ेंजमतद ंवदमद्ध

२ मध्य भारत ;जीम ब्मदजतंस व जीम डपककसम ंवदमद्ध

३ दक्षिण भारत ;जीम ैवनजीमतद ंवदमद्ध

१ उत्तर आणि उत्तर पूर्व भारत ;छवतजी ंदक छवतजी.मेंजमतद ंवदमद्ध :- हे क्षेत्र उत्तोरेकडील लेह आणि शिमला च्या पूर्वेस लुशाई पर्वतापर्यंत पसरलेल आहे. या भागात प्रामुख्याने नागा, कुकी, खासा, मिझो, लेपचा, खासी, थारु, चकमा, अबोर, मिकीर, गारो, जौनसारी, भोटिया इत्यादी आदिवासी जमाती आहेत.

२ मध्य भारत ;जीम ब्मदजतंस व ;जीम डपककसम ंवदमद्धरू. या विभागात नर्मदा आणि गोदावरी या नद्यांच्या समावेश केला जातो. या भागात संथाल मुंडा, ओरॉव, हो, खरिया, भूमिया, बिरहोर, गोंड, बैगा, भिल्ल, कोळी, कोरकू, वारली, कोलाम, कातकरी, कमार, कवर या काही आदिवी जमातीचे वास्तव्य असल्याचे दिसून येते.३द्ध दक्षिण भारत ;जीम ैवनजीमतद ंवदमद्धरू. या भागात प्रामुख्याने चेंचू, कोटा, कादर, तोडा, इसान, कुरुम्बा आणि अदंमान निकोबार ओंगे, जारवा, सेन्टीनेलीस या काही आदिवासी जमाती आढळून येतात. भौगोलिक वर्गीकरणाच्या दृष्टिकोनातून एल. पी. विद्यार्थी यांनी आदिवासी जमातीचे चार क्षेत्रात विभाजन केलेले आहे.०८ ज्यात

अद्ध हिमालयाचे क्षेत्र ;छवतजी ंदक छवतजी.मेंजमतद ंवदमद्धरू. या क्षेत्रामध्ये जम्मु-काश्मिर, हिमाचल प्रदेयर, उत्तर प्रदेशाचे तराई क्षेत्र ;थारुद्ध, आसाम ;मिझो, गारो, खासी द्ध,मेघालय, नागालॅड ;नागाद्ध, मणिपूर ;माओद्ध, आणि त्रिपुरा यांचा समावेश असून देशातील एकूण ११ टक्के आदिवासी जमातीचा समावेश आहे.

बद्ध मध्य भारत क्षेत्र ;जीम ब्मदजतंस व डिपककसम ंवदमद्धरू. या क्षेत्रामध्ये पश्चिम बंगाल, बिहार, ;संथाल, मुंडा, ऊरॉव, आणि हो द्ध, ओरिसा ;खोंड, आणि गोंडद्ध, या आदिवासी जमातींचा समावेश असून देशातील एकूण जमातीशी त्याचे प्रमाण ५७ टक्के आहे.

कद्ध पश्चिम भारत क्षेत्र ;जीम ॅमेजमतद ंवदम द्धरू. या क्षेत्रामध्ये राजस्थान ;भील्ल, दुबला, घोदियाद्ध, आणि महाराष्ट्रातील ;भील्ल, कोळी, महादेव कोळी, कोकणा द्ध, यांचा समावेश असून देशातील एकूण २५ टक्के आदिवासी जमातीचा समावेश आहे.

**डद्ध दक्षिण भारत क्षेत्र;जीम ैवनजीमतद ंवदमद्ध** :- या क्षेत्रामध्ये आंध्र प्रदेश ;गोण्ड, कोया, कोण्डा, दोवा द्ध, कर्नाटक, तामिळनाडू ; इरुला, टोडा द्ध, केरळ ; पुलयन, पनलयन द्ध, आणि अंदमान निकोबार यांचा समावेश असून लगभग देशातील एकूण आदिवासी लोकसंख्येच्या ०७ टक्के आदिवासी जमातीचा समावेश आहे.

२द्ध वांशिक वर्गीकरण :- ;त्बपंस ब्सेंपपिबंजपवदद्ध :- "भारतातील आदिवासी जमाती हे एकाच वंशाचे नाहीत. यांच्यात वांशिक भिन्नता आढळून येते. मंगोलॉइड, प्रोटो-ऑस्टोलाईड, निग्रिटो या तीन वंशाचे लोक आदिवासी समाजात आढळतात. त्यामुळे आदिवासी जमातीचे वांशिक आधारावर पुढील तीन वांशिक गटात विभाजन करण्यात आले आहे.

**१) मंगोलाईड ;डंदहवसवपकद्ध** :- उत्तर-पूर्वोत्तर क्षेत्रात राहणाऱ्या आदिवासी जमातीतध्ये मंगोलाईड वांशिक तत्वे आढळतात. या जमाती मंगोल वंशाच्या आहेत. या वंशाच्या लोकांची त्वचा ही थोडी पिवळसर रंगाची, सरळ केस, चपटे नाक, लांब डोके, मध्यम उंची आणि अर्धे उघडे डोळे असतात. हे लोक पूर्व काश्मीर, पूर्व पंजाब, हिमाचल प्रदेश, उत्तरांचल, आसाम, सिक्किम इत्यादी राज्यात आढळतात. नागा, मिझो या जमाती मंगोलाईड या वंशाचा आहेत.

**२) प्रोटो-ऑस्ट्रेलॉईड ;च्तवजव.।नेजतंसवपकद्ध** ः- मध्यवर्ती क्षेत्रात प्रोटो-ऑस्ट्रेलॉईड वंशाच्या जमाती आहेत. शरीराची उंची कमी, त्वचेचा काळा रंग, लांब डोळे आणि कुरळे केस ही या वंशाच्या लोकांची शारीरीक लक्षणे आढळतात. याशिवाय त्यांच्या नाकाचा आकार रूंद असतो. ओठाचा आकार मोठा असतो. या वंशाच्या जमाती बंगाल, झारखंड, दक्षिण, उत्तर प्रदेश, दक्षिण राजस्थान आणि मध्य भारत या प्रदेशात आढळतात. भिल्ल, चेंचु, कोरकू, मुंडा इत्यादी प्रोटो-ऑस्ट्रेलाईड या वंशाच्या आहेत.

**३) निग्रिटो** :- निग्रिटो वंशाची शारीरीक लक्षणे ही निग्रो वंशाची साम्य दर्शविणारी आहेत. त्यांची उंची कमी असते. डोळयाचा आकार रूंद असतो. त्वचेचा रंग काळा असून केस काळे असतात. ओठांचा आकार मोठा असून बाहेरचा भागाला

MAH/NAN/10936/2015
ISSN : 2454-7905
SJIF 2021 - Impact Factor: 6.91

# Worldwide International Inter Disciplinary Research Journal

(A Peer Reviewed)

Year - 6, Vol.I, Special Issue-XXXI, 5 June 2021



# पर्यावरण आणि मानव विकास

**Editor : Dr. Dharampurikar Bhalchandra Vaijanathrao**

Address for Correspondence

***Mrs. Pallavi Laxman Shete***
Editor in Chief : Worldwide International Inter Disciplinary Research Journal (A Peer Reviewed Reffered)
Principal, Sanskriti Public School, Nanded (MH, India) Email : shrishprakashan2009@gmail.com
***Dr. Rajesh G. Umbarkar***
House No. 624 - Belanagar, Near Maruti Temple, Taroda (Kh.) Nanded - 431605 (India - Maharashtra)
Email - umbarkar.rajesh@yahoo.com, shrishprakashan2009@gmail.com Mob. No. 9623979067
Director : Mr. Tejas Rampurkar (For International Contacts only + 91-8857894082)

**(Arts - Humanities - Social Sciences - Sports, Commerce, Science, Education, Agriculture, Management, Law, Engineering, Medical, Ayurveda, Pharmaceutical, Journalism, Mass Communication, Library Science Faculty's)**

| | | | |
|---|---|---|---|
| 34. | संत साहित्यातील पर्यावरण | डॉ. निर्मला गोनारी | 181 |
| 35. | संत साहित्यातील पर्यावरण | शारदा निशान भागणगानकर | 187 |
| 36. | पर्यावरणाचा समतोल आणि आदिवासी समुदाय : एक समाजशास्त्रीय अभ्यास | प्रा. डॉ. संजय सुरेवाड | 190 |
| 37. | संत वाङ्मयातील कृषिनिष्ठ जाणिवांचा शोध आणि बोध | डॉ. राजीव यशवंते | 194 |
| 38. | आधुनिक शेती व त्याचा पर्यावरणावर होणारा परिणाम | कविता भिराग भोगे | 202 |
| 39. | माध्यमे आणि पर्यावरण | प्रा.डॉ. कांचन गुळे | 205 |
| 40. | पर्यावरण आणि राजकारण | प्रा. भोये सुरेश मुरलीधर | 211 |
| 41. | पर्यावरणीय समस्या वास्तव आणि राजकारण | डॉ. मारोती तुकाराम घंटेवाड | 215 |
| 42. | पर्यावरण व आर्थिक विकास | डॉ. महेंद्र पांडुरंग पवार | 220 |
| 43. | पर्यावरण संरक्षण, संवर्धनाबाबत जनजागृतीची आवश्यकता | डॉ. सविता शिवनाथ झुंजारे | 222 |
| 44. | भाषा अध्यापनातून पर्यावरण शिक्षण | प्रा.डॉ.लक्ष्मीविष्णू भंडारे | 226 |
| 45. | लोकसंख्या आणि पर्यावरण | डॉ.अशोक भाऊराव माळशिखरे | 233 |
| 46. | "शाश्वतआर्थिक विकासासाठी पर्यावरण संवर्धनाची आवश्यकता" | डॉ. ज्ञानेश्वर नामदेव सोनवणे | 239 |
| 47. | कृषि, शाश्वत विकास आणि पर्यावरण | श्री. राहुल सुखदेव पोखरकर | 247 |
| 48. | मानव विकास निर्देशांकातील आरोग्य संवर्धनासाठी यज्ञातून पर्यावरणाकडे वाटचाल | डॉ. राजेश गं. उंबरकर | 252 |
| 49. | लोकसंख्या आणि पर्यावरण | प्रा. डॉ. लक्ष्मण शिराळे | 263 |
| 50. | जैवविविधतेची संकल्पना आणि महत्त्व | श्री.विनायक दशरथ नाकतोडे | 271 |
| 51. | पर्यावरणवाद आणि आंतरराष्ट्रीय राजकारण | डॉ. किशोर बी. वासनिक | 274 |

# पर्यावरणाचा समतोल आणि आदिवासी समुदाय : एक समाजशास्त्रीय अभ्यास

**प्रा. डॉ. संजय सुरेवाड**

सहा. प्राध्यापक व विभाग प्रमुख,
समाजशास्त्र विभाग, यंशवतराव चव्हाण महाविदयालय, अंबाजोगाई, जि. बीड.

अनादी काळापासून जगभरातील विविध संस्कृतीतील विचारवंत, तत्ववत्ते व शास्त्रज्ञ आपला निसर्ग व त्यातील मानवाचे निश्चित स्थान याचा अर्थ लावण्याचा प्रयत्न करत आहेत. मानवी भौतिक प्रगती, आधुनिकीकरण यामुळे गेल्या ५० वर्षात अनेक बदल झाले आहेत. एक काळी फार कमी प्रभाव असलेल्या मानवाचा आता निसर्गावर सर्वात मोठा परिणाम होत आहे. उदा. जैवविविधतेचा ऱ्हास, वातावरणातील बदल इ. त्यामुळे मानवाच्या निसर्गातील भूमिकेच्या अभ्यासात वाढ झाली आहे.

पर्यावरणाचे गुंतागुतीचे स्वरूप समजावून घेण्यासाठी त्यात आणखी समंजसपणे राहण्यात जगण्यासाठी हया पर्यावरणाचा अभ्यास करणारे तज्ज्ञ पर्यावरणाची विभागणी, भूआवरण आणि जीवावरण अशी करतात. भू-आवरणात, खडकावरण, जलावरण व वातावरणाचा समावेश होतो. तर जीवावरण हे सजीव, त्यांच्या लोकसंख्या व त्याच्या परिसंस्थेमुळे दृष्टीकोनाची मदत होउ शकते.

आपले विश्व समजावून घेणाच्या व त्याचा अभ्यास करण्याच्या अनेक पध्दती आहेत. प्रणाली दृष्टीकोन ही अशी पध्दत आहे जी, आपल्याला हया जगाकडे समग्र पध्दतीने बघण्यास मदत करते. पर्यावरणाविषयी पांरपारिक विचारसरणीपेक्षा प्रणाली दृष्टीकोन वेगळा आहे. तो जगाकडे, त्याचे घटक आणि त्या घटकांमधील परस्पर संबंध हयामुळे जिचे वर्तन निश्चित होते अशी प्रणाली, हया दृष्टीकोनातून पाहून जग समजावून घेण्याचा प्रयत्न करतो. नैसर्गिक मानवी सामाजिक व्यवस्था व त्यांच्यातील परस्पर संबंधामुळे आपले जग बनले आहे. प्रणालीचे वर्तन व त्या वर्तनाची कारणे यांचे विश्लेषण आपल्याला, प्रणालीच्या रचनेत कुठे बदल केल्यास ती इच्छित दिशेने वर्तन करेल हे शोधून काढण्यास मदत करू शकते

जे काही आपल्याभोवती असते ते सर्वकाही म्हणजे पर्यावरण. आपल्या सभोवती असलेल्या गोष्टींची यादी करायची झाल्यास आपण जंगल, झाडे, प्राणी, पक्षी, पर्वत व खोरी, कीटक व माती, खनिजे व लाव्हा, सागर व लाटा, वादळे, वारा, अंथाग वाळवंटे, बर्फाच्छदित ध्रुवीय प्रदेश, वातावरण, आकाश, सौर प्रणाली , आकाशगंगा आणि अगदी विश्वदेखिल त्या यादीत समाविष्ट होते. आपल्यापैकी काहीजण त्यात शेते, गुरेढोरे, लोक, गावे किंवा शहरे, रस्ते, वाहने कचरा इत्यादी गोष्टींचादेखील समावेश करू शकतात. समाजशास्त्र व मानसशास्त्रासारख्या विषयांतील तज्ज्ञ मानवी समाज व त्याचे वर्तन स्पष्ट करण्याचा प्रयत्न करतात. तर भौतिक, रसायन व जीवशास्त्रातील तज्ज्ञ नैसर्गिक जग समजावून घेण्याचा प्रयत्न करतात. हया शाखांमधील तज्ज्ञ पर्यावरणाचे विविध पैलू काळजीपूर्वक वेगवेगळे करून त्याचा सविस्तर व सखोल अभ्यास करतात. सृष्टीचे रहस्य उलगडण्याच्या आणि ज्ञान निर्मितीच्या हया पध्दतीमुळे पर्यावरणीय अभ्यासात सखोल ज्ञानाची अमूल्य अशी भर पडली आहे. मात्र या दृष्टीकोनामुळे पर्यावरणातील घटकांविषयी तज्ज्ञ मते बनली असली तरी अशा घटकांमधील परस्पर संबंधासहित एकूणच पर्यावरणाविषयी समग्र दृष्टीकोन निर्माण झालेला नाही.

आपण ज्या जगात राहतो ते जग जरी विशिष्ट प्रकारच्या असंख्य घटकांचे बनलेले असले तरी त्यापासून एक गुंतागुतीचे आणि समग्र स्वरूप तयार झाले आहे. म्हणूनच हे जग विशिष्ट घटकांपुरते मर्यादित दृष्टिकोनातून न पाहता समग्र अखंड स्वरूपात त्याचे अवलोकन करण्याचे प्रस्तुत पर्यावरणीय अभ्यासाचे उदिष्टे आहे.

समग्र भारताचा समाजशास्त्रीय विचार करतांना भारतीय समाज नागरी समुदाय, ग्रामीण समुदाय, आणि आदिवासी समुदाय असा मिळून बनला आहे. १९ व्या शतकात मानव शास्त्रज्ञांनी आदिवासी किंवा समुदाय ही संज्ञा विकसित केली. आदिवासी हे अंत्यत साधेभोळे, स्वत:विशिष्ट संस्कृती जोपासत जिवन जगतात. सामाजिक , आर्थिक राजकीय, शैक्षणिक दृष्ट्या हा समाज खूप मागासलेला आहे. एकाच भू-भागावर राहणारा, एकच भाषा बोलणारा, विवाहसंबध आणि व्यवसायाच्या बाबतीत एका विशिष्ट प्रकारची मूल्ये, विचारप्रणाली जोपासना करणाऱ्या समुहाला आदिवासी समुदाय (Tribal Community ) असे म्हणतात.

आदिवासी हजारो वर्षांपासून या धरतीवर निवास करीत आहेत. पुरातन काळी संस्कृत साहित्यात आदिवासी जमातीचा उल्लेख आलेला आहे. रामायणात निषाद, किरात, शबरी, रक्श असा उल्लेख आहे. कच्चे मांस खाणारे म्हणून किरातांचा उल्लेख आहे. महाभारतात पुलिंद आणि किरात हे हिमालयात राहणारे आदिवासी म्हणून उल्लेख आढळतो. एकलव्य, शबरी, निषादराज, गुह हे आदिवासी होते. रामायण, महाभारत या ग्रंथाचा कालखंड साधारणत: चार-पाच हजार वर्षापूर्वीचा असावा. या ग्रंथात आदिवासी जमातीचा उल्लेख आढळतो. आदिवासी लोक नागरी वस्तीपासून अगदी दूर डोंगरदऱ्यामध्ये, जंगलामध्ये राहतात. त्यामुळे असा एक समज पसरविण्यात येतो की, सपाट, दाट वस्तीच्या प्रदेशातील लोकांनी वनवासी लोकांशी लढारय्या करून, त्यांना पराभूत करून दऱ्याखोऱ्यात दूर हाकलून दिले. बाहेरून येणाऱ्या सबलांनी त्यांचे सखल प्रदेश व्यापले. त्याना जंगल, दऱ्याखोऱ्याचा आश्रय घ्यावा लागला आणिआदिवासी हा कायमचा प्रगत समाजापासून दूर झाला. आदिवासींबदल लोकांची सर्वसाधारण कल्पना म्हणजे जंगल-दऱ्याखोऱ्यात राहणारे रानटी, जंगली लोक म्हणजे आदिवासी.

आदिवासी समुदायांबाबत सर्वप्रथम स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटिश प्रशासक, धर्मप्रसाराचे काम करणारे मिशनरीज व काही प्रमाणात प्रशासकीय सेवेत असलेले अधिकारी यांना आदिवासी समुदायाचे शास्त्रीय अध्ययन करण्याचे श्रेय दिले जाते. आदिवासींना आदिम अगर आदिवासी (Primitive Tribes) असे नामविधान हटन यांनी केले आहे. आदिवासींना गिअरसन, ठक्कर बाप्पा यांनी मूळचे रहिवासी म्हटले आहे. रिसले, लॅस्की, एल्विन, ग्रिगसन, शूबर्न, टॅलेट, सेडविक, मार्टिन, ए.व्ही ठक्कर यांनी या लोकांना मूळचे अगदी प्राचिन (Aboriginal) किंवा अगदी मूळचे रहिवासी असे म्हटले आहे.

आदिवासींना इंग्रजीमध्ये Tribes असे म्हणतात. आदिपासून म्हणजे सरूवातीपासून दऱ्याखोऱ्यात किंवा जंगलात निवास करणारे आदिवसी होत असा सर्वसामान्य अर्थ रूढ झाला आहे. त्यामुळे जंगलात किंवा डोंगराळ भागात राहणाऱ्या लोकांना आदिवासी असे सबोधले जाते. आर्यांचे भारतात आगमन होणापूर्वीच आदिवासी या देशाचे मूळ रहिवासी होते. आदिवासी हे लोक भारतातील आदया वसाहतकार होत. हे लोक आत्मसंरक्षणस तितकेसे समर्थ नव्हते. व त्यांना डोंगर-दऱ्याचा किंवा जंगलाचा आश्रय करावा लागला. आजही ते अशाच जागी कायमची वस्ती करून राहिलेले दिसतात. धरतीची लेकरे म्हणून ज्यांचा सर्वार्थाने उल्लेख करता येईल, अशा आदिवासी समाजाची जग वेगळे आहे. डोंगरकपाऱ्यात राहणाऱ्या, आपल्याच रूढी व परंपराना पालीसारखे चिकटून राहणाऱ्या, फळाफुलांच्या व झाडपाल्यांच्या चवीने समाधान पावणाऱ्या आदिवासींचे जीवन स्वच्छंदी पाखरासारखे असते. आदिवासी आणि आदिवासी समाज : सर्वसाधारणपणे गुराखी व मेंढपाळ समाज किंवा कृषक समाज की ज्यांचे सभासद सांस्कृतिक किंवा भाषिक समान वैशिष्ट्ये धारण करतात आणि जे परस्पर प्रतिसादावर आधारित सामाजिक हक्क आणि कर्तव्ये यांनी परस्परांशी बांधले गेले आहेत. त्यांना आदिवासी किंवा आदिवासी समाज म्हणतात.

पर्यावरणाविषयी समग्र दृष्टीकोन हा अनेक जाती जमातींचा पारंपारिक दृष्टीकोन आहे. उदा. महाराष्ट्रातील पश्चिम घाटामध्ये वास्तव्य करणारे आदिवासी बांधव परंपरेने वाघोबा म्हणजे वाघ हा आपल्या निसर्ग कुटुंबाचा प्रमुख आहे असं मानून त्याची पूजा करतात. त्यांचा हा विश्वास आधुनिक पर्यावरणशास्त्राशी सुसंगत आहे. पर्यावरणाशास्त्रातील वाघ हा प्राणी संजीवांच्या उतरंडीमध्ये शिखरस्थानी आहे आणि त्यामुळे जीवसृष्टीचा समतोल राखला जातो असे मानतात. त्याचप्रमाणे

ईशान्य भारतातील डोंगर प्रदेशात राहणारे आदिवासी बांधव, त्यांचे पूर्वज निसर्गातील वेगवेगळया घटकांपासून जन्माला आले असे मानतात. त्यांच्यातील प्रत्येक जमात ही कुठल्यातरी एखादय पक्षांची, प्राण्यांचर किंवा वृक्षाची वंशच आहे असा त्यांचा विश्वास आहे. त्यामुळे आपल्या जमातीची ओळख ते हरीण किंवा मोर अशा व्दारे करून देतात. व या प्राण्याविषयी त्यांना खूप जिव्हाळा असतो. म्हणून हया प्राण्यांची ते काळजी घेतात. असा दृष्टीकोन इतर संस्कृतीमध्येही दिसून येतो . हितोपदेशात उदार्चारीतांना तू वसुधैव कुटुंबकम असे एक वचन आहे. याचा अर्थ असा की काही अनुदार, संकुचित मताचे लोक हा माझा सगासोयरा व तो परका असा विचार करतात. परंतु उदारमतवादी लोक पृथ्वी हेच एक विशाल कुटुंब आहे असे मानतात.

गोत्रप्रतिक किंवा कुलप्रतिक आणि गोत्रप्रतीकवाद किंवा कुलप्रतिकवाद या संदर्भात फ्रान्सचे सुप्रसिध्द समजाशास्त्रज्ञ एमिल दुरखीम यांनी कुलप्रतिकाची कल्पना मांडली होती. गोत्रप्रतिकवाद म्हणजे एक प्रकारचा सर्वात्मवाद होय. प्रत्येक कुळाचे किंवा कुटुंबाचे एक कुलदैवत म्हणजे त्या कुटुंबाचा मूळ पुरूष किंवा मूळ घटक होय. हे कुलदैवत एखादा प्राणी, एखादा खादयपदार्थ, एखादे झाड किंवा एखादी दैवी शक्ती असू शकते. या कुलदैवातासाठी दुरखेम यांनी गोत्र ही संज्ञा वापरली होती. हा प्राणी, हे झाड किंवा दैवी शक्ती त्या त्या समाजाच्या दृष्टीने महत्वाची असते. दुरखीम च्या मते, समाज हाच खऱ्या अर्थाने धर्माचा उगमस्त्रोत होय. ऑस्टेलियातील अरून्ता आदिवासी जमातीतील गोंत्राचा किंवा कुलप्रतिकांचा अभ्यास केल्यानंतर गोत्रप्रतिक किंवा कुलप्रतिकवादासंबधीचे विचार दुर्खीम यांच्या मनात साकारले होते. या संकल्पनेची व्याख्या दुरखीम यांनी पुढील शंब्दात केली होती, गोत्रप्रतिकवाद किंवा कुलप्रतिकवाद ही एक धार्मिक व्यवस्था असून ज्यात काही गोष्टी व विशेषतः काही प्राणी, काही वनस्पती यांना कुलचिन्ह म्हणून पवित्र मानले जाते. दरखीम च्या मते, गोत्रप्रतिकवाद वा कुलप्रतिकवाद हा सामूहिक नैतिकतेतून आकाराला येतो व तो स्वतः अवैयक्तिक शक्तीचे रूप धारण करतो. धर्मांचे एक अत्यावश्यक अंग म्हणजे गोत्रप्रतिकवाद होय. यासारख्या धार्मिक संकल्पनेतून आदिवासी समूदाय पर्यावरणाचा समतोल राखण्याचा प्रयत्न करतांना दिसून येतो. त्याच बरोबर आदिवासी समुदायाच्या प्रत्येक आयुष्याच्या प्रत्येक घटकांवर पर्यावरणाचा परिणाम झालेला दिसून येतो.

आदिवासी समुदाय हा विकासाच्या अनेक प्रकल्पाचा विरोध करतांना दिसून येतो. त्यापैकी खाणकाम व खनिजांचे उत्पादन यामुळे स्थानिक पर्यावरणाचे प्रदूषण होते तसेच त्याचे काही जागतिक परिणामही दिसतात. स्थानिक पर्यावरणाचा नाश होण्याची थेट किंमत स्थानिक समूहाला मोजावी लागते. पूर्व महाराष्ट्रातील विदर्भ प्रदेशात महत्वपूर्ण असे कोळसाचे साठे आहेत व जलस्त्रोतही मोठया प्रमाणावर आहेत. सध्या कोळशावर आधारित ५२६० मेगावॅट वीजनिर्मिती तेथे केली जाते व नजीकच्या भविष्यात अजून अनेक विदयुतनिर्मिती प्रकल्प सुरू होणार आहेत. त्याच्या काही सामाजिक व पर्यावरणीय परिणामांमध्ये स्थलांतर, उदरनिर्वाहाच्या साधनांची नष्टता, सुमार दर्जाचे पुनर्वसन, हवा, प्रदूषण, पाणी प्रदूषण, राखेचे प्राण्यांवर परिणाम, जड धातू जलस्त्रोतात मिसळणे, वनांचा नाश, आरोग्यावर परिणाम, पाळीव प्राण्यावर परिणाम, भूजल व जमिनीवरील पाण्याच्या प्रमाणात घट, वाहतूक व दळणवळण समस्या यांचां समावेश होतो . हा भाग खूप गंभिररित्या प्रदूषित झाला असून, चंद्रपूर औदयागिक विभाग सर्वाधिक प्रदूषित विभाग म्हणून भारत सरकारच्या पयार्वरण व वन मंत्रालयाने जाहीर केला आहे.

काउरेम हे दक्षिण गोव्यातील क्केपेम तालुक्यात वसलेले एक आदिवासी खेडे आहे. या खेडयाभोवती टेकडया व जंगले हे त्यांच्या वार्षिक झऱ्यांचे प्रमुख स्त्रोत आहेत. व ते झरे त्यांच्या पाण्याच्या शेतीविषयक व घरगुती भागविण्यापुरते पुरेसे आहेत. देवपत्र ही एक जंगलव्याप्त टेकडी असून गावातील रहिवासी तिला देवराई संबोधतात.ही देवराई गावाला पाणीपुरवठा करणाऱ्या प्रमुख झऱ्याचाही स्त्रोत आहे. येथील रहिवासी तांदूळ, भाज्या, अननस, नारळ, सुपारी, काजू यांसारखी पिके घेतात. २००७ साली देवपत्र मध्ये एक खाणकाम सुरू करण्यात आले. लवकरच झऱ्यांचे प्रवाह आटू लागले. खनिज मिळविण्यासाठी खाणीतून काढलेले दगड व माती खाणीभोवती रचली जाते. पावसात हि माती वाहून जाते व खाणीच्या खालच्या बाजूस असलेल्या शेतांमध्ये ती जाउन पडते. या मातीतून वाहणारे पाणी आम्लयुक्त असते व ते पिकांचे

नुकसान करते. ही माती पाण्याच्या प्रवाहांमध्येही मिसळली जाउन पाणी गढूळ व आम्लयुक्त बनते. त्यामुळे पिण्याचे पाणी खराब होउन ते मासेमारीसाठीही निरूपयोगी बनते. त्यामुळे ग्रामस्थांनी ग्रामसभेत सर काउरेम गावातील देवपत्र टेकडीवरील खाणकामास विरोध करण्याचा निर्णय एकमताने घेतला. आदिवासी समुदाय जरी मागासलेला असला तरी त्याचे विचार प्रगत समुदायातील अनेक विचारवंतापेक्षा व्यापक स्वरूपात असलेले दिसून येतात. त्यामुळेच आदिवासी आपल्या पांरपारिक कल्पना सोडायला तयार नाही. त्याचा या विचारातून प्रयार्वरणाचा समतोल राखण्यास मदत झालेली आपणास पाहता येईल.

**संदर्भग्रंथ सूची**

१. काचोळे डी. डी. व कुलकर्णी पी.के., सामाजिक संस्था, कैलास प्रकाशन, औरगांबाद, व्दितीय आवृत्ती १९९४.
२. कुलकर्णी पी.के. व गंदेवार एस एन., समजाशास्त्रातील मूलभूत संकल्पना, विदयाभारती प्रकाशन, लातूर १९९७.
३. लाखे चं.वा. , सामुदाकिय विकास आणि विस्तारकार्याची मूलतत्वे, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, १९९५.
४. आगलावे प्रदीप, सामाजिक संशोधन पध्दती, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००७.
५. नाडगोंडे गुरूनाथ, सामाजिक आंदोलने, कॉन्टिटेन्टल प्रकाशन पुणे, २०००.

Peer Reviewed Refereed and
UGC Listed Journal
(Journal No. 47100)

ISSN 2279 - 0489

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# GENIUS

Volume - X, Issue - I,
August - January - 2021-22
Marathi Part - I

Impact Factor / Indexing
2019 - 6.631
www.sjifactor.com




Ajanta Prakashan

# CONTENTS OF MARATHI PART - I



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| २७ | भारतीय समाजातील सामाजिक समस्या व शिक्षणाची भूमिका - एक अभ्यास<br>**प्रा. डॉ. विद्या श्रीकृष्णा भारंबे** | ११६-१२२ |
| २८ | दलित साहित्यातून व्यक्त झालेले डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर<br>**भूषण प्रदीपकुमार देशमुख** | १२३-१२६ |
| २९ | कोरोनाचा भारतीय समाजव्यवस्था व धर्मव्यवस्थेवर परिणाम<br>**प्रा. लोमेश ज्ञा. बावनकुळे** | १२७-१३० |
| ३० | स्त्रीभ्रुण हत्या : एक सामाजिक समस्या<br>**प्रा. संजय सुरेवाड** | १३१-१३४ |
| ३१ | भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापाराची सद्यस्थिती व व्यापारासमोरील आव्हाने<br>**शिवकुमार सुनिल मोरे**<br>**डॉ. जी. आर. खेडकर** | १३५-१३९ |
| ३२ | शेतकऱ्यांचा आसूड व कृषी कायदे<br>**विठ्ठल हरिभाऊ नागरे**<br>**डॉ. जी. आर. खेडकर** | १४०-१४३ |
| ३३ | कोविड-१९ आणि भारताचे स्थूल देशांतर्गत उत्पादन<br>**प्रा. सुनील दशरथ साळवे** | १४४-१४९ |

VOLUME - X, ISSUE - I - AUGUST - JANUARY - 2021-22
GENIUS - ISSN - 2279 - 0489 - IMPACT FACTOR - 6.631 (www.sjifactor.com) AP-11

# ३०. स्त्रीभ्रुण हत्या : एक सामाजिक समस्या

**प्रा. संजय सुरेवाड**
सहा. प्राध्यापक व विभाग प्रमुख, समाजशास्त्र विभाग, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई, जि. बीड.

सामाजिक समस्या प्रत्येक समाजात अस्तित्वात असतात. समाजातील लोक सामुदायिक पातळीवर त्या समस्यांचे निवारण करण्याचे प्रयत्न करतात. प्रत्येक काळात सामाजिक समस्या असतात. प्राचीन काळात सामाजिक समस्या होत्या. त्याचप्रमाणे आधुनिक समाजातसुध्दा सामाजिक समस्या आढळतात. परंतु प्राचीन काळातील समस्या आज असतीलच असे नाही. बदलत्या सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय परिस्थितीनुसार, नवीन सामाजिक समस्या निर्माण होतात. 19 व्या शतकात बालविवाह,सतीप्रथा, अस्पृयश्यता, केशवपन, विधवा विवाह इ. सामाजिक समस्या निर्माण झाल्या होत्या. मात्र अलिकडे या सामाजिक समस्या आढळून येत नाहीत. सामाजिक बदलानुसार कुटुंब विघटन, बालगुन्हेगारी, लोकसंख्येची समस्या, बेकारी, घटस्फोट, काळाबाजार, भ्रष्ट्राचार, शेतकरी आत्महत्या, नोकरी करणाऱ्या स्त्रियांच्या समस्या इ. नव नवीन समस्या निर्माण झालेल्या आढळतात.

निसर्गातून मानवाने आजच्या युगात जास्तीत जास्त भौतिक सुखसमृध्दी मिळवणे हाच जवळपास सर्वच व्यक्तीच्या विचाराचा केंद्रबिदु बनवला आहे. भौतिक सुखसमृध्दी प्राप्तीसाठी आज मानव आपले विचार, शक्ती खर्ची घालत आहे. त्यात त्याला यशही प्राप्त होत आहे. पण त्याचबरोबर मानवाने आपल्या सुखसमृध्दीसाठी निसर्ग नियमाला बदलण्यास सुरुवात केलेली दिसून येते. त्यामुळे मानवी समाजावार अनेक समस्या निर्माण झालेल्या पहायला मिळतात. त्या अनेक समस्यांपैकी स्त्रीभ्रुण हत्या ही समस्या मानवी समाजाने स्वतःच्या स्वार्थासाठी निर्माणप केलेली आहे. या समस्येमुळे मानवी समाजात स्त्री–पुरूष प्रमाणात असमानाता निर्माण झालेली आढळून येते आणि या समस्येचा परिणाम फक्त भारत देशापुरताच मर्यादित नाही तर, संपूर्ण जगाला या समस्येला सामोरे जावे लागत आहे. या समस्येमुळे अनेक समस्या निर्माण झालेल्या दिसून येतात. परंतु इतर देशापेक्षा भारत देशाला या समस्येमुळे अनेक संकटाला व परिणामाला सामोरे जावे लागणार आहे. हे मात्र निश्चित पणे सांगता येईल.

लिंगभाव असमानतेची समस्या ही जवळपास सर्वच देशात आहे. व्यक्तीचा दर्जा जातीच्या आधारावर निश्चित केला जातो. त्यामुळे वेगवेगळया जातीच्या लोकांमध्ये सामाजिक विषमता आढळून येते. लिंगानुसार पुरूषाचा दर्जा श्रेष्ठ तर स्त्रीचा दर्जा कनिष्ठ मानला जातो. अशा प्रकारची स्त्री आणि पुरूषामध्ये असलेली विषमता म्हणजे लिंग विषमता होय. जगात सर्व लिंगाच्या आधारावर विषमता आढळून येते. या विषमतेमुळे स्त्रीयांचे होणारे शोषण, त्या शोषणातून निर्माण होणारे मागासलेपण, अन्याय, अत्याचारचा प्रश्न, स्त्रीयाची दुयम भुमिका व दुयम स्थान हे सर्व मानवी अधिकाराच्या दृष्टीने चितंनाचा विषय बनला आहे. पुरूष प्रधान समाज रचनेमुळे पुरूष वर्गाच्या हितसंबंधाना प्रत्यक्ष अप्रत्यक्ष पोषक ठरणारी सामाजिक व सांस्कृतिक व्यवस्था निर्माण होउन ती दृढ होत गेलेली आहे. निसर्गाच्या विविधतेच्या तत्वावर आधारलेलली स्त्री पुरुष विषमता ही लिंग भेदाची वास्तविकता, विषमदर्जा व विषम व्यवहारात

रूपांतरीत झाली त्यामुळे पुरूषांसाठी अनुकूल तर स्त्रीयासाठी प्रतिकुल असे वर्तन व्यवहार रूढ होत गेले. लिंगानुसार स्त्री पुरूषांचा सामाजिक दर्जा निश्चित केला जातो.

प्रस्तुत स्त्रीभ्रुण हत्या : एक सामाजिक समस्या' शोध निबंधामध्ये स्त्रीभ्रुण हत्येशी संबधीत असलेले स्पष्टीकरण देण्यात आले आहे. त्याचबरोबर या समस्येवर अनक कायद्ये निर्माण करूनही ही समस्या थांबत नाही यांचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे. प्रस्तुत शोधनिबंध हा दुयम स्त्रोतावर आधारित आहे. विविध अभ्यासक, संशोधकानी लिहलेल्या लेखांचा, पुस्तकांचा, संदर्भ ग्रंथाचा, संशोधन पत्रिका, मासिके व इंटरनेट इत्यादी चा वापर या निबंधासाठी करण्यात आला आहे.

स्त्री भ्रूणहत्या म्हणजे स्त्री गर्भलिंग निदान करून गर्भपात करणे याला स्त्री भ्रूणहत्या संबोधले जाते', पुरुषप्रधान संस्कृती आणि पुरूषवर्चस्वी समाज अशा प्रकारची मानसिकता असलेल्या समाजात, कुटुंबात मुलांच्या (पुरूषांच्या) जन्माला प्राधान्य दे७ न स्त्रियांच्या जन्मास विरोध केला जातो. अशा प्रसंगी स्त्रीच्या पोटातील गर्भाचे निदान करून तो गर्भ स्त्रीचा असल्यास गर्भपात करून त्याला नष्ट करण्यात येते. हयासाठी भारतात कायद्याने लिंग निदानाला बंदी आहे.

गर्भलिंग निदान चाचणी करून स्त्रीभ्रुण असल्याचे सिध्द झाल्यास जन्माला येण्यापूर्वीच स्त्री–भ्रुण संपविला जातो, त्याला स्त्रीभ्रुण हत्या असे म्हणतात. गर्भातील स्त्री अर्भक हे परीपक्व होउन नैसर्गिकरीत्या जन्माला येण्यापुर्विच तिला ठार मारल्या जाते, त्याला स्त्रीभ्रुणहत्या असे म्हणतात. जन्माला येण्या अगोदरच कन्यारत्नाचा विकृत, हिंसक, संवेदनहिन व अन्यायकारक पध्दतीने बळी घेणे म्हणजे स्त्रीभ्रुण हत्या होय.

1901 साली 972 स्त्रियांची संख्या प्रति 1000 पुरूष होती. 2001 साली 933 स्त्रियांची संख्या प्रति 1000 पुरूष होती. महाराष्ट्रातील सहा वर्षांच्या खालील मुलींचे प्रमाण सन 2001 मध्ये 913 असे होते. मात्र 2011 च्या जनगणनुनार हे प्रमाण 883 इतके म्हणजे जवळ जवळ 30 टक्के खाली उतरले आहे.

सेंटर फॉर ग्लोबल हेल्थ रिर्सर्च तर्फे करण्यात आलेल्या सर्वेक्षणातून असे समोर आले आहे की, भारतात ल्या तीन दशकात एक कोटी विस लाख बालीकांची भ्रुणहत्या करण्यात आलेली आहे. तसेच संयुक्त राष्ट्र बाल धेकार समितीच्या म्हणण्यानुसार आशिया खंडात विशेषतः भारत आणि चीन या दोन देशात अकरा कोटी सत्तर ख बालीकांची भ्रुणहत्या झालेली आहे. तर स्त्रीभ्रुण हत्या विरोधी चळवळीतील डॉ. सुधा कांकरिया यांच्या मते, ा वीस वर्षात अंदाजे दिड कोटी भ्रूणाची हत्या करण्यात आलेली आहे. असे म्हटले जाते. की महाराष्ट्रात दररोज ते150 भ्रुणहत्या केल्या जातात. यावरून हे स्पष्ट होते की, स्त्रीभ्रुण हत्या मोठया प्रमाणात होत असल्यामूळके हजार पुरूषांमागे स्त्रियाचे प्रमाण हे कमी होत आहे. पुरोगामी महाराष्ट्रात स्त्रीभ्रुण हत्या चे प्रमाण वाढत आहे. णहत्या हि मानसिक विकृती चे निदान करून त्यावर उपाययोजना करण्याची वेळ आल्याचे चित्र जनगणना ते2011 च्या जनगणने वरून स्पष्ट होते. दिवसेंदिवस 0 ते 6 वयोगटातील मुलांची संख्या वाढत आहे, तर संख्या कमी होत आहे.

2001 च्या जनगणनेनुसार देशाच 0 ते 6 वयोगटातील लिंग गुणोत्तर 927 होतं. महाराष्ट्रासाठी हे गणोत्तर ं. त्यातही कोल्हापूर, सांगली आणि सातारा या तीन जिल्हयांमध्ये हे प्रमाण 878 हून कमी होत. एस आर एस

च्या आकडेवारीनुसार 2006 ते 2008 साली महाराष्ट्राचे जन्माच्या वेळचे गुणोत्तर 1000 मुलांमागे 869 मुली इतके कमी झाले आहे. यातून राज्यामध्ये गर्भलिंगनिदान होत आहे हे स्पष्टपणे दिसून येते.

हे कमी होण्याचे कारण म्हणजे व्यक्तीची मानसिकता होय. हा एक सामाजिक रोग होय. त्याचा प्रादुर्भाव आज सर्वत्र जसे षहरी, ग्रामीण, श्रीमंत, गरीब, शिक्षित, अशिक्षित, विकसित, अविकसित, भेंदाना ओलाडून जात आहे. अलिकडे मराठवाडयातील बीड जिल्हयातील परळी वैजनाथ येथिल एका नाल्यात नउ स्त्री अर्भके सापडली. या घटनेने सर्वत्र खळबळ उडाली. हा प्रश्न चर्चेला सामोरा आला. एवढेच नव्हे तर विद्येचे माहेरघर असलेल्या, फुले आणि कर्वे यांच्या पुण्यात गर्भलिंग चाचणीचा अमानवी प्रकार उघडकीस आला. मुलगी होणार असल्याचे निदान करून तो गर्भ मारून टाकण्याचे काम करणाऱ्यामध्ये शिकलेल्यांची संख्या जास्त आहे.

गर्भधारणेच्या किंवा प्रसुतीच्या आधी गर्भाचे लिंग जाणून घेण आणि जर मुलींचा गर्भ असेल तर गर्भपात करणे म्हणजे गर्भलिंग निवड. पुरूष प्रधान समाजात मुली आणि स्त्रियांना असणांर दुयम स्थान आणि मुलींबाबत केला जाणारा भेद हेच यामागच मूळ कारण आहे. मुलाच्या हव्यासापी सोनोग्राफीच्या तंत्रज्ञानाचा वापर गर्भाचा लिंग जाणून घेण्यासाठी केला जातो आणि मुलीच गर्भ असेल तर तो पाडला जातो.

अलीकडील बदल म्हणजे स्त्री भ्रूणहत्या रोखण्यासाठी भारत सरकार कडून सर्व सोनोग्राफी सेंटरवर सायलेंट ऑब्झर्व्हर मशीन बसविले जाणार आहे. याव्दारे संबंधित डॉक्टरने स्त्री भ्रूण असल्याची तपासणी केली का ? याची नोंद होणार आहे. त्याशिवाय प्रत्येक तपासणींची नोंद होईल. त्या आधारे जिल्हा रूग्णालयाचा पथकाला संबंधित डॉक्टरांवर कारवाई करणे सोयीचे होणार असून स्त्री भ्रूणहत्या थांबण्यास मदत होईल.

प्रसर्वपूर्व परिक्षणतंत्र कायद्याच्या अन्वये गर्भलिंग चाचणीवर बंदी घालण्यात आली आहे. तरीही अवैद्य पध्दतीने हया चाचण्या केल्या जातात. हे प्रकार रोखण्यासाठी शासनामार्फत गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व निदानंतत्र लिंगनिवडीस प्रतिवंध कायदा 1994 आणि सुधारित कायदा 2003 उपलब्ध आहेत. मात्र हया कायद्याची म्हणावी तशी अमलबजावणी होताना दिसत नाही.

1994 च्या गर्भधारणा पूर्व व प्रसूतीपूर्व निदान तंत्र वापर (गर्भलिंग निदान प्रतिबंध) या कायद्यानुसार गर्भलिंगनिवड गुन्हा आहे. सोनोग्राफीसारख्या तंत्राचा वापर गर्भाचा लिंग जाणून घेण्यासाठी केला जाउ नये म्हणून हा कायदा अस्तित्वात आला. या कायद्यानुसार पहिल्या गुन्हासाठी 3 वर्षापर्यंत कैद आणि 10,000 रू. दंडाची शिक्षा होउ शकते. परंतु या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी होउ शकलेली नाही आणि त्यामुळे थोडयाच लोकांना शिक्षा होउ शकली आहे गुन्हा सिध्द करणं हेच सर्वात मोठा आव्हान आहे. कारण गर्भलिंग निदान उघडपणे होत नाही आणि बहुदा दोन्ही पक्षांच्या संमतीने घडत असते. त्यामुळे तक्रार कोण दाखल करणार?

काही जण याची पाठराखण करतात की समाजात मुली कमी असल्या तर त्यांच स्थान उंचावेल. पण प्रत्यक्षात मुलीची संख्या जर कमी झाली तर त्यांच्यावरती बंधन अजूनच वाढतील. तसच अपहरण, हिंसा आणि बलात्काराच्या घटनाही वाढतील. एका बाईशी एकाहून अधिक पुरूषांनी लग्न करण्याच्या जुन्या प्रथाही परत सुरू होतील. देशाच्या काही भागात आजही लग्नासाठी मुली मिळत नसल्यामुळे बायका विकल्या जात आहेत. अशाही बातम्या प्रसारमाध्यमां मध्ये येत आहेत.

स्त्रीभ्रुणहत्या साठी अंधश्रध्दा, रुढी, परंपरेचा प्रभाव, मुलगा हा वंशाचा दिवा मानण्याची प्रवृत्ती, पुरुषप्रधान समाज, स्त्रियांचे आर्थिक परावलंबन, हुंडा पध्दती, खर्चिक विवाह विधी पध्दती, शासनाची उदासीनता, गर्भजल परीक्षण वदी कायदयातील उणीवा, व्यावहारीक व अमानुष प्रवृत्ती इत्यादी घटक जवावदार आहेत. आजचे युग हे जागतिकीकरणातील युग आहे. परंतु या युगात स्त्रीयांचे प्रमाण कमी होत राहिल्यास बलात्कार, वेश्याव्यवसाय,छेडछेडीचे प्रमााण वाढेल, लैगिंक शोषण, असुरक्षितता इत्यादी सारखे प्रश्न निर्माण होतील व वैवाहिक, कौटुंविक, सामाजिक जीवन अरिथर वनेल, अविवाहित पुरूषांमागे गुप्तरोग व तत्सम रोगाचे प्रमाण वाढेल. त्यांच्यात आपण जास्त श्रम करावेत ही प्रेरणाच राहणार नाही, कदाचीत वहुपतीत्वाची पध्दत रुढ होउ शकेल.

आंतरराष्ट्रीय स्तरावर स्त्रीचा प्रभाव प्रत्येक देशाच्या समाजव्यवस्थेवर, पर्यायाने महिलांच्या दर्जावर पडला. भारतीय समाजव्यवस्थेत सुध्दा वदलत्या परिस्थितीत उत्पन्न झालेल्या अनेक सामजिक, आर्थिक व राजकीय प्रभावाने स्त्री जीवनात महत्त्वपूर्ण वदल घडून आलेत. परिणामतः महिलांच्या भुमिकेत व दर्जात आतुलाग्र वदल होणास सुरूवात झाली. धार्मिक परिवर्तना, सामाजिक प्रतिष्ठा आणि मालमत्ता विषयक अधिकार या वावतीत समाजाच्या मुलभूत सामाजिक संरचनेत परितर्वन झालेले दिसून येत आहे.

**संदर्भ ग्रंथ**

1. भारतातील सामाजिक समस्या, शिवाजी विद्यापीठ (दूर शिक्षण कॅंद्र) कोल्हापूर.
2. समाजिक समस्या, प्रा. काळदाते सुधाताई.
3. प्रा. आहुजा राम (1994) सामाजिक समस्यांए रावत प्रव्लीकेशन, जयपूर.
4. प्रा. विलास संगवे (1979) भारतातील सामाजिक समस्या, पापूलर प्रकाशन, मुंवई.
5. प्रा. पेंडसे सचिन (2024) पर्यावरण आणि समाज य.च.म.मु. वि. नाशिक.
6. प्रा. आगलावे प्रदिप (2009) आधुनिक भारतातील सामाजिक समस्या विद्या प्रकाशन, नागपूर.

**ISBN: 978-93-91998-09-7**

**Title:** Bharateey Stree : Kaal, Aaj Ani Udya

**Editors:** Dr. T. R. Fisfise and Dr. V. M. Suryawanshi

© Editors

**First Edition :** 8 March 2022

**Published by**
Seema Zade
*for* Snehal Publication,
104-A, Shivram Nagar, Parbhani - 431401.
Mob. + 91 8329000732
Email: snehalprinters92@gmail.com

**Printed at**
Snehal Printers and Book Binders,
104-A, Shivram Nagar, Parbhani – 431401
Mob. + 91 9730721393

**Price: Rs 395/-**

All rights reserved. No material may otherwise be copied, modified, published, or distributed without the copyright owner's prior written permission.

Academic facts, views, and opinions published in the book express the author's views solely. The author is responsible for their content, citation of sources and the accuracy of their references. The publisher cannot be held accountable for any lacks or possible violations of third parties rights.

१. आत्मविश्वास निर्माण करणारी बुद्धकालीन स्त्री : पटाचारा थेरीचे योगदान
डॉ. बालाजी मारूती गव्हाळे ७
२. 'स्त्री विनयभंग' समस्येचे समाजशास्त्रीय अध्ययन
डॉ. चंद्रशेखर आर. भेजे १६
३. महिला सबलिकरणाची सद्यस्थिती
पत्रकार सुवर्णा थोरात-तांबारे २३
४. स्त्री सुधारणा व कर्मवीर व्यंकटराव रणधीर
आबासाहेब माणिकराव देशमुख ३१
५. कौटुंबिक हिंसाचार
प्रियंका राजेंद्र आठे ३६
६. तमांशा क्षेत्रातील 'स्त्री' कलावंतांच्या जीवनावर
प्रकाश टाकणारी कादंबरी : वैजयंता
डॉ. बडुरे राजू सायन्ना ४२
७. प्राचीन काळातील भारतीय स्त्रियांचा दर्जा
डॉ. बावलगावे सी. एम. ५०
८. आधुनिक स्त्रीसमस्या वरील उपाययोजनांचे अध्ययन
डॉ. प्रमिला हरीदास भुजाडे (गणवीर) ५४
९. कोविड १९ चा महिला वरील परिणाम
शिवराणी भीमराव भुस्से ६३
१०. भारतीय समाजातील हुंडा समस्येच्या कारणांचा अभ्यास
विक्रम लक्ष्मनराव भुतेकर ६६
११. महिला वचत गट आणि महिला सक्षमीकरण
डॉ. विठ्ठल गोपा चव्हाण ७५
१२. भारतीय संविधान आणि स्त्रीयांचे मुलभूत अधिकार : एक दृष्टीक्षेप
आनेराव एम.एम. ८२
१३. घटस्फोट भारतीय समाजातील एक सामाजीक समस्या
डॉ. सुर्यवंशी व्हि. एम. ८७
१४. महिला सक्षमिकरणात वचत गटाची भुमिका
डॉ.हनुमान मुसळे ९२
१५. भारतीय समाजातील स्त्रिभ्रूनहत्या एक अभ्यास
डॉ. एम. एफ. राउतराहे ९७
१६. भारतीय महिला आणि कौटुंबिक हिंसाचार
डॉ. सुरेवाड संजय गंगाराम १०३

# भारतीय स्त्री

## काल, आज आणि उद्या

:: संपादक ::

डॉ. तुकाराम फिसफिसे
डॉ. विश्वनाथ सूर्यवंशी

SNEHAL PUBLICATIONS
Parbhani- 431401

१६.

# भारतीय महिला आणि कौटुंबिक हिंसाचार

प्रा. डॉ. सुरेवाड संजय गंगाराम
सहा.प्राध्यापक व विभाग प्रमुख समाजशास्त्र विभाग
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय अंबाजोगाई जि. बीड

आज २१ व्या शतकात स्त्रीया हया एकीकडे स्त्रीया पुरूषांच्या खांदयाला खांदा लावून काम करताना दिसत आहेत पण एकीकडे काही स्त्रीयांची कमवत्या रोजगारातून पिछेहाट होताना दिसत आहे. आज आपण प्रगतीच्या व शैक्षणिक युगात पदार्पण केले असले तरी स्त्रीया हया पाहिजे तेवढया प्रगत झाल्या नाहीत. आजच्या या युगात आजही स्त्रीयांच्या सुरक्षिततेचा प्रश्न आणकी आहे. आज दररोज स्त्रीयांवर अन्याय अत्याचार चालूच आहेत. स्त्रींयावरील अन्याय अत्याचाराचे प्रमाण वाढतच आहे. स्त्रियांवरील अत्याचार ही अशी एक भीषण आणि गंभीर समस्या वनली आहे. अत्याचार ही अशी सामाजिक घटना ही जिला एका चौकटीमध्ये व्याख्येत वध्द करणे अवघड. मारहाण, लैगिंक छळ, शारीरिक छळ, मानसिक छळ, अपहरण, सक्तीने किंवा फसवून वेश्याव्यवसायात प्रवृत्त करणं, आत्महत्या करायला भाग पाडणं, या प्रत्येक शब्दाला निश्चित असा मर्यादित अर्थ आहे. तसा तो अत्याचाराचा एक भाग आहे, हे लक्षात घेतले पाहिजे.

आपल्या आजूबाजूला शारीरिक व मानसिक हिंसची अनेक रूपे पाहतो. आधुनिक जीवनाचा हिंसा हा एक अविभाज्य भाग झाला आहे. एक व्यक्ती म्हणून समाजात घडणारा हिंसाचार स्त्रियांना भोगावा लागतो. पण त्याच वरोबर स्त्री म्हणून विशिष्ट प्रकारच्या अत्याचारांना देखील त्यांना तोंड द्यावे लागते. लैगिंक हल्ला हे स्त्रियांवरील अत्याचाराचे विशिष्ट रूप आहे. कुठलीही स्त्री तशी पूर्णपणे कुठेच सुरक्षित नसते. झोपडपट्टीतील लहान मुलगी जन्मदात्या बापाच्या अत्याचाराला बळी पडते. श्रीमंत वस्तीतील एकाकी म्हातारी असो किंवा पोलिस कोठडीतील स्त्री असो, वस मधील गर्दी असो किंवा रस्त्याने चालणे असो, सर्वच ठिकाणी हे अनुभव येतात.

स्त्रियांवरील हिंसाचाराची विविध रूपे :

हिंसा शारीरिक किंवा मानसिक असू शकते. अर्थात इथे आपण प्रामुख्याने शारीरिक हिंसाचाराचा विचार करणार आहोत.

१. कुटुंबांतर्गत हिंसा : मारहाण, आत्महत्येला प्रवृत्त करणे, हुंडाबळी, बलात्कार, लहान मुलींवरील लैंगिक गुन्हे, स्त्री गर्भ हत्या, स्त्री अर्भक हत्या इ.

२. कुटुंबाबाहेरील हिंसा : छेडछाड, बलात्कार, चेटकीण समजून त्रास देणे, वेश्यावृत्ती, नकार दिल्यामुळे होणारे हल्ले, अश्लिल साहित्य इ.

३. कुटुंबातील हिंसा : स्त्री कुटुंबाच्या चार भिंतीच्या आत सुरक्षित असते. घराचा उंबरठा तिने ओलांडला तरच तिला असुरक्षिततेचा अनुभव येतो. असं मानलं जाते. पण खरं तर ती घरात आणि घराबाहेर दोन्हीकडे असुरक्षित असते. कुटुंबात होणाऱ्या हिंसाचाराचे प्रमाण जगात आणि भारतातही प्रचंड आहे, पण त्याबद्दल जास्त बोललं जात नाही.

४. मारहाण : भारतीय समाजाच्या सर्व स्तरात कुटुंबातील बाईला, प्रामुख्याने पत्नीला मारहाण करणे ही एक प्रतिष्ठित बाब. अर्थात या गोष्टी बाहेर न सांगण्याचेच शिक्षण स्त्रियांना मिळालेले असते. त्यामुळे त्याची निश्चित आकडेवारी उपलब्ध होऊ शकत नाही. ही मारहाण अदृश्य राहते, कारण स्त्री ही मारहाण बऱ्याचदा निमूटपणे सहन करते. कामगार वर्गातील स्त्रिया, शेतमजूर स्त्रिया यांना या मारहाणीचे विशेष वाटत नाही (अंगवळणी पडल्यासारखे) मध्यमवर्गीय स्त्रियांना त्याचा धक्का बसतो, अर्थात सर्वच वर्गातील स्त्रियांना आपल्यावरील मारहाणीची चर्चा करतांना लाज वाटते.

समाजामध्ये बायकोला होणाऱ्या मारहाणीची दखल घेतली जात नाही. तिच्या मदतीचा धावा ऐकून सुध्दा कोणी मध्ये पडत नाही. त्यातही बाकको जर चांगली म्हणजे स्वभावाने गरीब, जुन्या चालीरितीची असेल आणि नवरा वाईट दारूडा असेल तर तिला थोडीफार सहानुभूती मिळते. मारहाण झालेल्या स्त्रीचे जवळचे नातेवाईक सुध्दा, तिचे काय चुकते हे प्रथम पाहतात. मारहाण का होते?

अनेक कारणे:

संशयी स्वभाव, चारित्र्याविषयी संशय, स्वयंपाक न आवडणे लैंगिक संबंधाना नकार, उध्दटपणे बोलणे, बाहेरचा राग घरात काढणे, पैसे किंवा इस्टेटीत वाटा देण्यास नकार, दारूच्या नशेत मारणे इ. गोष्टी सार्वत्रिक आहेत. अनेक वेळा क्षुल्लक कारणावरून मारहाण होते. स्त्रीला तिची जागा दाखवून देणे आपले पुरूषत्व सिध्द करणे, नैराश्याचा राग काढणे इ. कारणे ही आहेत. सुशिक्षित कुटुंबापेक्षा अशिक्षित कुटुंबात मारहाणीचे प्रमाण जास्त थोडक्यात पत्नीला होणारी मारहाण ही सहसा गुन्हा म्हणून नोंदवली जात नाही. यासंदर्भात विविध कारणे होत आहेत. स्त्रियांवरील हिंसाचारविरोधात

कायदा झाला आहे. नजीकच्या भविष्यकाळात त्याचा स्त्रियांना झालेला उपयोग दिसून येईल. अशी अशा करू या.

स्त्री गर्भहत्या व स्त्री अर्भक हत्या :

भारतातील प्रामुख्याने उत्तर व पश्चिम भारतातील मध्यम जातीमध्ये मुलींना जन्मताःच मारून टाकण्याची चाल होती. नवजात बालिकेला दुधाच्या भांडयात बुडविणे, विषारी फुले किंवा रस पाजणे, अशा क्रुर पध्दतींचा अवलंब त्यासाठी होत आहे. १८७० साली ब्रिटीश सरकारने स्त्रीअर्भक हत्येच्या प्रथेला आळा बसावा म्हणून कायदा केला. परंतू बदलत्या काळातही ही प्रथा टिकून राहिली. आजही राजस्थान तसेच तामीळनाडूतील काही कनिष्ठ जातमध्ये ही प्रथा आढळते. तामिळनाडूतील कल्लार जातीत १० वर्षाखालील बालकांमध्ये मुलींचे प्रमाण ३०% आढळते. दारिद्रय, निरक्षरता प्रचंड असलेल्या या जातीत मुलीला मोठे करणे व हुंडा देवून तिचे लग्न करणे परवडयाजोगे नाही, असे मानले जाते. तर आर्थिक व राजकीयदृष्ट्या प्रबळ राजपूतांना मुलीच्या लग्नात स्वताःकडे घ्यावा लागणारा कमीपणा व इज्जतीवरील घाला वाटतो.

आधुनिक काळात मुलगी जन्माला येण्यापूर्वीच गर्भावस्थेत असतानाच नष्ट करण्याचा हिंसाचाराचा प्रभावी मार्ग निर्माण झाला आहे. हि हिंसा उघड नाही. समाजाच्या सर्व स्तरात गर्भलिंग चिकित्सेच्या माध्यमातून मुलीचा गर्भ असल्यास तो नष्ट करण्याला मान्यता मिळाली. आता कायदयाने त्यावर बंदी आली असली तरी मधल्या काळात असंख्य स्त्री गर्भहत्या झाल्या आहे. कुटुंबातर्गत हिंसेत स्त्री गर्भ हत्येचा समावेश केला आहे कारण डॉक्टर किंवा नाकारण्याचा निर्णय कुटुंबातच घेतला जातो, हे महत्वाचे

हुंडयासाठी होणारा छळ, हुंडाबळी, आत्महत्या इ.:

स्त्रियांच्या अस्तित्वावर घाला घालणाऱ्या विविध तंत्रापैकी हुंडाबळी सर्वात प्रचलित होय. हुंडा ही समाजमान्य प्रथा. या प्रथेने अत्यंत विकृत रूप धारण केले आहे. स्त्रियांच्या अनेक समस्यांच्या मुळाशी हुंडापध्दत हे महत्वाचे कारण आहे. हुंडा कमी दिला म्हणून किंवा अधिक मिळावा म्हणून माहेरून पैसे आणवे इ. कारणासाठी संबंधित मुलींचा मानसिक, शारीरिक, छळ करण्याचे प्रकार मोठया प्रमाणात दिसून येतात. प्रसंगी हुंडयासाठी हत्या ही केली जाते. तर कधी-कधी हा त्रास असहय होऊन मुली आत्महत्या करतात.

लहान मुलींवरील लैंगिक हल्ले, बलात्कार, लैंगिक छळ इ. :

बालकांवरील हिंसाचाराचा हा सर्वात घृणास्पद पैलू आहे. अर्थात या गोष्टी लपविण्याकडे पालकांचा कल असतो. लहान मुले व मुली दोघे ही अशा अत्याचाराचे बळी पडतात. मुलींच्या बाबतीत त्याचा परिणाम अधिक दूरगामी असतो. वेगवेगळया संशोधनातून असे आढळून आले आहे की असे हल्ले करणाऱ्या व्यक्ती गुन्हेगार किंवा विकृत असतातच असे नाही तर बऱ्याचदा असे अत्याचार ओळखीच्या तसेच जवळच्या नातेवाईक व्यक्तीकडून होतात (मित्र, नातेवाईक, शेजारी इ.) कधी-कधी बाहेरच्या अनोळखी व्यक्तीकडूनही असे गुन्हे घडतात. सुरूवातीला मुलीला जवळ घेणे, कुरवाळणे अशा प्रक्रियातून याची परिणिती बलात्कारात देखील होते. लहान मुलींचे लैगिंक शब्दाबद्दलचे अज्ञान, दुर्बलता, अत्याचार करणाऱ्या व्यक्तीची भीती यामुळे मुली प्रतिकार करू शकत नाहीत. काहीतरी घाणेरेडे घडले आहे. एवढेच त्यांना कळते. दुसऱ्याला सांगितल्यास कोणी विश्वास ठेवणार नाही, किंवा आपाल्यालाच दोष देतील किंवा अत्याचार केलेल्या व्यक्तीच्या भीतीमुळे हया गोष्टी लपवून ठेवतात. कुणाला सांगत नाही. अनकेकदा आई-वडिल देखील अब्रूच्या भीतीने या गोष्टीची वाच्यता करीत नाहीत. व त्यामुळे अत्याचारी मोकाट रहातात, अत्याचाराची तीव्रता लक्षात येत नाही. त्यांच्या हल्ल्यात बळी पडलेल्या मुली यास शारीरिक व मानसिक दृष्ट्या खचून जातात. (लहान मुलींशी संभोग करण्यासंबंधी अनेक अंधश्रध्दा – लैगिंक रोग बरे होतात इ.)

थोडक्यात कुटुंबातर्गत हिंसची विधि रूपे आहेत. याची परिणती स्त्रीची सतावणूक, लैगिंक छळ, दृष्कृत, बलात्कार अशा विविध रूपात होऊ शकते. परिणामता: स्त्रिया आत्महत्या करण्यास प्रवृत्त होतात किंवा त्यांना आत्महत्या करण्यास भाग पाडले जाते.

कुटुंबाबाहेरील अत्याचार:

लहानपणापासूनच बाहेर खेळण्यास जाऊ नकोस, अंधार पडायच्या आत घरी ये, एकटी जाऊ नकोस, असे उद्‌गार मुलींना ऐकावे लागतात. बाहय जग हे स्त्री करता असुरक्षित आहे, हे लहानपणापासूनच तिच्या मनावर बिंबवले जाते. त्यामुळेच पुढे विविध कारणांनी जेव्हा तिला घराबाहेर पडावे लागते, तेव्हा तिच्या मनावर या भीतिचा प्रभाव असतो. घराबाहेर स्त्रियांवरील अत्याचार पुढीलपैकी कोणत्याही स्वरूपाचे असू शकतात. छेडछाड, विनयभंग, बलात्कार, प्रेमास नकार दिला म्हणून खून, चेटकीण म्हणून छळ, बीभत्स अश्लील वाङमय, वेश्याव्यवसाय इ.

छेडछाड, विनयभंग, लैगिंक छळ :

लैंगिक छळाच्या अनुभव प्रत्येक स्त्रीच्या वाट्याला कधी ना कधी येतोच. बलात्काराचा प्रसंग सर्वच स्त्रियांच्या वाट्याला येत नसला तरी त्याचे सौम्य रूप स्त्रियांच्या अनुभवास येते. एखादया स्त्रीकडे पाहून अश्लील बोलणे, अश्लील हावभाव करणे, शिट्टी वाजवणे, धक्का मारणे, स्पर्श करणे इ. मार्गांनी विनयभंग करण्याचे प्रकार रस्त्यावर, गर्दीच्या ठिकाणी, बसमध्ये, लोकलमध्ये, कामाच्या ठिकाणी घडत असतात. अर्थात त्याची दखल पोलिस किंवा सर्वसाधारण लोक घेत नाहीत. पण ही साधी गोष्ट नाही. पण ही साधी गोष्ट नाही. या प्रकारातून विकृत आनंद मिळवला जातो. आणि त्याचे भक्ष्य बनलेल्या स्त्रियांच्या मानसिक आणि शारीरिक अवस्थेवर ताण निर्माण होतो. दिवसेंदिवस हे प्रकार वाढत चालले आहे. त्यामुळे स्त्रियांना रस्त्यावरून जाणे-येणे कठीण होत चालले आहे. अनेक मुलींना त्यामुळे शाळा, कॉलेजला जाणे सोडून द्यावे लागते. रॅगिंगच्या नावाखाली काही वेळा हे घडते, सिटीबस, लोकल, सिनेमा गृहे, बाजार इ. ठिकाणी देखील हे घडत असते. स्त्रियांच्या व्यवसायाच्या, कामाच्या ठिकाणी देखील हे घडत असते आणि हे जास्तच गंभीर आहे. कारण त्यामुळे काम करण्याची उमेद विश्वास, ध्येय कमी होते तर अनेकदा कामाला मुकावे लागते.

त्यामुळे स्त्रीयांवरील अन्याय अत्याचार थांबतील पणअसा ठोस निर्णय आतापर्यंत तरी घेण्यात आलेला नाही. पण हा अन्याय अत्याचार थांबवण्यासाठी आपण आपल्या घरापासूनच सुरूवात केली तर या अन्याय अत्याचाराला थोडा तरी आळा बसेल जसे की आपण आपल्या मुलांना लहानपणापासूनच चांगले संस्कार दिले व चांगली समजवणूक दिली तर ते स्त्रीयांना उच्च दर्जा देतील व चांगले वागतील त्यामुळे या बदलाची सुरूवात ही घरापासूनच होणे गरजेचे आहे. ज्यामुळे समाजात स्त्रीयांची चांगली भावना निर्माण होईल.

**संदर्भ :**

१. एस.एन. गंदेवार, 'भारतीय समाजवादातील विषय आणि समस्या, विद्याभारती प्रकाशन, लातूर

२. प्रा. अशोक गोरे, 'भारतीय समाज प्रश्न आणि समाज', विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगपुरा, औरंगाबाद

३. रा.ज. लोटे, 'भारतीय सामाजिक समस्या', पिंपळापुरे अॅण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर

४. डॉ. सुधा काळदाते, 'भारतीय समाज प्रश्न आणि समाज', विद्या बुक्स पब्लिशर्स औरंगपुरा, औरंगाबाद.
५. डॉ. दा. धो. काचोळे, 'सामाजिक विघटन आणि नागरी समाज', कैलास पब्लिकेशन्स, औरंगपुर, औरंगाबद.
६. इंटरनेट

□□□

(SJIF) Impact Factor-8.575
ISSUE No- (CCCXVIII) 348
ISSN-2278-9308

# B.Aadhar

Peer-Reviewed & Refereed Indexed
Multidisciplinary International Research Journal
May -2022

## 'Role of Social Sciences in Contemporary Society'




Prof. Virag.S.Gawande
Chief Editor
Director
Aadhar Social Research & Development Training Institute, Amravati.

Prof. Sujata Awati
Editor
The New Miraj Education Society's
Kanya Mahavidyalaya, Miraj

Aadhar International Publication
For Details Visit To : www.aadharsocial.com
© All rights reserved with the authors & publisher

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.575, Issue NO, 349(CCCXLIX) B
ISSN : 2278-9308
May, 2022

# INDEX


| No. | Title of the Paper | Authors' Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | स्वातंत्र्योत्तर काळातील स्त्रियांचे योगदान | लेफ्ट. डॉ. अर्चना टाक | 1 |
| 2 | स्वातंत्र्याची ७५ वर्षे | सहा. प्रा. अस्मिता संजय कोडग | 4 |
| 3 | 'हॅन्डबॉल खेळाडूंच्या वेग या घटकावर टायर प्रशिक्षणाचा होणारा परिणाम: एक अभ्यास' | प्रा. बाळासाहेब म्हाळू सरगर ,डॉ. सुनिल दत्तात्रय चव्हाण | 7 |
| 4 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राष्ट्रीय सुरक्षेबाबतचे विचार | प्रा. बाबासाहेब शात्रू पाटील | 12 |
| 5 | प्रसूतीपूर्व आणि प्रसूतीनंतरच्या तंदुरुस्तीसाठी विशेष परिस्थितींमध्ये व्यायामाचे नियम आणि व्यायामाची पद्धत. | डॉ.भारत राजाराम चालसे | 14 |
| 6 | आदिवासींचे सण व उत्सव | भोई रविंद्र रतिलाल | 19 |
| 7 | सामाजिक समस्या, लिंगभाव आणि समाज | प्रा. बिजली श्रीपाल दडपे | 22 |
| 8 | राजर्षि शाहूंची कोल्हापूर संस्थानातील कामगार विषयक भूमिका | प्रा. डॉ. दत्तात्रय पांडुरंग खराडे | 25 |
| 9 | लिंग,लिंगभाव आणि हिंसाचार | दिपाली शंकर वाघमारे | 29 |
| 10 | छत्रपती शाहू महाराज यांचा सामाजिक न्यायाचा विचार | डॉ. अण्णासाहेब हरदारे | 33 |
| 11 | समकालीन समाज आणि संत साहित्यातील सामाजिक विज्ञान | डॉ. चंदशेखर आत्माराम भगत | 36 |
| 12 | शाहू महाराजांचे महिला सक्षमीकरणातील योगदान | डॉ. गौतम नामदेव ढाले | 40 |
| 13 | सामाजिक चळवळींचा चिकित्सक अभ्यास | प्रा. डॉ. गंगाधर बालू चव्हाण | 44 |
| 14 | शिक्षण व शारीरिक शिक्षणाची कोरोना काळातील भूमिका | डॉ.महादेव सुखदेव सुर्यवंशी | 47 |
| 15 | कोविड–१९ चा भारतीय उद्योगांवरील परिणाम | डॉ.तेजस्विनी बी. मुडेकर | 51 |
| 16 | महिलांच्या सर्वांगीण विकासात क्रीडा व शारीरिक शिक्षणाची भूमिका :एक अभ्यास | डॉ. प्रिया प्रकाश टेळे | 55 |
| 17 | गुणग्राहक राजा छत्रपती शाहू महाराज | डॉ रामदास वैद्य | 60 |
| 18 | जातीव्यवस्था व अस्पृश्यता – डॉ. बाबासाहेब आंबेडकर | डॉ. सुरेवाड संजय गंगाराम | 63 |

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.575,Issue NO, 348 (CCCXLIX) B
ISSN : 2278-9308
May, 2022

# जातीव्यवस्था व अस्पृश्यता – डॉ. वावासाहेव आंवेडकर

डॉ. सुरेवाड संजय गंगाराम
सहा. प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग,यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंवाजोगाई, जि.वीड

डॉ. वावासाहेव आंवेडकर हे विश्वातील एक महान वैज्ञानिक ते तत्वचिंतक लेखक आणि संशोधक होत. त्यांनी सामाजिक विज्ञानातील समाजशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास, धर्म, तत्वज्ञान, कायदा इत्यादी विविध ज्ञानशाखेतील ज्ञान अतिशय परिश्रम करून संपादन केले होते. डॉ. वावासाहेव आंवेडकर हे अर्थशास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ, राज्यशास्त्रज्ञ, घटनातज्ञ, आणि तत्त्ववेत्ते होते. सामाजिक विज्ञानातील विविध ज्ञानशाखा चे अध्ययन आणि संशोधन त्यांनी केल्यामुळे ते एक महान सामाजिक व वैज्ञानिक समाजशास्त्रज्ञ म्हटल्यास वावगे होणार नाही. डॉ. वावासाहेव आंवेडकर हे जगातील एक प्रमुख बुद्धिमान विचारवंतापैकी एक सामाजिक विचारवंत होत. ते केवळ विद्वान आणि विचारवंतच नव्हते तर ते एक कृतिशील विचारवंत होते. अतिशय परिश्रम करून संपादित केलेल्या ज्ञानाचा उपयोग त्यांनी भारतीय समाजात आमूलाग्र परिवर्तन घडून येण्यासाठी केला. त्यामुळे ते एक कृतिशील विचारवंत आणि क्रांतिकारक समाजसुधारक आहेत.

भारतीय समाजातील ज्या अस्पृश्य समाजाला ज्ञान किंवा शिक्षण घेण्याची मनाई होती. त्याच समाजातील व्यक्तीने विश्वातील प्रसिद्ध कोलंविया, लंडन इत्यादी विद्यापीठातून राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, समाजशास्त्र आणि कायदा या विषयाचा सखोल अभ्यास करून जगातील एक श्रेष्ठ विद्वान म्हणून नावलौकिक मिळवला. भारतीय समाजव्यवस्था हा डॉ. वावासाहेव आंवेडकरांचा आवडीचा आणि जिव्हाळ्याचा विषय होता. भारतीय समाजव्यवस्थेत विषमता होती. भारतीय समाजव्यवस्था ही वर्ण आणि जातीवर आधारित होती. विषमतेवर आधारित समाज व्यवस्थेचा अभ्यास आणि संशोधन केल्याशिवाय या व्यवस्थेची वस्तुनिष्ठ माहिती लोकांना कळणार नाही, म्हणून त्यांनी भारतीय समाज व्यवस्था संदर्भात विपुल लिखाण केले. परंतु त्यांच्या सामाजिक संशोधनाच्या संदर्भात मात्र विशेष संशोधन भारतीय संशोधकांनी केली नाही. त्यांच्या भारतीय समाजव्यवस्थेचा संशोधन लेखनाकडे मात्र भारतीय संशोधक आणि विचारवंत यांनी दुर्लक्ष केल्याची आठवण येते. डॉ. रोविन्सन गेल ऑम्वेट या काही मोजक्याच विदेशी संशोधकांनी आणि त्यांच्या सामाजिक विचारावर संशोधनात्मक लेखन केले आहे.

एकोणिसाव्या शतकापासून समाजशास्त्रज्ञ आणि मानववंशशास्त्रज्ञांचे लक्ष् जातीच्या अध्ययनाकडे केंद्रित झाले होते. ज्या विदेशी आणि भारतीय संधोधकांनी जातींचे अध्ययन केले, त्यात नसफील्ड (1881), अवॅडुवॉय (1906), डॉ. एस. व्ही. केतकर (1909), सर एच. रिज्ले, सेनार्ट (1930), एन. के. दत्त (1931), हटटन (1946), डॉ. जी. एस. घुर्ये (1950), म्रेयर (1960), पी. एन. प्रभू (1963), डॉ. इरावती कर्वे (1964), एम. एन. श्रीनिवास (1964) यांचा उल्लेख करावा लागेल.[1] या विचारवंतानी जातीची वैशिष्टये, जातींचे संबंध, उच्च् निच्च्, भेदभाव, रोटीवेटी व्यवहार, जातीचा इतिहास, जातीची अनेकता, अशा अनेक वावीचा उल्लेख केला आहे. परंतु जातीची उत्पती कशी झाली या विषयी सर्वप्रथम समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून विचार मांडणारे विचारवंत म्हणजे डॉ. वावासाहेव आंवेडकर होत.

भारतीय समाजव्यवस्था ज्या वर्ण आणि जाती व्यवस्थेवर आधारित आहे, त्यासंदर्भात डॉ. आंवेडकर यांनी अतिशय वस्तुनिष्ठ पद्धतीने संशोधनपर लेखन केले आहे. परंतु त्यांच्या या संशोधनपर लेखनावर संशोधकांनी संशोधन आणि चिकित्सक लेखन केले नाही. भारतात समाजशास्त्रीय अध्ययन सुरुवात होण्यापूर्वी अमेरिकेच्या कोलंविया विद्यापीठात 9 मे 1916 रोजी भरलेल्या डॉ. ए गोल्डन वायझर मानववंशशास्त्र परिषदेत (The Anthoropology Seminar of Dr. A.A. Galdenwizer) भारतातील पंचवीस वर्षाच्या एका तरुण समाजशास्त्रज्ञांनी भारतातील जाती, घडण, उत्पत्ती आणि विकास (Caste in India: Their Mechanism, Genesis) हा पेपर सादर केला होता. हाच संशोधनपर पेपर मे 1917 च्या 'इंडियन □न्टीक्वेरी' (Indain Antiquary, May 1917, Vol.–XLI) मध्ये प्रकाशित झाला. आणि हेच तरूण म्हणजे भारतीय समाजशास्त्रज्ञ म्हणजेच डॉ. वी. आर. आंवेडकर होते.

"भारतातील जाती: घडण, उत्पत्ती आणि विकास" या संशोधनपर पेपरमध्ये तरूण समाजशास्त्रज्ञ डॉ. वावासाहेव आंवेडकरांनी भारतीय जातिव्यवस्थेच्या उत्पत्तीसंवंधीचे विश्लेषण केले. जाती कशा निर्माण झाल्यात? त्या का टिकून आहेत? यावावतचे मानववंशशास्त्रीय आणि समाजशास्त्रीय विश्लेषण डॉ. आंवेडकरांनी केले. यापूर्वी जातिव्यवसथेच्या संदर्भात सेनार्ट (Senart), नसफिल्ड (Nesfield), सर एच. रिज्ले (Sir H. Risley) या काही विदेशी संशोधक आणि भारतीय संशोधक डॉ. एस.व्ही. केतकन यांनी अध्यन केले होते. परंतु जातीची निर्मिती कशी झाली,

याबाबतचे समाजशास्त्रीय आणि मानववंशशास्त्रीय संशोधन फार कुणी केले नव्हते. "डॉ. आंबेडकर हे पहिले संशोधक होते की, ज्यांनी जातिव्यवस्थेच्या उत्पत्तीचा शोध घेतला." यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जाती व्यवस्थेचा शोध घेतांना समाजशास्त्रीय दृष्टिकोनाचा आधार घेतला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या संशोधनपर लेखामध्ये स्पष्टपणे नमूद करतात की, 'जातीच्या विविध वैशिष्ट्यांच्या समीक्षात्मक मूल्यांकनावरून कोणतीही शंका राहत नाही की, आंतरजातीय विविहाला निषेध किंवा असे विवाह न आढळणे हेच जातिव्यवस्थेचे मूळ आहे'. बहिर्विवाहावर अंतर्विवाहाचे वर्चस्व हेच खरे तत्व जातीच्या निर्मितीस कारणीभूत होते, असा निष्कर्ष मांडतात. यांच संशोधनात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'जात हा एक बंदिस्त वर्ग आहे'. अशी जातीची व्याख्या केली आहे. जातिव्यवस्था आणि अस्पृश्यतेच्या संदर्भात आणि एकंदरित भारतीय समाजव्यवस्थेबाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या संशोधनातून समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून विश्लेषण केले आहे.

समाजशास्त्रज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय जातिव्यवस्थेच्या उत्पत्ती संबंधीचे वस्तुनिष्ठ विश्लेषण केले आहे. जाती कशा निर्माण झाल्या? त्या का टिकून आहेत? याबाबतचे मानववंशशास्त्रीय आणि समाज शास्त्रीय विश्लेषण डॉक्टर आंबेडकरांनी केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जातिव्यवस्थेच्या उत्पत्तीचा शोध घेतला. जातीच्या विविध वैशिष्ट्यांच्या समीक्षात्मक मूल्यांकन करून आंतरजातीय विवाहाचा निषेध किंवा असे विवाह वाढवणे हेच जातिव्यवस्थेचे मूळ आहे. तसेच बहिर्विवाहावर मात्र अंतर्विवाहाचे वर्चस्व हेच खरे तत्व जातीच्या निर्मितीस कारणीभूत आहे. असा महत्वाचा निष्कर्ष समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'जात हा बंदीस्त वर्ग आहे' अशी जातीची व्याख्या करतात. जातिव्यवस्था आणि अस्पृश्यता यांच्या संदर्भात आणि एकंदरीत भारतीय समाज व्यवस्थेबाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या संशोधनातून हा समाजशास्त्रीय विश्लेषण आपल्या संशोधनपर ग्रंथात स्पष्ट केले आहे.

रॉबर्ट मर्टन मते, 'जातिव्यवस्थेचा सिद्धांत जेव्हा संकल्पना एक योजनेच्या रूपात अंत संबंधित होतात तेव्हा सिद्धांत निर्माण होण्यास सुरुवात होते. समाजशास्त्रीय सिद्धांत हे असे वैज्ञानिक सिद्धांत आहेत की जे अंत संबंधित आणि परीक्षण केलेल्या संकल्पनांवर आधारित असतात. ज्यांच्या आधारित सामाजिक व्यवहार किंवा सामाजिक व्यवस्था किंवा सामाजिक परिवर्तनाचे संबंधित अनुभवजन्य वा प्रयोग सिद्ध सामान्यीकरण काढली जाऊ शकते. थोडक्यात समाजशास्त्रीय सिद्धांत हे सामाजिक जीवन वा सामाजिक घटनाशी संबंधित असतात आणि त्याचे प्रतिपादन वास्तविक निरीक्षण परीक्षण आणि वर्गीकरण याच्या आधारे केली जाते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय समाजव्यवस्थेतील जातीव्यवस्था, अस्पृश्यता, आदर्श समाज, धर्म, सामाजिक परिवर्तन इत्यादी च्या संदर्भात ग्रंथात लेखन केले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जातीव्यवस्थेच्या सिध्दांत स्पष्ट करतांना जातीची रचना, जाती व्यवस्थेचे नियम, जातीव्यवस्थेची उतरंड, श्रेणीव्यवस्था, सवर्ण अवर्ण, जातीची घडण, जाती अंतर्गत विवाह, जातीचा उगम, जातीव्यवस्था, जातीव्यवस्थेचे दुष्परिणाम, व जातिव्यवस्थेचे निर्मूलन या महत्व दिले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर ते केवळ सामाजिक विचारवंत होते त्यांनी जातीव्यवस्था व अस्पृश्यता सामाजिक परिवर्तन या संदर्भात केवळ विचारच मांडले नाही तर त्यांनी अनेक नवीन सिद्धांत मांडले आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे संशोधक होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वैज्ञानिक संशोधनाच्या आधारावर आपल्या विविध सिद्धांताची मांडणी केली. तार्किक पद्धत आणि ऐतिहासिक पद्धत या वैज्ञानिक पद्धतीचा अवलंब करून आपले समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून सिद्धांत मांडले.

भारतातील जाती अस्पृश्यता हा स्पर्श आणि शूद्र यांच्या देण्याचा व संदर्भात डॉक्टर आंबेडकरांनी तार्किक आणि ऐतिहासिक पद्धतीचा अवलंब करून आपले सिद्धांत मांडले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यते विषयक विचार मांडण्यापूर्वी आफ्रिका, अमेरिकेतील निग्रो समाज, रोमन साम्राज्यातील गुलाम समाज किंवा ज्यू समाज, त्यांनी प्रत्येक समाजाचा अतिशय सूक्ष्म निरीक्षण पध्दतीने अभ्यास केला, व त्यातून त्यांनी भारतातील जातीव्यवस्थेतील अस्पृश्यता विषयक विचार स्पष्ट केले आहेत. त्यांनी जातीव्यवस्थेतील अस्पृश्यतेचा सिध्दांत हा समाजशास्त्रीय. दृष्टीकोनातून त्यांनी हा सिध्दांत मांडला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यता संबंधी विचार स्पष्ट करतांना सामाजिक, धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक, अशा सर्व बाजूंनी विचार करून सविस्तर विचार मांडले आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जाती अस्पृश्य आणि अस्पृश्यता तसेच सामाजिक परिवर्तनाच्या संदर्भात समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून सिद्धांत मांडलेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जाती, अस्पृश्यता, अस्वच्छता, धर्मांचे मूल्यांकन, आदर्श समाजव्यवस्था, सामाजिक परिवर्तन इत्यादीबाबत या सिद्धांतांनी मांडणीत त्यांचा समाजशास्त्रीय दृष्टीकोन दिसून येतो. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी जातिव्यवस्था, अस्पृश्यता, जातीचा उगम वा उत्पत्तीबद्दल समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून सिद्धांत मांडला हे विशेष महत्त्वाची बाब आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या समाजशास्त्रीय

दृष्टिकोनातून मांडलेल्या सिद्धांताने खंडन केले नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेला हा सिद्धांत वास्तविक निरीक्षण, परीक्षणावर आधारित आहे.

डॉ बाबासाहेब आंबेडकर हे एक सामाजिक वैज्ञानिक होते. आदर्श समाजाच्या संदर्भात त्यांनी केलेले विश्लेषण हे देखील सार्वत्रिक स्वरूपाचे आहे. त्यांनी आदर्श समाजाची स्पष्ट केली. त्यांच्या आदर्श समाजाच्या व्याख्येत सामाजिक महत्त्वाची तत्वे अंतर्भूत आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जातीविषयक सिध्दांतात भारतीय समाजव्यवस्थेचा जातिव्यवस्था हा एक अविभाज्य घटक आहे. जातिव्यवस्थेच्या अध्याय शिवाय भारतीय समाज व्यवस्थेचे यथार्थ आकलन होऊ शकत नाही. या संशोधकांनी जातीची उत्पत्ती, जातीचा इतिहास, जातीची अनेकता, जातीजातीतील संबंध, परिवर्तनाचे स्वरूप इत्यादी पैलूंचे स्पष्टीकरण केले आहे.

डॉ. वावासाहेव आंवेडकरांनी जातीव्यवस्था व अस्पृश्यता विषय विचार मांडताना यावर उपाय म्हणून त्यांनी समाजामध्ये सामाजिक परिवर्तन होणे गरजेचे आहे असे म्हटले आहे, ऑगस्त् काम्त्, कार्ल मार्क्स, किग्जले डव्हिस, हॅरी जॉन्सन या सारख्या विचारवंतानी सामाजिक परिवर्तनासंदर्भात विचार मांडलेत. त्याच समाजशास्त्रीय दृष्टिकोनाचा आधार घेत डॉ. वावासाहेव आंवेडकरांनी जातीव्यवस्था व अस्पृश्यता ही नष्ट करायची असेल तर समाजामध्ये सामाजिक परिवर्तन होणे गरजेचे आहे. डॉ. आंवेडकरांच्या मते, "भारतीय समाजरचनेत सुधारणा कशी घडवून आणावी, जाती नष्ट कशा कराव्यात, हे अतिशय महत्वाचे प्रश्न आहेत," त्याचप्रमाणे जातिव्यवस्था नष्ट करायची असल्यास चातुवर्णवयवसथा नष्ट करावी लागेल, असे त्यांनी स्पष्ट केले.

डॉ. वावासाहेव आंवेडकर यांच्या मते हिंदू धर्माच्या सामाजिक संघटनेचे तत्त्व म्हणजे चार वर्ण त्यावरून हिंदुसमाजाचे चार विभाग पडते, जातीव्यवस्था, जातीचे नियम कोणते याचे विश्लेपण केल्यानंतर जाती व्यवस्था म्हणजे काय? याचे विश्लेपण डॉक्टर वावासाहेव आंवेडकरांनी केलेली आहे. डॉ. वावासाहेव आंवेडकर यांच्या मते जाती जातीमध्ये, विविध जातींमध्ये परस्परसंवंधांची उल्लेख केला जातो. विविध जाती कडे दृष्टिक्षेप टाकल्यास जातिव्यवस्थेच्या पद्धतीची वैशिष्ट्ये लक्षात घेऊ शकतात. विविध जातीच्या पद्धतीत कोणताही परस्पर संवंध नाही. प्रत्येक जात ही वेगळी असुन प्रत्येक जातीच्या निवास ठरवले जाते. दुसरे वैशिष्ट्य म्हणजे जातीव्यवस्थेत एका जातीची दुसऱ्याशी संवंध असतो. त्या जातीच्या दर्जा अवलंवून असतो डॉ. वावासाहेव आंवेडकर यांचा जातीव्यवस्था व अस्पृश्यता विपयक समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून विचार मांडताना मानवाच्या (मानसिक) उत्कर्षासाठी, मानवाचे मन विकसितव सुसंस्कत वनविण्यासाठी आणि सुसंस्कत मनाने जनतेशी संवंध ठेवण्यासाठी डॉ. वावासाहेव आंवेडकरांच्या मतानुसार, मानवाचा धर्माशी संवंध असणे अतिशय महत्वाचे आहे. म्हणूनच डॉ. वावासाहेव आंवेडकरांनी एक धर्म सोडताना दुसरा मनपंसात धर्म स्वीकारला तो म्हणजे 'वौध्द धर्म' स्वीकारला. आपल्या 'समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी आणि आपल्य देशाचे हित जपण्यासाठी त्यांनी घेतलेला निणर्य मानवासाठी कल्याणकारी ठरला.

संदर्भ ग्रंथ :

1. डॉ. वी.के.खडसे (1987), 'आधुनिक समाजशास्त्र', मंगेश प्रकाशन, नागपूर.
2. डॉ. प्रदीप आगलावे (2016), 'समाजशास्त्रज्ञ डॉ. वावासाहेव आंवेडकर', डॉ. वावासाहेव आंवेडकर नॉलेज मिशन प्रकाशन, औरंगावाद.
3. आचार्य सूर्यकांत भगत (2018) डॉ. वावासाहेव आंवेडकर लिखीत जातिभेद निर्मूलन, मिलिंद प्रकाशन, वर्धा.
4. डॉ. ज्ञानराज गायकवाड-राजवंश (2016), 'दलितांचे व राष्ट्राचे हितकर्ते डॉ.वावासाहेव आंवेडकर', डॉ. वावासाहेव आंवेडकर नॉलेज मिशन प्रकाशन, औरंगावाद.
5. प्रा. रावसाहेव कसवे, (1989), 'डॉ. आंवेडकर आणि भारतीय राज्यघटना', सुगत प्रकाशन, नागपूर.
6. प्रा. मा.फ. गांजरे, (1966), 'डॉ. वावासाहेव आंवेडकरांची भाषणे खंड-7', अशोक प्रकाशन नागपूर.
7. डॉ. वी.के.खडसे (1987), 'आधुनिक समाजशास्त्र', मंगेश प्रकाशन, नागपूर.

MAHMAR/2016/...
ISSN 2454-7905
SJIF 2021 Impact Factor 7.479

# Worldwide International Inter Disciplinary Research Journal

(A Peer Reviewed)

Year - 7, Vol. I, Issue- L, 09 April 2022



Kisan Shikshan Prasarak Mandal, Udgir's

## Mahatma Phule Mahavidyalaya, Ahmedpur

NAAC Accredited with 'B' Grade

Dist. Latur State : Maharashtra (413515)

One Day International Seminar (Online)

Organized By

Department of Sociology in collaboration with

Swami Ramanand Teerth Marathwada University Nanded

On

## "Yugpurush Dr. Babasaheb Ambedkar"

Editor in Chief : Principal Dr. Vasant Biradar

Editor : Dr. Satish Sasane

Address for Correspondence

Mrs. Pallavi Laxman Shete

Editor in Chief : Worldwide International Inter Disciplinary Research Journal (A Peer Reviewed Reffered)

Principal, Sanskriti Public School, Nanded (MH, India) Email : shrishprakashan2009@gmail.com

Dr. Rajesh G. Umbarkar

House No. 624 , Belanagar, Near Maruti Temple, Taroda (Kh.) Nanded - 431605 (India - Maharashtra)

Email : umbarkar.rajesh@yahoo.com, shrishprakashan2009@gmail.com Mob. No. 9623979067

Director : Mr. T... Rampurkar (For International Contact only +91-88...789...082)

| | | | |
|---|---|---|---|
| 21. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भारतीय समाजातील अस्पृश्यता व धर्माच्या संदर्भात समाजशास्त्रातील योगदान | डॉ. संजय गंगाराम सुरेवाड | 66 |
| 22. | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जातीनिर्मूलन विषयक कार्य | डॉ. विठ्ठल घेन्दारी | 69 |
| 23. | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक विचार | डॉ. विकास जाधव | 72 |
| 24. | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार : एक अभ्यास | जामकर अलका रानबा | 75 |
| 25. | आधुनिक भारताच्या जडणघडणीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राजकीय योगदान | डॉ. रमाकांत शिवाजीराव शातलवार | 78 |
| 26. | डॉ. बी. आर. आंबेडकर : धर्मांतराची चळवळ, कारणे, परिणाम | प्रा. डॉ. सुनंदा भद्रशेटे | 82 |
| 27. | "डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि सामाजिक चळवळी" | प्रा. डॉ. सिद्धेश्वर रामचंद्र शेटकार | 86 |
| 28. | 'युगपुरुष डॉ. बाबासाहेब आंबेडकर' | सविता शिवा धनवडे | 89 |
| 29. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन व कार्य | प्रा. डॉ. फड एल.एच. | 92 |
| 30. | "डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राजकिय विचार" | प्रा. डॉ. चव्हाण सुखदेव गोविंदराव | 97 |
| 31. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि दलित साहित्य | डॉ. गोविंद धोंडीराम उफाडे | 101 |
| 32. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक समाजशास्त्रज्ञ | प्रा. डॉ. सौ. माधुरी गोविंद गिरी | 105 |
| 33. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार | प्रा. बालासाहेब शिवाजी पवार | 108 |
| 34. | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची प्रखर राष्ट्रनिष्ठा व देशप्रेम : एक आकलन | डॉ. भास्कर वि. नरवाडे | 112 |
| 35. | बहुजनांचे मुक्तीदाते डॉ.बाबासाहेब आंबेडकर | श्री. राहूल भागवत गायकवाड | 115 |
| 36. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार - एक अभ्यास | प्रा. डॉ. इकबालखान गफारखान | 119 |
| 37. | बाबासाहेबांचे शिक्षणविषयक विचार व शिक्षणविषयक संविधानात्मक तरतूदी | प्रा. विनया केशव कांबळे | 122 |
| 38. | महिलाओं के मुक्तिदाता डॉ. बाबासाहब आम्बेडकर | डॉ. बालिका रामराव कांबले | 125 |
| 39. | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शिक्षण विषयक विचार | डॉ. चंदन एम. बावलगावे | 129 |

Worldwide International Inter Disciplinary Research Journal (A Peer Reviewed Referred) ISSN – 2454 - 7905

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भारतीय समाजातील अस्पृश्यता व धर्माच्या संदर्भात समाजशास्त्रातील योगदान

**डॉ. संजय गंगाराम सुरेवाड**
सहाय्यक प्राध्यापक, विभागप्रमुख समाजशास्त्र विभाग, [illegible] कला, वाणिज्य आणि विज्ञान
महाविद्यालय, अंबाजोगाई जिल्हा - बीड 431517

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे विश्वातील एक महान ज्ञानपिपासू, तत्वचिंतक आणि संशोधक होते. [illegible] त्यांचे व्यक्तिमत्व अष्टपैलू होते. समाजशास्त्र अर्थशास्त्र, इतिहास, धर्म, तत्वज्ञान, कायदा इत्यादी विविध ज्ञानशाखांतील ज्ञान अतिशय परिश्रम करून संपादन केले होते, म्हणूनच सामाजिक, विज्ञान, कायदा या विज्ञान शाखांतील ज्ञानार्जनेकरून त्यांनी या ज्ञान शाखात मौलिक संशोधनपर ग्रंथ लेखन त्यांनी केले. परंतु दुर्दैवाने अनेक संशोधकांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराकडे दुर्लक्ष केले असल्याचे दिसून येते. डॉ. [illegible], डॉ. [illegible] इत्यादी विदेशी संशोधकांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचे महत्व पटू लागले. म्हणूनच समाजशास्त्रज्ञ, राज्यशास्त्रज्ञ, अर्थशास्त्रज्ञ, विविध घटनांत [illegible], राजकीय नेता, [illegible] केले, [illegible] कुशल संघटक आणि त्यांनी विविध अंगे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची असलेली दिसून येतात. सामाजिक विज्ञानातील विविध ज्ञानशाखा चे अध्ययन आणि संशोधन त्यांनी केल्यामुळे ते समाजशास्त्रज्ञ आहेत हे निर्विवाद आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची धारणा ही नैतिक समुदायाची ओळख देते. संशोधनाचा प्रमुख उद्देश हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय समाजशास्त्रातील योगदान अभ्यासणे त्याचा समाजशास्त्रीय [illegible] आढावा घेणे हा असून यामध्ये प्रकाशित, अप्रकाशित लिखाण, संदर्भग्रंथ, नियतकालिके, मासिके, वर्तमानपत्रे, इंटरनेट, इत्यादी दुय्यम स्थान वाचा वापर करण्यात आलेला आहे.

**भारतीय जातीव्यवस्था आणि समाजव्यवस्था:**

भारतीय समाजशास्त्राची सुरुवात होण्यापूर्वीच अमेरिकेच्या कोलंबिया विद्यापीठात 9 मे 1916 रोजी [illegible] डॉ. ए. गोल्डनवायझर मानववंशशास्त्रीय (The Anthoropology Seminat of Dr. An, GalDonwizor) विषयक परिषदेत भारतातील एका पंचवीस वर्षाचा तरुण समाजशास्त्रज्ञाने Cast In India: Their Mechanism, Genesis and Development "भारतातील जाती: यंत्रणा, उत्पत्ती आणि विकास" हा शोधनिबंध ने 1917 च्या इंडियन ॲन्टीक्युरी खंड 41 मध्ये प्रसिद्ध झाला. हे तरुण भारतीय संशोधक म्हणजेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर होत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्या संशोधनपर निबंध [illegible] "आंतरजातीय विवाहाचा निषेध किंवा अंत विवाह आढळणे हेच जातिव्यवस्थेचे मूळ आहे. [illegible] अंतर्विवाहाचे वर्चस्व हेच मुळे सत्व जातीच्या निर्मितीस कारणीभूत होते." असा निष्कर्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर मांडतात. या संशोधनात डॉ. आंबेडकरांनी वर्ग आणि जात [illegible] झाले, [illegible] अन्वय होतात. बंदिस्त केलेली, गोठवलेला वर्ग म्हणजे जात होय. तसेच 'जात हा बंदिस्त वर्ग आहे' अशी व्याख्या करतात. डॉ. आंबेडकर यांनी त्यांच्या शोधनिबंधातून जातिव्यवस्थेच्या संदर्भात त्यांनी मांडलेला 'जात उत्पत्ती सिद्धांत' आजही समाजशास्त्रज्ञ त्याचा अभ्यास व संशोधन [illegible]. जातिसंस्था मनूने निर्माण केली हे डॉ आंबेडकरांना मान्य नव्हते. आंबेडकरांच्या मतानुसार, मनूने जातीचा कायदा सांगितला नाही. [illegible] नव्हता. मनूपूर्वी कित्येक वर्षे जातिसंस्था अस्तित्वात होती. मनूने अस्तित्वात असलेल्या [illegible] बनवून, त्याला तात्विक आणि धार्मिक अधिष्ठान प्राप्त करून दिले.

**अस्पृश्य आणि अस्पृश्यतेसंबंधी सिध्दांत :**

भारतीय समाज व्यवस्थेची अस्पृश्यता ही एक [illegible] आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते, "हिंदूतील अस्पृश्यता ही एक विचित्र आणि [illegible] अपरिचित गोष्ट आहे. जातिव्यवस्थेप्रमाणेच अस्पृश्यतेच्या प्रश्नासंबंधीचे समाजशास्त्रीय विश्लेषण डॉ. बाबासाहेब

आंबेडकरांनी आपल्या अध्ययनातून केले. भारतातील जाती, जातीचे उच्चाटन, अस्पृश्य पूर्वी कोण होते, आणि ते अस्पृश्य का झाले शूद्र, अस्पृश्य पूर्वी कोण होते, हिंदू धर्माचे तत्त्वज्ञान, हिंदू धर्मातील कोडी, अस्पृश्य आणि अस्पृश्यतेवरील इतर निबंध, सामाजिक निबंध इत्यादी संशोधनात्मक ग्रंथ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेले या ग्रंथामुळे भारतातील समाजशास्त्रीय संशोधनाला मौलिक असे योगदान मिळाले आहे.

अस्पृश्यतेच्या प्रश्नासंदर्भात आपले विचार मांडण्यापूर्वी डॉ. आंबेडकरांनी आफ्रिका, अमेरिकेतील निग्रो समाज, रोमन साम्राज्यातील गुलाम समाज किंवा तत्कालीन समाज असो प्रत्येक समाजव्यवस्थेचा अत्यंत बारकाईने अभ्यास केला होता. विशेष म्हणजे अध्ययन करत असताना आपण संशोधक आहोत ही जाणीव त्यांनी ठेवली होती. म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकर अस्पृश्यतेच्या प्रश्नासंबंधित वस्तुनिष्ठ विचार मांडू शकले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक, धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक अशा सर्व बाजूंनी विचार करून या प्रश्नाविषयी सविस्तर विचार मांडलेत. त्यानंतरोवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यतेच्या प्रश्नाचे अध्ययन करून अस्पृश्यतेच्या रूपाने भारतीय समाजात एक फार मोठी अमानवीय समस्या अस्तित्वात असल्याचे प्रतिपादन केले.

भारतीय वर्गलढ्याला आणि जातीअंताच्या लढ्याला आकार आणि दिशा देण्याचे भरीव काम डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी केले जागतिक पातळीवर शोषण मुक्ती आणि समतेसाठीच्या लढ्यांमध्येही डॉ बाबासाहेब आंबेडकर प्रेरणादायी ठरले आहेत. जगाच्या इतिहासात असे योगदान करणाऱ्या अत्युच्च पातळीवरच्या निवडक व्यक्तींमध्ये डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे स्थान आहे

धर्माच्या तत्त्वज्ञानाच्या मूल्यांकनाचा सिद्धांत:

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू, बौद्ध, ख्रिश्चन, मुस्लिम, शिख, आदी सर्वच धर्मांचे अध्ययन केले होते. त्यांनी धर्माच्या संदर्भात भरपूर लिखाण केले आहे. त्यांचे धर्मविषयक विचारांचा अभ्यास करीत असताना असे आढळून येते की हिंदू धर्माची त्यांनी सविस्तर कशी चिकित्सा केली आहे 'Philosophy of Hinduism', 'Riddles in Hinduism' हे ग्रंथ त्यांच्या चिकित्सक अध्ययनाची साक्ष देतात. आपल्या या ग्रंथात हिंदू धर्माच्या तत्वज्ञानाचे चिकित्सक अध्ययन करण्यासाठी धर्माच्या तत्वज्ञानाचे मूल्यमापन करणाऱ्या कसोट्यांचे प्रतिपादन केली आहे. धर्माच्या तत्वज्ञानाचे मूल्यमापन करण्यापूर्वी त्यांनी धर्माचे तत्त्वज्ञान या शब्दाचा अर्थ सुरुवातीला स्पष्ट केला.

ओझोन हा वातावरणात उत्सर्जित न होणारा वायू असून, नायट्रोजन डाय ऑक्साईड व इतर काही हायड्रोकार्बन्समुळे तयार होतो. ओझोन हा आरोग्याला घातक आहे. ओझोनमुळे फुफुसांच्या कार्यावर विपरीत परिणाम होतो, दम लागणे, छातीत दुखणे, इत्यादी विकार उदभवतात.

४. आरोग्याची समस्या

आण्विक विदयुत केंद्रातून निर्माण झालेल्या प्रदुषणामुळे येथिल लोकांना, कामगारांना दमा, क्षयरोग, फुफुसाचा कन्सर, बहिरेपणा, इत्यादी आजाराचे प्रमाण या परिसरात वाढलेले दिसून येते. जागतिक आरोग्य संघटनेच्या एका अहवालानुसार या परिसरातील होणाऱ्या प्रदुषणामुळे अनेक आजार निर्माण झालेले आहेत. त्याच बरोबर पुढील काळात यावर जर वेळीच उपाययोजना जर केली नाही तर परळी शहरातील मानवी जीवन संकटात असेल, मानव्याच्या फायदयासाठी, विकासासाठी, कल्याणासाठी जो हा प्रकल्प तयार झालेला आहे. याचा बहुतांश फायदा ही झालेला आहे. परंतु या फायदा बरोबर या परिसरातील मानवी जीवनावर अनेक वाईट परिणाम होत आहेत. हे परिणाम मानवा साठी अतिशय घातक आहेत की ज्यामुळे मानवी जीवन संपुष्ठात येईल.

५. स्थलांतरोच प्रमाण जास्त

स्थलांतर हाही लोकसंख्येच्या गतिमानतेतील एक महत्वाचा घटक आहे. ज्या परिस्थितीत लोक राहतात त्यामध्ये काही असे घटक असतात, की ते व्यक्तीला दुसऱ्या ठिकाणी वास्तव्य करण्यास भाग पाडतात. चरितार्थाचा शोध, आर्थिक अडचणी, सामाजिक भेदभाव, दमन, नैसर्गिक आपत्ती, इत्यादी कारणांमुळे लोक स्थलांतर करतात. अगदी याच प्रमाणे परळी शहराच्या आसपासच्या ग्रामीण भागातून मोठया प्रमाणावर लोक शहरी भागाकडे चरितार्थाचा शोध घेण्यासाठी आलीत. त्यामुळे या शहरांची लोकसंख्या वाढली. ही वाढ मर्यादेबाहेर झाल्यास शहरी भागातील मानवी जीवनाच्या अत्यावश्यक गरजांवर ताण पडला.

ग्रामीण भागातील लोक मोठया प्रमाणावर शहराकडे आली. त्यामुळे ग्रामीण भागातील हातमाग, कुटिरउदयोग यांसारखे स्थानिक व्यवसाय बंद पडले.

६. गलिच्छ वस्त्यांची निर्मिती

आण्विक विदयुत केंद्रात रोजगारा साठी आलेले कामगारांना अपुरे वेतन व कामाची हमी नसल्यामुळे त्यांना वास्तव्यासाठी गलिच्छ वस्त्यांच्या आधार घावा लागतो. कारण उत्पन्न कमी असल्यामुळे त्यांना चांगल्या ठिकाणी रहाणे परवडत नाही. त्यामुळे त्या कामगार लोकांनी गलिच्छ वस्त्यांची निर्मिती केलेली आहे. या गलिच्छ वस्त्या ची संख्या व तेथिल लोकांची संख्या वाढली आहे. परळी शहराती गलिच्छ वस्त्यांत प्रचंड प्रमाणात लोकसख्या वाढलेली दिसून येते. या ठिकाणी गुन्हेगारीचे प्रमाण ही जास्त आहे. त्या बरोबरच जीवनआवश्यक गरजा पूर्ण होत नसल्यामुळे या ठिकाणी अनेक अनैतिक व्यवसाय सुध्दा चालतात ही बाब परळी शहरासांठी अतिशय घातक आहे.

8

Vol No. : 4 Issue No. : 1 Apr. 2018 ISSN No. : 2393-8323

NICRJ

# NEW INTERNATIONAL CREATIVE RESEARCH JOURNAL

UGC Approved List No. 63881



( Chief Editor )
Asst Prof A. V. Hingmire

Prathmesh Prakashan

Prathmesh Prakashan, Aurangabad

NEW INTERNATIONAL
CREATIVE RESEARCH JOURNAL

Chief Executive Editor
Asst. Prof. A.V. Hingmire

ADVISORY BOARD

- Dr. Ganesh Shetkar,
  Asst. Professor,
  Govt. B.Ed. College, Ambajogai,
  Member of Management Council,
  Dr. B.A.M.Univ. Aurangabad.
- Dr. B.S. Handibag,
  Dean, (Language Faculty)
  Dr. B.A.M.U. Aurangabad.
- Prof.Dr. D.B. Dhaigude,
  Dept. of Maths
  Dr. B.A.M.U. Aurangabad.
- Dr. Ganpat Rathod,
  Reader, (Dept. of Hindi)
  S.R.T. College, Ambajogai
- Dr. A.Y. Dalvee
  Principal,
  Vasundhara Mahavidyalaya,
  Ghatnandur, Tq. Ambajogai.
- Dr. R.N. Karpe
  Co-ordinator,
  N.S.S. Programme,
  Dr. B.A.M.U. Univ. Aurangabad.
- Prof. Dr. Shobhna Joshi,
  Dean, Faculty of Edu.
  Head of Dept.(Edu.)
  Dr. B.A.M.Univ. Aurangabad.
- Dr. V.V. Khandare,
  Dean, (Social Science)
  Dr. B.A.M.U. Aurangabad.
- Dr. D.D. Sawale
  Reader, HOD (Dept. of History)
  V.R. Shinde College, Paranda.
  Chairman, BOS (History)
  Dr. B.A.M.Univ. Aurangabad
- Dr. Ankush Kadam,
  Asst. Prof. (Dept. of Physics)
  Jawahar College, Andur
  Member of Academic Council,
  President of BAMUCTA A'bad.
- Dr. Haridas Rathod,
  Vice Principal,
  Havgiswami Mahavidyalaya,
  Udgir, HOD (Dept. of Geo.)

NEW INTERNATIONAL
CREATIVE RESEARCH JOURNAL

## CONTENTS


| Sr. No. | Title & Name of the Author(s) | Page No. |
|---|---|---|
| 1 | नायकडा : एक आदिवासी जमात<br>प्रा. डॉ. संजय सुरेवाड | 1 |
| 2 | Preliminary Floristic Diversity Survey of Mayani Bird Habitat, Maharashtra<br>S.M.Moholkar, S.U. Shinde[1], R.K.Sakhare[2], C.B. Salunkhe[3] | 3 |
| 3 | శ్రీమద్భాగవతం – వామనుడ<br>డా.శ్రీమతి([illegible]) | 10 |
| 4 | Investor Behaviour in the Mutual Fund Industry<br>Gangadevi Suresh | 14 |
| 5 | माझी शाळा, माझा उपक्रम - TAB युक्त शिक्षण<br>सरोजा साखरे | 20 |
| 6 | Problems and Prospects of Indian Democracy: An Analysis.<br>R.BALA LAXMI | 23 |

New International Creative Research Journal, Vol-IV, Issue I April 2018 ISSN - 2393-832:

ORIGINAL ARTICLE

# नायकडा : एक आदिवासी जमात

प्रा. डॉ. संजय सुरेवाड
सहायक प्राध्यापक, विभाग प्रमुख,
समाजशास्त्र विभाग,
यशवंतराव चव्हाण महाविदयालय, अंबाजोगाई, जि. बीड.

आदिवासींना इंग्रजीमध्ये 'Tribes' असे म्हणतात. आदिपासून म्हणजे सुरुवातीपासून दऱ्याखोऱ्यात किंवा जंगलात निवास करणारे म्हणजे आदिवासी होत असा सर्वसामान्य अर्थ रूढ झाला आहे. त्यामुळे जंगलात किंवा डोंगराळ भागात राहणाऱ्या लोकांना आदिवासी असे संबोधले जाते. भारतीय संविधानात आदिवासींचा अनुसूचित जमात (Scheduled Tribes) असा उल्लेख आहे. भारतीय संविधानातील कलम ३४२ नुसार, " ज्यांचा समावेश अनूसूचित जमातीच्या यादीत केला आहे. त्यांना अनूसूचित जमाती असे म्हणतात." अनूसूचित जमातींना, आदिवासी, मूलनिवासी, आदिम जाती व टोळया, वन्यजाती, गिरिजन अशी विविध नांवे आहेत. त्यापैकी आदिवासी हे नांव राष्ट्रीय परिभाषेत जास्त प्रचलित आहे. गिलीन व गिलीन यांच्या मते, "एका विशिष्ट भूप्रदेशावर राहणारा, समान बोलीभाषा बोलणारा व समान सांस्कृतिक जीवन जगणारा पण अक्षरओळख नसलेल्या स्थानिय गटांच्या समुच्चयाला आदिवासी समाज असे म्हणतात." नायकडा जमात हि सुध्दा आदिवासी जमात असल्यामुळे सर्वसामान्यपणे आदिवासी समुदायाची जी वैशिष्ट्ये सांगितली जातात. ती नायकडा जमातीसाठीही लागू पडतात.

महाराष्ट्र राज्याची स्थापना १ मे १९६० रोजी झाली असून त्याचे एकूण क्षेत्रफळ ३,०७,७१३ चौ.कि.मी. पर्यंत पसरलेले आहे. २००१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्र राज्याची एकूण लोकसंख्या ९,६८,७८,६२७ होती. त्या एकूण लोकसंख्येत आदिवासींची लोकसंख्या ८५,७७,२७६ होती. ही लोकसंख्या एकूण लोकसंख्येच्या ८.९ टक्के एवढी होती. २०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्र राज्याची एकूण लोकसंख्या ११,२३,७२,९७२ आहे. त्यात आदिवासी लोकसंख्या १,०५,१०,२१३ एवढी आहे. ही लोकसंख्या एकूण लोकसंख्येच्या ०९.३५ टक्के एवढी आहे. २००१ व २०११ च्या जनगणनेचा तुलनात्मक अभ्यास केल्यास असे लक्षांत येते की २००१ व २०११ या कालखंडात आदिवासी लोकसंख्येची वाढ ०.५६ टक्के झाली आहे. राष्ट्रपतींच्या अधिसुचनेनुसार राज्यातील आदिवासी क्षेत्र आणि आदिवासी बहुल जिल्हे निश्चित करण्यात येतात. महाराष्ट्रातील १५ जिल्ह्यात आदिवासी समुदायाची लोकसंख्या आढळून येते. The Scheduled Castes and Scheduled Tribes order (Amendment) Act, १९७६ प्रनुसार महाराष्ट्रात अनु. क्र. १ ते अनु. क्र. ४७ मध्ये एकूण १८१ अनुसूचित जमातींची नोंद आहे. आता The Scheduled Castes and Scheduled Tribes order (Amendment) Act, २००२ (No. १० of २००३ ) ०७ जानेवारी २००३ नुसार अनु. क्र. १ ते ४५ मध्ये एकूण अनुसूचित जमाती १७६ एवढया राहिल्या आहेत. महाराष्ट्रातील वरील जमाती पैकी नांदेड जिल्ह्यामध्ये प्रामुख्याने कोलाम, भिल्ल, गोंड, परधान, महादेव कोळी, आंध, नायकडा इ. जमातींचे लोक वास्तव्य करतात.

नायकडा जमात ही एक आदिवासी जमात आहे. भारतीय संस्कृती कोष खंड- ८ मध्ये नायकडा जमातीचे स्पष्टीकरण तर्कतीर्थ श्री लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी असे केले की, "त्यांना नायका किंवा नायकडा या दोन्ही

नावाने ओळखले जाते. नायताला म्हणूनही काही भागात त्यांना ओळखले जाते. त्यांच्यात पोट विभाग असून चोळीवाला नायका, कापडिया नायका, मोटा नायका आणि नाना नायका हे त्यांचे पोट विभाग आहेत"[२] "त्यापैकी 'कापडिया नायका' आणि 'मोटा नायका' यांना सामाजिकदृष्ट्या वरच्या थरातील मानले जाते."[३] "नायकडा याचाच अर्थ 'नायक' असा आहे. नायकडा जमात गेल्या शतकाच्या मध्यापर्यंत रानटी स्थितीत होती, जंगलात राहणे, व जवळच्या वस्तीवर हल्ले करणे, रक्तपात व लुटालूट करणे, मासेमारी करणे व शेती करणे इत्यादी व्यवसाय करणारी जमात म्हणून ओळखली जात होती."[४] "परंतु पुढे ब्रिटिश सरकारने सैन्य पाठवून त्यांचा बंदोबस्त केला. मग ते स्थाईक झाले. बागलानच्या राजाने पाठविलेल्या नायक या जातीच्या लोकांपैकी, त्याच्या चंपानेरच्या राजाशी लग्नानंतर सेवक म्हणून पाठविलेल्यांपैकी लोक आहेत असे मानण्यात येते"[५] "या जमातीचे पूर्वज चंपानेरच्या अमीर मुसलमानांकडे मोतध्दार म्हणून चाकरी करीत होते असे म्हणतात. बागलाणच्या राजाच्या मुलीचा विवाह चंपानेरच्या एका राजाशी झाला होता. आंदण म्हणून राजकन्येबरोबर जे सेवक पाठवण्यात आले त्यांचेच वंशज म्हणजे 'नायकडा ' असेही काहींचे म्हणणे आहे."[६] 'महाराष्ट्रातील नांदेड जिल्ह्यात नायकडा जमातीचे वास्तव्य आढळून येते.

नायकडा जमातीतील लोकांची मातृभाषा भिल्ली आहे. आणि भिल्ल, लोकांशी त्यांचे बऱ्याच बाबतीत साधर्म्य आढळते. त्यांना मराठीही बोलता येते. नायकडामधील कुटुंबसंस्था पुरूषप्रधान आहे. नायकडा लोक शेतकरी, जंगल कामगार आणि लाकूडतोडे म्हणून काम करतात. नायकडा जमातीतील पुरूष धोतर, बंडी व फेटा घालीत असत मात्र आता शर्ट व टोपी घालतात. स्त्रिया चोळी लुगडी आणि साडी वापरतात. मुली फ्रॉक व परकर नेसतात. नायकडा जमातीत मुलीचे लग्न १६ किंवा १७ वर्ष वयानंतर व मुलाचे १८ -२१ वर्ष वयानंतर होते. लग्नानंतर मुलगी मुलाघरोबर रहायला जाते. मुलगा पत्नीसह स्वतंत्र राहतो. फारच कमी कुटुंबात तो आईवडिलांसह राहतो. लग्न मुलाच्या किंवा मुलीच्या घरी लागते वर वधूपेक्षा १ ते ५ वर्षांनी मोठा असतो. मुलीला मागणी मागणी मुलाच्या वडिलांकडून येते. वधुमुल्याच्याची पध्दती असून त्याला देज म्हणतात.

नायकडा जमातीत जातिपंचायत असून विवाह घटस्फोट व जमातीतले अन्य वाद पंचायत असून विवाह, घटस्फोट अन्य वाद पंचायतसमोर आणतात. पंचायतच्यय मुखियाचे पद परंपरागत असते. मतैक्याने निर्णय होतात.

संदर्भ:


१. Constitution of India Article - २७५
२. देवगावकर एस. जी., (2009) 'महाराष्ट्रातील निवडक जाती जमाती' श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर पृ. क्र. ३२७.
३. देवगावकर एस. जी., (2009) 'महाराष्ट्रातील निवडक जाती जमाती' श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर पृ. क्र. ३२७.
४. गारे गोविंद, (2002), 'महाराष्ट्रातील आदिवासी जमाती', कॉन्टिनेन्टल प्रकाशन विजयानगर, पुणे, पृ. क्र २०१.
५. शास्त्री महादेव संपा, १९६२, भारतीय संस्कृती कोश, भारतीय संस्कृती कोश मंडळ पुणे खंड ९ पृ. क्र. ४२६.
६. देवगावकर एस. जी., (2009) 'महाराष्ट्रातील निवडक जाती जमाती' श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर पृ. क्र. ३२७.

# फुले-आंबेडकरी तत्त्वज्ञान

## ( PHILOSOPHY OF PHULE-AMBEDKAR )

**बहुजन हिताय, बहुजन सुखाय, मूल्यांचा सम्यक अनुबंध**

संपादक
डॉ. संदीप अ. बनसोडे

# फुले आंबेडकरी तत्त्वज्ञान
# (PHILOSOPHY OF PHULE : AMBEDKAR )
बहुजन हिताय, बहुजन सुखाय, मूल्यांचा सम्यक अनुबंध

संपादक - डॉ. संदीप अ. बनसोडे

**Publisher :** Dr. Sandeep A. Bansode
Deepstambha, 110-B, Dwarkapuri,
Eknathnagar, Aurangabad. 431005

© Author's : Typeset At SK Graphics Printers
MIDC, Chikalthan,
Aurangabad.431006

**Edition :** 30 April 2022

**ISBN No. :** 978-93-5635-932-1

**Cover Design :** Prathamesh D. Sable
Mob.: 8483848827

**Printed At :** SK Graphics Printers
MIDC, Chikalthan,
Aurangabad.431006
Mob.: 8483848827

**Main Distributor :** Dr. Sandeep A. Bansode
Deepstambha, 110-B, Dwarkapuri,
Eknathnagar, Aurangabad. 431005

**Price :** 200/-

(या ग्रंथातील लेखकांच्या विचारांशी तसेच झालेल्या मुद्रण दोषाबद्दल संपादक / प्रव
सहमत असेलच असे नाही.)

# : अनुक्रमाणका ::


| | | |
|---|---|---|
| | प्रस्तावना | 07 |
| | संपादकीय | 11 |
| | महात्मा ज्योतिबा फुले यांचे कृषी विषयक धोरण<br>प्रा. डॉ. युवराज गुंडू सुरवसे | 13 |
| | महात्मा फुले यांचे स्त्री विषयक विचार व कार्य<br>डॉ. गणेश तुकाराम मोकासरे | 18 |
| | डॉ. बाबासाहेब आंबेडकर व भारतीय लोकशाही<br>डॉ. एस. एस. बिरंगणे | 21 |
| | महात्मा फुले यांचे शैक्षणिक विचार<br>डॉ. संदिप शंकरराव देसाई | 24 |
| | महात्मा फुले यांच्या 'तृतीय रत्न' नाटकातील वास्तव<br>अंगद श्रीपती भुरे | 29 |
| | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे दूरदृष्टी विचार<br>डॉ. स्नेहल रा. खडांरे | 32 |
| | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भारतीय समाजशास्त्रातील योगदान<br>प्रा. डॉ. संजय गंगाराम सुरेवाड | 36 |
| | महात्मा जोतीराव फुले यांचे सामाजिक व धार्मिक कार्य<br>प्रा.किशोर लक्ष्मण साळवे | 41 |
| | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राजकीय विचार<br>निवेदिता नागनाथ सातपुते, डॉ. प्रा. ऋषिकेश कांबळे | 45 |
| 0. | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे शेतीविषयक चिंतन<br>डॉ. सावळे पल्लवी भगवान | 49 |
| 1. | महात्मा फुले यांचे शिक्षणा संबंधी विचार<br>प्रा. डॉ. सदाशिव हरिभाऊ सरकटे, उर्मिला नारायण क्षीरसागर | 54 |
| 12 | पत्रकार / संपादक डॉ. बाबासाहेब आंबेडकर<br>अनुराधा नारायणराव वनसोडे | 58 |
| 13 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि दलित साहित्य<br>सिद्धार्थ बाबुराव नवतुरे | 61 |
| 14 | महात्मा जोतिबा फुले यांचे स्त्रीमुक्ती विषयक विचार<br>पुष्पा गायकवाड | 65 |
| 15 | महात्मा फुले यांच्या 'तृतीय रत्न' या नाटकातील वास्तव<br>सुनिल सदाशिवराव कांबळे, डॉ. संदीप अ. बनसोडे | 70 |

ISBN :978-93-5635-932-1

# 7
# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भारतीय समाजशास्त्रातील योगदान

**प्रा. डॉ. संजय गंगाराम सुरेवाड,**
सहा. प्राध्यापक व विभाग प्रमुख, समाजशास्त्र विभाग,
यशवंतराव चव्हाण कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविदयालय, अंबाजोगाई, बीड.

---

डॉ. बाबासाहेब आंबेडकराचं हे विश्वातील एक महान तत्वचिंतक, लेखक आणि संशोधक होते. तसेच त्यांचे व्यक्तीमत्व अष्टपैलू होते. समाजशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास, धर्म, तत्वज्ञान, कायदा, इत्यादी विविध ज्ञानशाखांतील ज्ञान अतिषय परिश्रम करून संपादन केले होते. म्हणूनच सामाजिक विज्ञान कायदा या ज्ञानशाखांतील ज्ञानार्जनाबरोबर त्यांनी या ज्ञानशांखात मौलिक संशोधनपर ग्रंथलेखन त्यांनी केले. परंतु दुदैवाने अनेक संशोधकांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांकडे दुर्लक्ष केले असल्याचे दिसून येते. डॉ.एलिनॉर झेलिएट, डॉ. रॉबिन्सन इत्यादी विदेशी संशोधकांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचे महत्व पटू लागले. म्हणूनच समाजशास्त्रज्ञ, राज्यशास्त्रज्ञ, अर्थशास्त्रज्ञ, विधिज्ञ, घटनातज्ञ, पत्रकार, राजकीय नेता, कामगार नेते, क्रांतीकारी कुशल संघटक इत्यादी विविध अंगे त्यांच्या व्यक्तीमत्वाची असलेली दिसून येतात. सामाजिक विज्ञानातील विविध ज्ञानाशाखाचे अध्ययन आणि संशोधन त्यांनी केल्यामुळे ते एक समाजशास्त्रज्ञ होते.

डॉ. आंबेडकर यांची धारणा ही नैतिक समुदायाची ओळख देते. प्रस्तुत संशोधनाचा प्रमुख उद्देश हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भारतीय सामाजशास्त्रातील योगदान अभ्यासून त्यांच्या समाजशास्त्रीय सिध्दांतांचा आढावा घेणे हा असून यामध्ये प्रकाशित, अप्रकाशित लिखान, संदर्भग्रंथ, नियताकालिके, साप्ताहिके, वर्तमानपत्रे, इंटरनेट इत्यादो स्त्रोतांचा वापर करण्यात आलेला आहे.

**भारतातील जाती व्यवस्था आणि समाजव्यवस्था:**

भारतात समाजशात्राची सुरूवात होण्यापूर्वीच अमेरिकेच्या कोलंबिया विद्यापीठात 9 मे 1916 ला भरलेल्या डॉ.ए.ए. गोल्डनवायझर मानववंशशास्त्रीय परिषदेत 'भारतातील जाती: घडण, उत्पत्ती आणि विकास' हा शोधनिबंध मे 1917 च्या इंडियन अॅन्टीक्केरी खंड 41 मध्ये प्रसिद्ध झाला हा तरूण भारतीय संशोधक म्हणजेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर होय. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्या संशोधनपर निबंधमध्ये स्पष्ट्रपणे नमूद करतात, 'आंतरजातीय विवाहाचा निषेध किंवा असे विवाह न आढळणे हेच जातीव्यवस्थेचे मूळ आहे. बहिर्विवाहावर अंतर्विवाहाचे वर्चस्व हेच खरे तत्व जातीच्या निर्मितीस कारणीभूत होते. असा निष्कर्ष डॉ.बाबासाहेब आंबेडकर मांडतात. याच संशोधनात डॉ. आंबेडकरांनी 'जात हा बंदिस्त वर्ग आहे.' अशी व्याख्या करतात. डॉ. आंबेडकरांनी त्यांच्या शोधनिंबधातून जातिव्यवस्थे संदर्भात त्यांनी मांडलेला 'जात उत्पतीचा' सिध्दात आजही समाजशास्त्रज्ञ त्यांचा अभ्यास व संशोधन करण्याचा प्रयत्न करतात.

**अस्पृश्य आणि अस्पृश्यतेसंबंधी सिध्दांत:**

भारतीय समाजव्यवस्थेची अस्पृश्यता ही एक अमानवीय समस्या आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या मते, 'हिंदूतील अस्पृश्यता ही एक विचित्र आणि जगाच्या पाठीवर इतर कोणत्याही भागातील मानवतेला अपरिचित गोष्ट आहे. जातीव्यवस्थेप्रमाणेच अस्पृश्यतेचा प्रश्ना संबंधिचे समाजशास्त्रीय विश्लेषण डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या अध्ययनातून केले. भारतातील जाती, जातीचे उच्चाटन, अस्पृश्य पुर्वी कोण होते आणि ते का अस्पृश्य झाले, शुद्र पूर्वी कोण होते, हिंदु धर्माचे तत्वज्ञान, हिंदू धर्मातील कोडे, अस्पृश्य आणि अस्पृश्यतेवरील इतर निर्बंध सामाजिक इत्यादी संशोधनात्मक ग्रंथ डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिले. या ग्रंथामुळे भारतातील समाजशास्त्रीय संशोधनाला मौलिक असे योगदान मिळाले आहे.

अस्पृश्यतेच्या प्रश्न संदर्भात आपले विचार मांडण्यापूर्वी डॉ.आंबेडकरांनी आफ्रिका अमेरिकेतील निग्रो समाज,रोमन साम्राज्यातील गुलाम समाज किंवा ज्या समाज असो, प्रत्येक समाजव्यवस्थेचा अंत्यत बारकाईन अभ्यास केला होता. विषेश म्हणजे अध्ययन करीत असतांना आपण संशोधक आहोत, ही जाणीव त्यांनी ठेवली होती. म्हणूनच डॉ.बासाहेब आंबेडकर अस्पृश्यतेच्या प्रश्ना संबंधी वस्तुनिष्ठ विचार मांडू शकले. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यतेविशयी सामाजिक, धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक अशा सर्व बाजूंनी विचारक करून या प्रश्नाविषयी सविस्तर विचार मांडलेत. त्याचबरोबर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यतेच्या प्रश्नाचे अध्ययन करून अस्पृश्यतेच्या रूपाने भारतीय समाजात एक फार मोठी अमानवीय समस्या अस्तित्वात असल्याचे प्रतिपादन केले.

**धर्माच्या तत्वज्ञानाच्या मूल्यांकनाचा सिध्दांत:**

त्यांनी भारतीय समाजातील शोषितांच्या इतिहास दृष्टीकोनासाठी एक व्यवस्थित प्रयत्न केला. त्यांनी वैश्विक दृष्टीकोनातून संस्कृती व धर्मासारखे घटक प्रभावीपणे इतर घटकांना प्रभावित करणारे आहेत असे म्हटले आहे. आंबेडकर हे माक्र्सवादाप्रति उदार होते मात्र आर्थिक संकीर्ण दृश्टीकोनाच्या विरोधी होते. त्यांनी जाती मुद्याबाबतच्या आकलनासाठी माक्र्सवादाला आव्हान दिले आहे. डॉ.बावासाहेब आंबेडकर यांच्या पध्दतीत हिंदुत्व धार्मिक राश्ट्रवादाचा पुरस्कार केला.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी कोलंबिया विद्यापीठातून उच्च शिक्षण घेताना समानतेच्या वर्तनाचा अनुभव घेतला. ते आपल्या अमेरिकी प्रवासादरम्यान तेथिल वंशभेद धोरण विरोधी 14 व्या दुरूस्तीने अधिक प्रभावित झाले. त्यातून त्यांना दलितांच्या उध्दारांसाठी संघर्ष करण्यास प्रेरणा मिळाली. त्यांना अमेरिका व इग्लंड मधुन पाश्च्यात शिक्षण मिळाले. ते उदारमतवादी होते, मानवी जीवन निरर्थक नसून ते अर्थपूर्ण आहे. प्रत्येक समाजात व्यावहारिक नैतिकता व सामाजिक धर्म असावयास पाहिजे. कोणताही धर्म असा असावयास पाहिजे.

1. जो धर्म नैतिकतच्या रूपात मानव समाजाचा आधार असला पाहिजे.
2. धर्म विज्ञान वा बोध्दिक तत्वावर आधारित असला पाहिजे.
3. धर्माला केवळ नैतिक संहिताच नसून स्वतंत्रता, समानता व बधुता असावी.
4. धर्माने निर्धनता स्थितीचे पवित्रीकरण करू नये.

धर्माचे शुध्द रूप धर्मनिरपेक्ष व मानवतावादी आहे. बुध्द धम्म सच्चा धर्म आहे. या दृष्टीने हिंदु धर्माचे स्वरूप न्यायावर आधारित नाही. ज्याच्यात अमुलाग्र परितर्वन केले.

समाजिक क्रांती आणि परिवर्तनाचा सिध्दांत:

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक विचारांचे अध्ययन करीत असताना एक गोष्ट

ISBN :978-93-5635-932-1

प्रकर्षाने लक्षात येते ती म्हणजे त्यांचे विचार समाजाच्या पुनर्रचनेच्या संदर्भात मांडलेले आहेत. त्यांना एका नवीन समाजव्यवस्थेची निर्मिती करायची होती. जाती, अस्पृश्यता, कालबाहय धार्मिक कल्पना आदींचे त्यांनी आपल्या विचारांमधून खंडण करण्यापर्यंतच त्यांचे विचार मर्यादित नाहीत. डॉ.आंबेडकरांचे सामाजिक विचार हे समाजाच्या पुनर्बांधणीच्या संदर्भात मांडलेले विचार आहेत. इतकेच नव्हे तर, सामाजिक क्रांती आणि परितवर्तनाची दिशा देखील त्यांच्या विचारांमधून स्पष्ट होते. सामाजिक परिवर्तनाच्या दृष्टीने त्यांनी मांडलेले विचार हे मूलगामी स्वरूपाचे आहेत.

'सामाजिक परिवर्तन' हा समाजशास्त्राच्या आरंभापासून एक चिंतनाचा विषय आहे. आगस्त कॉम्टने समाजपरिवर्तन दर्शविणारा तीन अवस्थांचा सिध्दांत मांडला. सामाजिक क्रांती आणि सामाजिक परिवर्तनाच्या संदर्भात समाजशास्त्रज्ञांनी दिलेल्या व्याख्यांचा परामर्श घेतल्यानंतर हे स्पष्ट होते की, सामाजिक क्रांती आणि परिवर्तनाच्या व्याख्यामध्ये विशेष फरक नाही. समाजाच्या व्यवस्थेत किंवा संरचनेत मौलिक किंवा आमूलाग्र परिवर्तन होणे म्हणजेच सामाजिक क्रांती किंवा परितर्वन होय. समाजशास्त्रज्ञांना सामाजिक परिवर्तनास जो अर्थ अभिप्रेत आहे, तोच अर्थ डॉ.बाबासाहेब आंबेडकरांन देखील अभिप्रत आहे.

**आदर्श समाज आणि सामाजिक मानवतावादाचा सिध्दांत:**

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी विशमतेवर आधारित भारतीय समाजव्यवस्थेला तीव्र विरोध केला. वर्ण आणि जातींवर आधारीत समाजव्यवस्था त्यांना नको होती. कारणया जातिव्यवस्थेत श्रेणीगत विशमता आहे. सर्व जातींचा दर्जा बरोबरीचा किंवा समानतेचा नाही. त्यामध्ये श्रेष्ठ - कनिष्ठ भेद आहे. त्यामुळे सर्व लोक समान नाहीत. त्यांचा दर्जा, हक्क आणि प्रतिष्ठा विषम मानण्यात आला होता. म्हणून जातिव्यवस्थेत केवळ विशमता नाही तर विषमता श्रेणीगत आहे. काही जातींचे लोक उच्च तर काही जातींचे लोक कनिष्ट आहे. ब्राम्हण जातीचा अपवाद वगळल्यास सर्वच जाती कनिष्ट आहेत. या जातींमध्ये देखील श्रेष्ठ - कनिष्ठ असा भेद आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्पष्टपणे प्रतिपादन करतात की, जात म्हणजे विविध सामाजिक, अर्थिक, राजकीय व नागरी सत्ता आणि अधिकारांचे स्थायी विषम वितरण आहे. उच्च जातींना विविध सामाजिक, आर्थिक, राजकीय व नागरी सत्ता आणि अधिकार देण्यात आलेत. म्हणून त्यांचा दर्जा श्रेष्ठ, तर शुद्र आणि अतिशुद्रांचा दर्जा कनिष्ट आहे. जातिव्यवस्थेत सर्व लोकांना समान मानण्यात आले नाही.

डॉ.आंबेडकरांनी (The Anthropology Seminat of Dr. AA, GalDenwizer) या ग्रंथात आदर्श समाजाची सविस्तर व्याख्या पुढीलप्रमाणे दिली आहे." माझा आदर्श समाज समता, स्वातत्र आणि बंधुता यावर आधारलेला असेल. आदर्श समाज हा गतिमान असावा, ज्यामध्ये समाजाच्या एका भागात होणाऱ्या परिवर्तनाची समचना दुसऱ्या भागात संचारित होवू शकेल. आदर्श समाजात विविध हितसंबंध जाणीवपूर्वक एकमेकापर्यंत पोहोचवून त्यात भागीदार होता आले पाहिजे. त्यात इतर संस्थाशी संपर्कासाठी विविध आणि मुक्त स्थळे असली पाहिजेत. यालाच बंधुता म्हणतात जे लोकशाहीचे दुसरे नाव आहे. लोकशाही हा शासनाचा केवळ एक प्रकार नाही. तर मूलत:परस्परांचे अनुभव परस्परांना संघबध्द राहण्याची सहजीवनाची ती एक पध्दती आहे. अनिवार्यपणे आपल्या सोबत्यांचा आदर व सन्मानाची वत्ती निर्माण करणारी प्रवत्ती आहे. "अशा प्रकारे डॉ.आंबेडकरांनी आदर्श समाजाचा सिध्दांत स्पष्ट केला आहे.

डॉ.आंबेडकरांचे हे सूत्र म्हणजेच स्वातंत्र, समता, बंधुता आणि न्याय ही मानवतावादी तत्वे होत. याच मानवतावादी तत्वांवर त्यांचे सामाजिक विचार आधारलेले आहेत. केवळ सामाजिकच नव्हे तर आर्थिक आणि राजकीय विचारांची मांडणी देखील त्यांनी याच तत्वांवर केली आहे. त्यांनी

ISBN :978-93-5635-932-1

आपल्या सामाजिक विचारांमधून सामाजिक मानवतावाद विकसित केला आहे. या सामाजिक मानवतावादावर त्यांचा आदर्श समाजाचा सिध्दांत आधारित आहे.

वर्ण व्यवस्था:

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी हिंदू धर्मशास्त्राचे सखोल अध्ययन केले आहे. त्यांनी वेदादि शास्त्रांचे विस्तृत अध्ययन केले, त्यांच्या मते, मूलभूत सिध्दांत स्वरूपात स्तरीत असमानतेचा सिध्दांत विवादास्पद आहे. चार वर्ग हे केवळ भिन्न नाही तर त्यांच दर्जासुध्दा असमान आहे. एक वर्ग दुसऱ्यावर उभा असतो हा सिध्दांत जिवनाच्या अनेक क्षेत्राला प्रभावित करतो. हिंदू समाज व्यवस्थेत लोकांचे समूहभोजन आणि आपपसात विवाह करणे प्रतिबंधित आहे. हिंदू समाज व्यवस्था मुख्य स्वरूपात व्यक्तीवर आधारीत नसून वर्ग व वर्णावर आधारित आहे. यात व्यक्तिगत संधी आणि व्यक्तिगत न्यायासाठी कोणतेही स्थान नाही. आपल्या अध्ययनातून असे म्हटलेकी, दलितांच्या दृष्टीने हिंदूच्या सामाजिक समस्यांचे मूळ हे त्यांच्या धर्मग्रंथ मध्ये आहे. भेदाचे मुळ त्यांच्या धर्मग्रंथाना मानले आहे. शुद्र वर्णाच्या व अस्पृश्य वर्गाच्या लोकांना दिल्या गेलेल्या हीन दर्जामागील कारणमीमांसा शोधण्यासाठी डॉ.बाबा◌ासाहेब आंबेडकरांनी गहन संशोधन केले, शुद्र पूर्वी कोण होते? अस्पृश्य ते कोण होते आणि ते अस्पृश्य का बनले? असे दोन वेगवेगळे ग्रंथ लिहिले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी वेदांमधून आर्याचा रंग दासांपेक्षा भिन्न होता हे प्रमाणित होत नाही. पूर्वी वर्णाची निश्चिती व्यवसाय, स्वभाव व संस्कृती इत्यादी आधारावर होत होती असे म्हटले आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी वर्णाच्या रंगाच्या तर्काला नाकारले आणि जातिव्यवस्थेचा आधार रोटी-बेटी इ. संबंध, अंतगोत्रिय व बर्हिगोत्रिय विवाह ही कारणे मानली हेच जातिप्रथेने मूळ आहे असे म्हटले आहे असे मानले डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते,शूद्र हे असे आहेत ज्यांची मुख्य शाखा क्षित्रय जातीतून विकसीत झाली. तसेच प्रारंभी ब्राम्हण वर्गाने आपली रक्त शुध्दता टिकविण्यासाठी किंवा सामाजिक नैतिक मर्यादेसाठी आपल्यामध्ये जातिप्रथा चालविली. ब्राम्हण वर्गाने सजातीय व विगोत्रीय विवाहाचे प्रचलन केले आणि कालांतराने ब्राम्हण श्रेष्ठतेचा स्वीकार केल्यामुळे इतर वर्गामध्ये सुध्दा नक्कल व अनुकरणातून जातिप्रथेचे प्रचलन झाले. डॉ.बाबासाहेबा आंबेडकर यांच्या मते, भारतामध्ये जातिव्यवस्था ही उच्च वर्गाने निम्न वर्गांनी केलेल्या अनुकरणाचा परिणाम आहे.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक भारतीय समाजशास्त्रज्ञ:**

भारतात कलकत्ता विद्यापीठ 1917 मध्ये एक विषय म्हणून आणि नंतर 1919 मध्ये मुंबई विद्यापीठ स्वंतत्र विषय म्हणून समाजशात्राच्या अध्ययनाला सुरूवात झाली. परंतु डॉ.बाबासाहेब आंबेडकर 1919 पूर्वीच आपल्या समाजशास्त्रीय अध्ययनाने भारतीय समाजशास्त्रज्ञ म्हणून जगासमोर आले होते हे विषश होय. 1990 च्या दशकामध्ये वचित समूहांचा सर्वात प्रमुख समाजशास्त्रीय सिध्दांतकार म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना मान्यता मिळाली. 1990 च्या दशकात आंबेडकर यांचे दलितासंबंधी संघर्षचे अध्ययन भारतीय शैक्षणिक अध्ययपनात आले. त्यामध्ये सामान्य लोकांचा संघर्ष हा ज्ञान आणि सत्ता केंद्रित असून राष्ट्राच्या सामाजिक पुनर्निमितीमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आणि महत्व लक्षात घेतले गेले.

प्रस्तुत शोधनिबंधामधून असे स्पष्ट होते की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतामध्ये समाजशास्त्र विषयाची सुरूवात होण्यापूर्वीच भारतीय समाजशास्त्राशी संबंधित भारतातील जातीव्यवस्थेविशयी, वर्ण व्यवस्थेविषयी, अस्पृश्यतेविषयी आणि धर्मासंबंधी आपले विचार मांडलेले आहेत आणि या सर्वांवर उपाय म्हणून त्यांनी भारतीय संविधानामध्ये सर्व जाती धर्म पंथ याच्यामध्ये

ISBN :978-93-5635-932-1

कोणताही भेदभाव राहणार नाही अशी समानेची वागणूक देउन आंतरजातीय व आंतरधर्मिय विवाहाला प्रोत्साहन देवून आपल्या देशातील जातीव्यवस्था आणि अस्पृश्यता नष्ट करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**सदर्भग्रंथ सूची:**

1. आगलावे प्रदीप, 2009 , समाजशास्त्रज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सुगावा प्रकाषन,पुणे.

2. डॉ. राजेंद्र फकिरा बगाटे, 2020, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भारतीय समाजशास्त्रातील योगदान, मराठी समाजशास्त्र परिषद ,

3. धनंजय कीर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पॉपुलर प्रकाशन, मुंबई .

4. 'भारताचे संविधान', (मराठी) महाराष्ट्र राज्याच्या भाषा संचालनालयाव्दारे अनुवादित, महाराष्ट्र शासन (1988)

RNI No. MAHMUL/2013/54090

ISSN-2349-3984
Impact Factor - 5.686

आज़ादी का अमृत महोत्सव

# MANAVLOK RESEARCH BULLETIN

(A Quarterly Peer Reviewed Journal)
Special Issue - 1



Lokraja Chhatrapati Rajarshi Shahu Maharaj
Commemorative Centenary Year
and the
Birth Anniversary of
Dr. Dwarkadasji Lohiya (Babuji)



## Contribution of Chhatrapati Rajarshi Shahu Maharaj in Social Development

Editors

**Dr. Prakash Jadhav**
Principal,
Manavlok's College of Social Work, Ambajogai

**Dr. Hanumant Salunke**
Assistant Professor

**Sukeshini Jogdand**
Assistant Professor

**MANAVLOK'S COLLEGE OF SOCIAL WORK**

Post Box No. 23
Ring Road, Ambajogai, Dist.Beed, (MS) Pin-431 517
E-mail:- manavlok1999@gmail.com
Websit :- www.manavlokcollegeofsocialwork.co.in

| | | |
|---|---|---|
| 26 | राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे शैक्षणिक कार्य<br>प्रा. डॉ. राजाभाऊ वेंकटराव भगत | 135 |
| 27 | राजर्षी शाहु महाराज यांची सामाजिक न्याय संकल्पना<br>डॉ. सुरेवाड संजय गंगाराम | 138 |
| 28 | राजर्षी शाहू महाराज सामाजिक क्रांतीकारक<br>प्रा डॉ विजय म धुवळे | 142 |
| 29 | राजर्षी शाहु महाराज यांचे शैक्षणिक विकासातील योगदान<br>गादेकर पी. सी. | 145 |
| 30 | राजर्षी शाहु महाराजांचे कार्य<br>श्री. हेमराज शा. डोवळे | 148 |
| 31 | राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षिणक कार्य<br>प्रा.डॉ.नीना वोडे- सुर्यवंशी | 150 |
| 32 | छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांचे समाज विकासातील योगदान<br>डॉ. शिंदे प्रकाश तुकाराम | 154 |
| 33 | प्रजाहित दक्ष लोकराजा " छत्रपती शाहू महाराज "<br>डॉ. सुधीर व. गायकवाड | 162 |
| 34 | छत्रपती शाहू महाराजांच्या विविध कार्याचा आढावा<br>श्री प्रकाश सुभाषराव राठोड | 166 |
| 35 | राजर्षी शाहू महाराज यांचे शैक्षणिक विकासातील योगदान<br>दीपा रामलिंग नारायणकर | 173 |
| 36 | राजर्षी शाहू महाराज यांचे शैक्षणिक विकासातील योगदान.<br>नितीन कैलास वाकळे, डॉ. रमा पांडे | 176 |
| 37 | राजश्री शाहू महाराज यांचे शैक्षणिक विकासातील योगदान<br>प्रतिभा शशिकला विश्वनाथ भद्रे | 182 |
| 38 | राजर्षी शाहू महाराज यांचे महिला सक्षमीकरणातील योगदान<br>प्रदिप भास्करराव जिरे | 188 |

# राजर्षी शाहु महाराज यांची सामाजिक न्याय संकल्पना

डॉ. सुरेवाड संजय गंगाराम
सहा. प्राध्यापक व विभाग प्रमुख, समाजशास्त्र विभाग,
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई जि.बीड
sanjaysurewad@gmail.com

आधुनिक महाराष्ट्रातील सामाजिक परिवर्तनाला ज्यांचे कर्तृत्व प्रामुख्याने कारणीभूत झाले, अशा थोर पुरूषांच्या मालिकेत राजर्षी शाहू छत्रपती याची गणना होते. २० व्या शतकाच्या सुरूवातीस बहुजन समाजातून नव्याने उदयास आलेल्या सुशिक्षित वर्गाच्या आशाआकांक्षा त्यांच्या कार्यातून व विचारातून प्रकट झालेल्या आहेत. आता ग्रामीण भागातूनही द्रुतगतीने शिक्षणाचा प्रसार होत आहे. सहकारी चळवळीचे क्षेत्र दिवसेंदिवस विस्तारत आहे. वेगवेगळया थरातील सर्वसामान्य नागरिकही आपल्या आर्थिक व राजकीय हितसंबंधावद्दल जागरूक होत आहे. महाराष्ट्रा मध्ये हे जे स्थित्यंतर घडून आले, त्याचे श्रेय शाहू महाराजांनी सुरू केलेल्या धार्मिक, सामाजिक, व राजकीय चळवळीला द्यावे लागेल.

शाहू महाराजांनी आपल्या कारकीर्दीमध्ये अनेक महत्वाची परिवर्तन घडवून आणले. पिढीजात शापीत बनलेल्या बहुजन समाजाला त्यांनी त्यांचे हक्क परत मिळवून दिले. यासाठी त्यांनी कर्मठ सनातनी वर्गाचा रोष पत्करला होता. महारांनी आनलेल्या माठातले पाणी ते प्यायचे तेव्हा त्यांच्या काही जवळच्या नातेवाईकांनाही ते खपत नव्हते. आपल्या प्रशासनामध्ये अमुलाग्र बदल घडवून त्यांनी बहुजन समाजाला न्याय मिळवून दिला. शाहू महाराजांनी नवीन कायदे निर्माण करून दलितांना संरक्षण दिले. आपल्या हाती असलेल्या अधिकारांचा उपयोग आपण आपल्या समाजाच्या हितासाठी केला पाहिजे हे त्यांनी इतरांना दाखवून दिले. त्यांचे आदर्श आजही समाजाला नवी दिशा, नवा मार्ग, नवे वळण देत आहेत. त्यांचे निर्णय दिर्घकालीन परिणाम करणारे ठरले. म्हणून शाहू महाराजांच्या दुरदृष्टीला इतिहासात तोड नाही. त्यांच्या परिश्रमाने आज बहुजन समाज स्वाभीमानाने जीवन जगतो आहे. म्हणून शाहू महाराज बहुजनांचे राजे होते.

राजर्षी शाहूंची विचारधारा सर्व घटकांसाठी होती. सर्व वर्गांना सामावून घेणारी होती. त्यांच्या विचाराला सामाजिक न्यायाची झालर होती. त्यांचे विचार सर्व दृष्टीने व्यापक होते. जीवनाभिमुख असे होते. सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक या सर्व अंगांना स्पर्श करणारे मूलभूत स्वरूपाचे आणि त्यामध्ये परिणामकारक बदल घडवून आणणारे होते. भारतातील मोठया मोठया संस्थानिकांनी महालात, दिवाणखान्यात चैनीत दिवस काढले. त्यांना समाजाच्या वैचारिक बैठकीत बदल घडविता आला नाही. पण राजर्षी शाहूंनी कोल्हापूरसारख्या छोटया संस्थानात हे बदल करून दाखविले. त्याच बरोबर ब्रिटीश राजवटीत स्वातंत्र्यपूर्व काळात १९०२ साली प्रशासकीय सेवेत शेकडो ५० टक्के जागा मागारावर्गीयासाठी राखील केल्या आणि ३१ ऑगस्ट १९१८ साली संस्थानातील अनेक परंपरागत वतने रद्द केली.

मानवतावादी दृष्टीकोनातून सनातनी हिंदू धर्म आणि धर्मांच्या पाठिंब्यावर उभी असणारी जातिसंस्था मोडून काढणाऱ्या राजा म्हणून ओळखला जाणाऱ्या एकमेव राजा म्हणजेच छत्रपती शाहू महाराज. २६ जून १८७४ रोजी कोल्हापूर नगरीत जन्मास आलेल्या शाहू छत्रपतींनी २ एप्रिल १८९४ पासून ६ मे १९२२ पर्यंत

एकूण २८ वर्षे राज्यकारभार केला. या काळात या राजाने हिंदू समाजातील उन्मत्त सनातनी धर्ममार्तंडाच्या विरोधात आपल्या आयुष्यातील पहिले बंड केले. हिंदू समाजाला जातिशृंखलांनी सर्वांगांनी जखडून टाकून माणसांचे माणूसपण हिरावून घेणारी धर्म सिद्धांतने त्याने उलथीपालथी करून टाकली. अस्पृश्यतेचा समूळ नायनाट करण्यासाठी अस्पृश्यतेवर प्राणघाती असा चौफेर हल्ला चढविला. त्यासाठी त्याने सवर्णांच्यापासून वेगळ्या असणाऱ्या शाळा बंद करून तो थांबला नाही, तर त्याने ते सर्वांना सक्तीचे केले. महारवतनाची वेठबिगारीची दुष्टपध्दत कायद्याने बंद केली. माणूस जन्मतः गुन्हेगार नसतो. त्याला सुधारण्याची संधी दिली, तर त्या संधीचे सोने करण्याची किमया त्याच्या अंगी असते. यावर अपार विश्वास ठेवून त्याने महार-मांग समाजाची हजेरीची निर्दय पध्दत संपुष्टात आणली. बहुजनांचा सर्वंकष छळ आणि पिळवणूक करणाऱ्या कुलकर्णी वतनाची पध्दत कायद्याने बंद करून टाकली. फासेपारधीसारख्या भटक्या आणि गुन्हेगार म्हणून बदनाम झालेल्या जमातीतील लोकांना त्याने आपल्या पोटाशी धरून त्यांच्यात आपणही माणसे आहोत हा दुर्दम्य आत्मविश्वास निर्माण केला.

केवळ जन्माने श्रेष्ठ मानल्या गेलेल्या समाजातील विशिष्ट लोकांना जे सुखसमृध्दीचे जीवन उपभोगता येते, तेच जीवन मोठ्या प्रतिष्ठेने बहुजनांच्या वाटयाला यावे म्हणून आपल्या संस्थानात ५० टक्के जागा राखीव ठेवून, त्याप्रमाणे प्रत्यक्ष कार्यवाही करणारा हिंदुस्थानातील ७०० संस्थानिकांपैकी हा पहिला संस्थानिक होता, जातिसंस्था समूळ नष्ट करण्यासाठी सहभोजने घडवून आणणे, तथाकथित अस्पृश्यांना मंदिरप्रवेश देणे असल्या तकलुपी उपायांवर या राजाचा कधी विश्वास नव्हता. जातिसंस्था समूळ नष्ट करण्यासाठी आंतरजातीय आणि आंतरधर्मीय विवाह घडवून आणणे हाच त्यावर रामबाण उपाय आहे हे लक्षात घेउन या राजाने सुमारे शंभर वर्षांपूर्वी आपल्या संस्थानामध्ये आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाहांना मान्यता देणारा कायदा केला, इतकेच नव्हे तर स्वतःच्या राजघराण्यात आंतरजातीय विवाह त्याने घडवून आणला.

दुर्बल जाती आर्थिक, सामाजिक, धार्मिक आणि राजकीयदृष्ट्या जोपर्यंत सबल होणार नाहीत तोपर्यंत जातिसंस्था नष्ट होणार नाहीत हे सूत्र लक्षात घेउन त्याने जातवार वसतिगृहांची चळवळ हाती घेतली. इतकेच नव्हे तर आपल्या जातीचे नेतृत्व दुसऱ्या जातीच्या पुढाऱ्यांच्या हाती जाणार नाही याची दक्षता प्रत्येक जातीने घ्यावी असा प्रगल्भ विचार मांडून, आपला विचार प्रत्यक्ष कार्यवाहीत व्हावा म्हणून त्यांनी माणगांव येथील दलितांच्या परिषदेस हजर राहून दलितांचे नेते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा मनभरून गौरव केला होता. म्हणूनच बहिष्कृत भारत च्या ४ एप्रिल १९२७ अंकात शाहू छत्रपतींना आम्ही देवाप्रमाणे पूज्य मानीत असल्याची ग्वाही देण्यात आली आहे.

छत्रपती शाहू महाराजांनी केलेले अस्पृश्योध्दारांचे कार्य म्हणजे मानवजातीच्या मुक्तेचे कार्य होय. मनुष्यबळ विकासातील अज्ञानाबरोबर जातीभेद हा दुसरा मोठा अडसर आहे. हे महाराजांनी ओळखले. जातीप्रथा मोडून काढण्यासाठी त्यांनी फार मोठे कार्य केले आहे. शाळा, तलाव, रूग्णालये, कचेऱ्या, राजवाडा, राजाची पगंत ही सर्व हरिजनांना नि गिरीजनांना खुली केली. ज्यांची हजेरी व अवहेलना बंद करून त्यांचे माणूसकचा हक्क त्यांना परत दिले. त्यांना सम्मानाने जगता यावे म्हणून नोकऱ्या दिल्या. धंदे व्यवसाय काढण्यास उत्तेजन दिले. अस्पृश्यांना उपहारगृह काढून दिले. त्या उपहारगृहात महाराज स्वतः चहा घेउ लागले. राजकन्येच्या विवाहप्रसंगी इतर नागरिकांबरोबर हरिजनांनाही पाहुण्यांच्या आदरसत्कारांची कामे देउन त्यांनी त्या समारंभात त्यांना मिरविले, त्यांना माहुताचे ने-आण करण्याचे काम दिले. दत्तोबा पवारांसारखे

अनेक दलित कार्यकर्ते महाराजांनी निर्माण केले. हरिजनांच्या अनेक परिषदा भरल्या, त्या परिषदांचे छत्रपती स्वतः अध्यक्ष झाले. त्या पदावरून अस्पृश्यता निर्मुलनाचे कार्य त्यांनी प्रत्यक्ष कृतित आणले.

१९१८ साली बलुते पध्दत कोल्हापूर संस्थानात बंद केली. महारांच्या जमिनी त्यांच्या नावावर रयत वादीने करून दिल्या. महारांची गुलामगिरीतून मुक्तता केली. महारांसारी अस्पृश्यांना दिलेल्या मानवी हक्कांच्या विरूध्द जे दंगे धोके करतील त्यांना कडक शासन होईल असे फर्मान काढले. अस्पृश्यता चालविण्यासाठी राजर्षी शाहू महाराजांनी क्रांतीकारी पाउल उचलले. दलितांना सामाजिक न्याय आणि अधिकार देण्यासाठी त्यांनी कायदे पास केले. आपल्या संस्थानातील वेठबिगारी त्यांनी बंद केली. मूर्तिभंजकाच्या आवेशाने आणि त्वेषाने जातिसंस्थेवर आणि जातीभेदावर त्यांनी आघात केले.

राष्ट्राच्या राजकारणात व राज्यकारभारात सामाजिक शक्ती समबल असाव्यात असे त्यांचे धोरण होते. म्हणूनच त्यांनी मागासलेल्या जातीसाठी राज्यातील ५० टक्के नोकऱ्या राखून ठेवण्याचा क्रांतिकारक ठराव केला. त्यामुळे ब्राम्हणांच्या ताब्यात असलेली राज्यकारभारातील सत्ता केन्द्रे निसटू लागली. त्यांची पत, प्रतिष्ठा आणि सत्ता याना वेध लागला. त्यामुळे जनतेपर्यंत सुधारणेचे हुकूम चांगल्या तऱ्हेने पोहोचावे, जनतेला फायदे मिळावे, साहय व्हावे हे त्यांचे हेतू साध्य होउ लागले.

१९१७ मध्ये विधंवाकरिता पुनर्विवाहाचा कायदा व १९१८ मध्ये आंतर जातीय विवाह कायदा कोल्हापूर संस्थानात महाराजांनी मंजूर केला महाराजांनी अनेक विवाह घडवून आणले. त्यामुळे जातीभेदाची तीव्रता कमी झाली. समाजात अभिसरन सुरू झाले. स्त्रियांच्या व्यक्तिमत्व विकासात चालना मिळाली. स्वतःच्या वालविधवा सुनेला तर त्यांनी गृहकलहाचा व मानहानीला तोंड देत शिकविले. इंदुमती राणीसाहेबांचे सर्व प्रकारचे शिक्षण हा छत्रपतींचा क्रांतिकारी निर्णय होता. तो त्यांनी तितक्याच धडाडीने अंमलात आणला. १९२० साली त्यांनी घटस्फोटाचा कायदा करून स्त्रीस्वातंत्र्याचे महत्व पटवून दिले. हे कायदे म्हणजे शाहू महारजांनी पास केलेले मूलगामी असे हिंदूकोड बिल होय. १९११ मध्ये श्री परशराम घोसरवाडकर इनामदार यांच्या अध्यक्षतेखाली सत्यशोधक समाजाची स्थापना केली. पुरोहिताला काढून नवे पुरोहित तयार केले. ब्राम्हणविरूध्द या सर्वांनी जोरदार आवाज उठविला, प्रत्यक्ष कृतीची जोड दिली. स्त्रियांच्या व अस्पृश्यांच्या शिक्षणासाठी त्यांनी शाळा काढल्या

१९१८ साली रावबहादूर सीताराम केशवबोले यांनी मुंबईत लोकसंघ पीपल्स युनियन नावाची संस्था स्थापना केली. त्या संघटनेचा उदेश होता, विद्येत मागासलेल्या बहुजन समाजाची राजकीय, धार्मिक, नैतिक, औद्योगिक, आरोग्य विषयक, शिक्षण विषयक, शेतकी विषयक वगैरे सर्व बाबतीत समतेच्या पायावर उन्नती करण्याचा प्रयत्न करणे. शाहू महाराज या संस्थेचे आश्रयदाते होते. कामगारांना मजूर संघ काढा असे सांगणारा हा राजा खरोखरच लोकोत्तर पुरूष होता.

१९१३ मध्ये छत्रपतींनी मुलकी अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्याकरिता अनुभवी तज्ञांची योजना पाटील मंडळीच्या मुलांना त्यांच्या कारभाराचे चांगले ज्ञान देण्यासाठी त्यांनी पाटील स्कूल १९१३ मध्ये काढले. तीच दिल्ली दरबार पाटील शाळा होय. सामाजिक न्यायासाठी राजर्षी शाहूंनी आपल्या आचार विचारांच्या जोरावर मागास जातींच्या विकासासाठी समाज सुधारण चळवळीपुढील पाच तत्वावर बळकट करण्याचा प्रयत्न केला.

१. सर्वांगीण धर्मसुधारणा घडवून आणणे, धर्माला सार्वत्रिक नीतीचे अधिष्ठान देउन पुरोहीत शाहीचे वर्चस्व नष्ट करणे.
२. शिक्षणाचा आग्रह करणे आणि मोफत आणि सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा आग्रह धरणे.

३. मागासजातींच्या जातनिहाय चळवळी बांधणे, क्षत्रियत्वाची मागणी करीत त्यांच् लोकशाही अधिकारांच्या आकांक्षा निर्माण करणे, त्यांच्यातील अस्मिता जागृत करणे.

४. स्वतंत्र मतदार संघ, राखीव मतदार संघ व राखीव जागा यांच्या साह्कार्याने सामाजिक व राजकीय क्षेत्रातील उच्च जाती यांची मक्तेदारी कमी करणे.

५. मागास जातींचे आणि ब्राम्हणेतरांचे पक्ष स्थापून समाज सुधारणा आणि शेती सुधारणेचा अ धरणे, या राजकारणात इंग्रज सरकारची मदत घेणे.

६. या पाच तत्वांच्या आधारे सुरू झालेल्या चळवळीने नंतर मोठे रूप धारण केले अ मागासांची व बहुजनांची उन्नती केली.

संदर्भ ग्रंथ -

१ प्रा. डॉ. शिरीष पवार, ' राजर्षी शाहू महाराज - विचार आणि कार्य', सह्याद्री प्रकाशन पुणे च २०१२

२ संपादक रमेश चव्हाण, 'राजर्षी शाहू महाराज यांची सामाजिक विचारधारा व कार्य ', रा.ना. चव्हा जन्मशताब्दी वर्ष प्रकाशन, एप्रिल २०१३.

३ संपादक प्रा. नागोराव कुंभार, 'राजर्षी शाहू महाराज', प्रबोधन प्रकाशन, लातूर जूलै १९९२

४ संपादक डॉ. नागोराव कांबळे, व्यंकट वलांडे, डॉ. राजेय नि. शिंदे , 'राजर्षी शाहू: नव्या दिशा न चिंतन', चिन्मय प्रकाशन औरंगाव ाद जानेवारी २०११

५ केशव हरेल, 'राजर्षि शाहू महाराज : राजकीय विचार', अक्षर दालन कोल्हापूर जानेवारी २०१६

६ तु. वा नाईक 'छत्रपती राजर्षी शाहू महाराज ',मेहता पब्लिशिंग हाउस पुणे, फेब्रुवारी २०१५

७ रमेश जाधव , 'राजर्षी शाहू छत्रपती ', नॅशनल बुक टस्ट, इंडिया २०१३

८ डॉ. जयसिंगराव पवार , 'राजर्षी शाहू छत्रपती : एक मागोवा', सुमेरू प्रकाशन , फेब्रुवारी २०१५

९ डॉ. आर. एस. कोंडेकर, 'रयतेचा राजा : राजर्षी शाहू महाराज', अरूणा प्रकाश लातूर एप्रिल २०११

MAH MAR 34737/13/1/2009-TC
ISSN 2231-573X
UGC Care Listed Journal



कुळवाडी-भूषण पवाडा गातो भोसल्याचा ।
छत्रपती शिवाजीचा ।।धृ०।।
लंगोटयांस देई जानवीं पोर्षीदा कूणब्याचा ।
काल तो असे यवनांचा ।।
शिवाजीचा पिता शहाजी पुत्र मालोजीचा ।
असे तो डौल जहागिरीचा ।।
पंधराशें एक्कूणपन्नास साल फळलें ।
जुन्नर तें उदयाला आलें ।।
शिवनेरी किल्ल्यामध्यें बाळ शिवाजी जन्मलें ।
जिजीबाईस रत्न सांपडलें ।।
हातापायांचीं नखं बोटं शुभ्र प्याजी रंगीलें ।
ज्यांनीं कमळा लाजिवलें ।।
वरखालीं टिर्याख पोटर्याय गांठी गोळे बांधले ।
स्फटिकापरि भासले ।।
सान कटी सिंहापरी छाती मांस दुनावलें ।
नांव शिवाजी शोभलें ।।

– महात्मा जोतिराव फुले



# तिफण

वर्ष : १३ वे । अंक १ला । एप्रिल-मे-जून - २०२२



कुळवाडीभूषण

## छत्रपती शिवाजी महाराज

विशेषांक



# शिवकालीन समाजव्यवस्थेचा समाजशास्त्रीय अभ्यास

- प्रा. डॉ. संजय गंगाराम सुरेवाड
सहा. प्राध्यापक व विभागप्रमुख, समाजशास्त्र विभाग,
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई, जि. बीड

१९ फेब्रुवारी १६३०, ३ एप्रिल १६८० महाराष्ट्रातील मराठ्यांच्या राज्याचे संस्थापक आणि पहिले अभिषिक्त छत्रपती यांचा जन्म मराठवाड्यातील भोसले या वतनदार घराण्यातील मालोजीराजेंचे पुत्र शहाजीराजे आणि सिंदखेडकर लखुजीराव जाधव यांच्या कन्या जिजाबाई या दाम्पत्यापोटी पुणे जिल्ह्याच्या जुन्नर तालुक्यातील शिवनेरी किल्ल्यावर झाला. शिवाजी महाराजांचे पूर्वज चित्तोडच्या सिसोदिया घराण्यातील होते, अशी लौकिक समजूत आहे. हे घराणे दक्षिणेतील होयसळ वंशातील आहे, असेही संशोधन पुढे आले आहे. मालोजीराजे हे या घराण्यातील पहिले कर्तबगार पुरुष. त्यांना शहाजी व शरीफजी अशी दोन मुले होती. मालोजीराजे हे निजामशाहीतील एक कर्तबगार सरदार होते. मालोजीराजे व त्यांचे बंधू विठोजी यांच्याकडे औरंगाबादजवळचे वेरूळ, कन्नड व देऱ्हाडी (देरडा) हे परगणे मुकासा (जहागीर) म्हणून होते. शहाजी पाच वर्षांचे असताना मालोजीराजे मरण पावले. त्यांच्या नावाची जहागीर शहाजींच्या नावाने राहिली. निजामशाहीच्या दरबारातील खंडागळेच्या हत्तीच्या प्रकरणावरून शहाजी व लखूजी जाधव यांच्यात वितुष्ट आले, ते पुढे कायम राहिले. शहाजींनी १६२० पासून निजामशाहीच्या बाजूने आदिलशाहीविरुद्ध लढण्यास सुरुवात केली होती; पण १६२४ मध्ये भातवडीच्या लढाईत पराक्रम करूनही त्यांचा सन्मान झाला नाही, म्हणून ते आदिलशाहीस मिळाले; पण इब्राहिम आदिलशहाच्या मृत्यूनंतर ते पुन्हा निजामशाहीत आले.

निजामशाहीतील दरबारी कारस्थानात शहाजींचे सासरे लखूजी जाधव मारले गेले (१६२९). त्यामुळे नाराज होऊन त्यांनी निजामशाहीची नोकरी सोडली त्या सुमारास त्यांचा मोठा मुलगा संभाजी यांचा विवाह शिवनेरीचा किल्लेदार विश्वासराव यांच्या मुलीशी झाला होता. त्या निमित्ताने शहाजींनी जिजाबाईस शिवनेरीवर ठेवले होते. विजापूर सोडून गेल्यामुळे मुहंमद आदिलशहा (कार. १६२७-५६) हा शहाजींवर नाराज झाला होता. आदिलशाहीविरुद्ध गेलेली आणि लखूजींच्या मृत्यूमुळे निजामशाही सुटलेली अशा अवस्थेत शहाजींना परागंदा होण्याची वेळ आली. अखेर आदिलशहाच्या बोलावण्यावरून ते १६३६ मध्ये त्याच्या नोकरीत शिरले. आदिलशहाने त्यांच्याकडे पुण्याची जहागिरी बहाल केली व मोठा हुद्दा देऊन कर्नाटकाच्या मोहिमेवर पाठविले. विजापूरच्या सैन्याने १६३८ च्या अखेरीस बंगलोर (सध्याचे बंगळुरू) काबीज केले. तेव्हा बंगलोर, कोलार इ. प्रदेशांची जहागीर शहाजींना मिळाली आणि ते बंगलोर येथे कायमचे राहू लागले.

**बालपण, शिक्षण, स्वराज्याचा श्रीगणेशा -** शिवाजी महाराजांचे बालपण शिवनेरी, माहुली, ठाणे जिल्हा व पुणे येथे गेलेले दिसते. बंगलोरलाही ते काही काळ राहिले. शिवाजीराजे आणि जिजाबाई यांच्याकडे महाराष्ट्रातील जहागिरीची व्यवस्था सोपवून शहाजीराजांनी त्यांची पुण्याला रवानगी केली. जहागिरीची प्रत्यक्ष व्यवस्था पाहण्यासाठी शहाजींनी दादोजी कोंडदेव आणि आपले काही विश्वासू सरदार यांची नेमणूक केली. जिजाबाईंचा देशाभिमान, करारीपणा आणि कठीण प्रसंगांतून निभावून जाण्यासाठी लागणारे धैर्य या त्यांच्या गुणांच्या तालमीत शिवाजीराजे तयार झाले त्यांच्या या शिकवणीतून शिवाजीराजांना स्वराज्य स्थापनेची स्फूर्ती मिळाली. आपल्या जहागिरीच्या संरक्षणासाठी गड, किल्ले आपल्या ताब्यात असले पाहिजेत ही जाणीव त्यांना बालवयापासूनच झाली.

पुढील सहा वर्षांत शिवाजी महाराजांनी जहागिरीचा सगळा बंदोबस्त आपल्याकडे घेतला. पुणे, सुपे, इंदापूर, चाकण ही या जहागिरीतील प्रमुख स्थळे आहेत. १६५४ च्या

सुमारास महाराजांनी पुंदरचा किल्ला महादजी नीळकंठराव किल्लेदार याच्या मुलांकडून हस्तगत केला आणि पुणे प्रांताची सुरक्षितता मजबूत केली. याची शत्रूला तेवढी धास्ती वाटत नव्हती; परंतु शिवाजीराजांनी घालून दिलेली उदाहरणे, निर्माण केलेली व्यवस्था, लावलेल्या सवयी आणि बहुसंख्य मराठ्यांत रुजविलेली एकतेची भावना याची शत्रूंना मात्र भयंकर भीती वाटत होती. म्हणून सेतू माधवराव पगडी लिहितात, "छत्रपतींनी आपल्या वाणीने व कृतीने या लोकांना ध्येयवाद शिकविला. भारतात एकापेक्षा एक पराक्रमी राजे होऊन गेले. त्यांनी प्रचंड साम्राज्ये निर्माण केली. काहींची धग अजूनही कायम आहे. तर काहींचा काळाच्या ओघात इतिहासही विसरला आहे. साम्राज्ये उभी राहत असतात आणि कोसळत असतात; पण दीर्घकाळ अथवा कायम टिकत असतात केवळ तत्त्वे आणि व्यक्तीचा आदर्श. शिवरायांनी महाराष्ट्रात तत्वाची पेरणी केली आणि काही आदर्श मराठी माणसांच्या अंगी बाणवून दिले. महाराष्ट्रात त्या तत्त्वांची आणि आदर्शांची आजही चुणूक दिसून येते. हिंदवी स्वराज्याचा पाया घालणारा आणि त्यांस मूर्त स्वरूप देऊन स्वराज्याचा पहिला धडा देणारा राजा शिवाजी एक महान राष्ट्रपुरुष होता." शिवरायांचे राज्य महाराष्ट्रात केवळ तीन-चार जिल्ह्यांचेच होते; पण संपूर्ण हिंदुस्थानावर त्याचा प्रभाव पडला होता. म्हणूनच रवींद्रनाथ टागोर आपल्या इतिहास या ग्रंथात लिहितात, "मराठ्यांनी नुसते शौर्य दाखविले नाही तर त्यांनी राष्ट्र निर्माण केले." त्यामुळेच पंडित जवाहरलाल नेहरूंना इ.स. 1957 साली म्हणावे लागले "शिवाजी महाराज एकट्या महाराष्ट्राचेच नाहीत तर साऱ्या राष्ट्राचे आहेत. ते राष्ट्रपुरुष आहेत."

मध्ययुगीन शिवपूर्वकाळात समाजात नैराश्य आणि मरगळ आलेली असताना छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाच्या जादूने बहुजन समाजात चैतन्य आणि आत्मविश्वास निर्माण केला. त्यांच्या या महत्कार्याची दखल घेऊनच रशियन बुल्गानिन 1956 साली म्हणाले, "साम्राज्यशाहीविरुद्ध बंड उभारून स्वातंत्र्याची मुहूर्तमेढ जर या भारतात प्रथमतः कोणी रोवली असेल तर ती शिवाजी महाराजांनीच. बाराशे वर्षांच्या पारतंत्र्यामुळे कलियुगात यवन राजेच राज्य करणार अशी रूढ झालेली समजूत शिवरायांनी खोटी ठरविली आणि बहुजनांच्या हितावर आधारलेले सार्वभौम आणि स्वतंत्र असे स्वराज्य निर्माण केले. मुघल साम्राज्याच्या युद्धपिपासू भयानक आणि विध्वंसक मार्गाने नाश करणाऱ्या तंत्राचा व साऱ्या राष्ट्राचा आर्थिक, सामाजिक, विकास, मानवी, सांस्कृतिक जीवनाचा, समाजाचा व विशेषतः किसान आणि कारागीरवर्गांचा नाश करून, साऱ्या देशाला संकटात टाकून विध्वंस करणाऱ्या पेचप्रसंगाला तोंड देण्याचे व त्यातून मार्ग काढण्याचे अवघड कार्य फक्त शिवाजीनेच केले." म्हणून फ्रेंच गव्हर्नर मार्टीनला वाटते, "हिंदुस्थानातील नाव घेण्यासारख्या अशा थोर विभूतींमध्ये शिवाजीला अत्यंत महत्वाचे स्थान आहे." पॅटिजरसारख्यानेही शिवरायांची स्तुतीच केली. त्याला शिवराय अलौकिक पुरुष वाटतात. त्यांच्या काही कृत्याबद्दल त्यांना दोष द्यावा लागला तरी, इतिहासातील त्यांचे स्थान मान्य करावेच लागेल, असेही पॅटिजर बोलून जातो. पोर्तुगीज व्हाईसरॉय विरजईने पोर्तुगाल राजास 20 सप्टेंबर 1667 रोजी पत्र लिहून कळविले होते. त्यांची मुत्सद्देगिरी, धूर्तता, शौर्य, चपळाई व युद्धविषयक दूरदृष्टी लक्षात घेतल्यावर त्यांची सिझर व सिकंदर यांच्याशीच तुलना करता येईल. अनेक इतिहासकारांनी शिवरायांची तुलना पाश्चात्त्य जगज्जेत्यांशी केलेली आहे; पण तरीही सर्वांगाने विचार केल्यास शिवाजीराजे या जगज्जेत्यांपेक्षा काकणभर सरसच ठरतात. त्यांची योग्यता ही स्वयंसिद्ध होती. अलेक्झांडरला, सिझरला वारसाहक्काने साम्राज्ये मिळाली होती; शिवरायांनी शून्यातून विश्व निर्माण केले. अलेक्झांडरप्रमाणे शिवरायांनी आपल्या स्नेही, सोबत्यांना ठार मारले नाही. सिझरचे चारित्र्य इतके शंकास्पद होते की रोममधील सर्व स्त्रियांचा तो पती आहे असे म्हटले जात होते. वि. का. राजवाडे लिहितात, "शिवाजीची खाजगी वर्तणूक व सार्वजनिक पराक्रम इतके लोकोत्तर होते की, त्यांच्याशी तुलना करावयास जो जो म्हणून घ्यावी ती ती ह्या ना त्या गुणाने शिवाजीहून कमतरताच दिसेल."

भाई अमृत डांगे यांनी 26 मे 1974 ग्रंथात लिहिले, "हिंदवी स्वराज्य स्थापनेचे जनक आणि कल्पक, बहुजन समाजातील शेतकरीवर्गाचे, गनिमी काव्याच्या शास्त्राचे आद्य संचालक, अतिशय धूर्त, निर्भय, मुत्सद्दी आणि मराठ्यांच्या स्वातंत्र्ययुद्धाचे शूर प्रवर्तक, स्वातंत्र्यसंग्रामाचा मूळ आधार व थोर मुत्सद्दी अशा वीर मातेचे सुपुत्र, श्रमजीवी किसान व कारागीरवर्गाचे नेते" अशी समर्पक शब्दांत डांगेंनी शिवाजी महाराजांची संभावना केली महाप्रतापी शिवरायांनी मराठा मनाची सांस्कृतिक उंची वाढविली. शूद्र वासनांच्या पलीकडे त्यांना (मावळ्यांना) दृष्टी फेकण्यास शिकविले. त्यांच्या राज्यात सर्वधर्मीयांना समान वागणूक मिळाली. स्त्रियांचे रक्षण

झाले आणि प्रत्येक जातीच्या माणसास पुढे येण्यास वाव मिळाला. महाराजांनी इतर सत्ताधीशांप्रमाणे धर्मयुद्ध पद्धती अवलंबविली असती, तर त्यांना कधीच विजय मिळाला नसता.

शिवरायांच्या राज्याची मजबुती मुघलांप्रमाणे लष्करी जोरावर रचलेली नसून लोकांच्या सुखसमृद्धीवर स्थापलेली होती. त्यांचे प्रत्येक कृत्य हे सार्वजनिक हिताचे होते. म्हणून रवींद्रनाथ टागोर यांना वाटते की, "आधुनिक भारतात जर कोणत्या प्रदेशाला इतिहास असेल आणि त्या इतिहासातून जर काही इतिहासविषयक तत्त्वे शिकण्यासारखी असतील तर मराठ्यांच्या इतिहासातूनच. याचाच अर्थ असा की, शिवरायांनी महाराष्ट्रात इतिहास घडविला म्हणजे भारतातील इतर प्रांतांना इतिहास घडविता आला नाही असे नाही; राजस्थानमध्ये काही कमी उलथापालथ झाली नाही; परंतु राजपूतही होते. जोधपूर, बिकानेर, जैसलमेर चित्तोड अशी निरनिराळी संस्थाने राजस्थानात होती त्यांच्या राजांना आपल्या संस्थानापलीकडे सर्व राजस्थान पाहण्याची दृष्टी कधी आलीच नाही. ज्याला त्याला आपल्या अल्पशा जयपूर, जोधपूरचा अभिमान आणि आपले कूळ श्रेष्ठ हा दुराभिमान होता. त्यामुळे शिवरायांसारखाच महाप्रतापी नेता महाराणा प्रताप राजस्थानात निर्माण होऊनही महाराष्ट्रात जशी स्वातंत्र्य आसक्ती निर्माण झाली तशी राजस्थानातील राजपुतांत झालेली दिसत नाही; कारण राजपूत राजे केवळ आपल्या जातीसाठीच लढले, राष्ट्र निर्माण करण्यासाठी नाही, असे खेदाने म्हणावे लागते. शौर्याच्या बाबतीत राजपूत मराठ्यांपेक्षा तिळभरही कमी नव्हते. उलट केसरिया बांधून रणात उतरल्यावर केवळ मारण्यासाठी किंवा मरण्यासाठीच ते लढत असत. इतके ते निधड्या छातीचे होते. त्या अर्थाने मराठ्यांपेक्षा राजपूत काकणभर जास्त बेडरही वाटतील; पण मराठ्यांना जी दूरदृष्टी लाभली ती राजपुतांकडे कधीच नव्हती. पंजाबातील शीखही काही कमी शौर्यवान नव्हते. महाराष्ट्रीय लोकही चकित व्हावेत असा पराक्रम शिखांनी गाजविला; पण तो एक प्रकारचा त्यांचा आक्रास्ताळेपणा ठरला." रवींद्रनाथ टागोरांनी आपल्या ग्रंथात म्हटल्याप्रमाणे गुरू गोविंदसिंगानी मोगलांशी अनेक युद्धे केली; परंतु ती विसंगत स्वरूपाची वाटतात सूड किंवा आत्मसंरक्षण हीच भारताकडे आणि दूरच्या काळाकडे लक्ष ठेवून केलेली ती एक मोठी तयारी होती. त्याला विशिष्ट पद्धत आणि श्रृंखला होती. कोणत्या तरी संप्रदायाचा संताप व्यक्त करण्याचा तो एक उपाय नव्हता, तर थोर ध्येय साधनेचे ते प्रयत्न होते. म्हणून शिवरायांचे मोठेपण मान्य करावे लागते सर्वच जातीधर्मांचे लोक शिवरायांचा आज जयजयकार करतात अशी लोकप्रियता बहुधा कोणत्याही ऐतिहासिक पुरुषाला मिळालेली नसेल.

प्रा. शेजवळकरांनी 'श्री शिव छत्रपती' या ग्रंथात लिहिले की, "आमच्या मते शिवाजीच्या महाराष्ट्रातील राज्याचे क्षेत्रफळ पंचवीस हजार चौरस मैलाहून अधिक नव्हते आणि त्यातील लोकसंख्याही पंचवीस लाखांच्या वर नसावी नाशिक, पुणे, सातारा, कोल्हापूर व बेळगाव या जिल्ह्यांतील समुद्रालगतचे तालुके त्यांच्या अंमलाखाली होते पोर्तुगीज व्हाइसरॉय विरजईने ले. लिब्सनला पाठविलेल्या पत्रात शिवरायांची योग्यता नमूद करताना लिहिले, सबंध हिंदुस्थानावर सत्ता प्रस्थापित करू शकला असता असा सिकंदरच्या तोडीचा योद्धा."

छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाजव्यवस्थेविषयक दृष्टिकोनाचे विश्लेषण करण्यापूर्वी त्यांनी मध्ययुगीन कालखंडातील सुलतान आणि मोगलशाहीच्या काळातील समाजव्यवस्थेतील परिस्थितीचे आणि त्यांच्यावर लादलेल्या गुलामगिरीच्या प्रथेचे विविध पैलू दिसून येतात. मध्ययुगीन काळातील स्त्रियांच्या मानहानीच्या व त्यांना प्राप्त झालेल्या भोगदासीच्या दर्जाचा विस्ताराने आढावा घेतलेला आहे; पण हे वाचत असताना वाचकांची अशी समजूत होण्याची शक्यता आहे की, स्त्रियांवर गुलामगिरी फक्त मध्ययुगीन काळातच लादली गेली होती की काय? परंतु ऐतिहासिकता तशी नाही. अगदी प्राचीन भारतातही भारतीय समाजात गुलामगिरीची प्रथा आणि तीही स्त्रियांसंदर्भातील अस्तित्वात होती किंबहुना राजेशाही आणि सरंजामशाही या दोन पद्धती स्त्री गुलामगिरीमध्ये प्रथेशिवाय पूर्णत्व पावत नाहीत, असा सर्व जगातील समाजाचा इतिहास आहे आणि हिंदुस्थानही त्यास अपवाद नाही. ज्या कालखंडात स्त्रीची किंमत उपभोग्य वस्तू म्हणून मानली जात असे त्या कालखंडातील समाजव्यवस्थेचे विदारक सत्य म्हणावे लागेल.

छत्रपती शिवाजी महाराजांनी त्यांच्या वर्तणुकीतून स्त्रीवादी दृष्टिकोन व त्याचे उत्तर शोधण्याचा व आपल्या परीने ते उत्तर देण्याचा प्रयत्न केलेला आहे आणि स्त्रीवादी दृष्टिकोन तर नाहीच राजांचे व्यक्तिमत्त्व तशा अंगाने आकार घेत गेले. बालवयात झालेले संस्कार दूरगामी परिणाम करणारे ठरत

असतात. जिजाऊ मातेच्या भूमिकेशिवाय प्रसंगानुरूप पित्यांची भूमिकाही बालशिवाजीने समजून घेतली. आईची दयाबुद्धी, उदार अंतःकरण, न्यायशीलता, जबाबदार वृत्ती आणि प्रसंगी कठोरपणा इत्यादी गुणतत्त्वे त्यांनी आत्मसात केली. हीच बाब त्यांच्या संपूर्ण व्यक्तिमत्त्वावर आणि त्यांनी अंमलात आणलेल्या धोरणांवर मातेश्री जिजाऊ यांचा निश्चितपणे प्रभाव होता. छत्रपती शिवाजी महाराजांचा दृष्टिकोन अधिक तपशीलवार व उदाहरणे देऊन मांडत असताना शिवाजीराजांनी सैनिकांना दिलेल्या सक्त आदेशांचा उल्लेख केला आहे जसे की मोहिमेवर स्त्रिया न आणण्याची ताकीद, युद्धात स्त्रियांना पकडू नये याची ताकीद. शिवाजीराजे नियमांचे भोक्ते होते म्हणून नियमांचा भंग करणाऱ्यांना कडक शिक्षा दिली जात असे. मग तो बलात्कार करणारा रांझेगावचा पाटील असो, बदकर्म करणारा रंगो त्रिमळ कुळकर्णी असो किंवा स्वतःचा पुत्र संभाजी असो शिवाजी महाराजांनी स्त्रियांचा नेहमी मान सन्मानच केला, मग ती कट्टर शत्रू रायबाघन का असेना.

16 व्या 17 व्या शतकात पाश्चात्य जगात नवनवे शोध लागत असताना युरोपीयन लोक जगाचा प्रवास करीत असताना नवखंड पृथ्वी व दहावा खंड काशी असा भारतीयांचा भूगोल होता. उन्नती, अवनती, जय, पराजय, उत्कर्षापकर्ष हे सर्व पाप-पुण्य, दैवयोगाने, परमेश्वरी इच्छेने घडत असते ही भारतीय लोकांची ऐतिहासिक घडामोडीची मीमांसा होती. त्यामुळे अशा मानसिकतेचे लोक स्त्रियांचा विचार करताना दूषित बुद्धीनेच करणार हे उघड आहे. कारण धर्मग्रंथानुसार स्त्रीजन्म हा पूर्वजन्माचे फळ आहे. समाजातील ऐतखाऊ लोकांनी आपल्या पोटापाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी रूढी, प्रथा, परंपरा यांना केवळ उचलूनच धरले असे नाही, तर नवनवीन पायंडे पाडून ठेवले त्यापैकी सती हा एक प्रकार आहे. जो शिवाजी महाराजांनी धुडकावून लावला.

आज आधुनिक काळातही शकुन-अपशकुन यास अनन्यसाधारण महत्त्व दिले जाते. तो तर मध्ययुगीन काळ होता; परंतु या खुळचट कल्पनांना शिवरायांनी अजिबात थारा दिला नाही. सर्व प्रश्न तलवारीनेच सुटत असतात अशी मध्ययुगीन समाजाची मानसिकता बनली होती आणि त्यांची ती समजूत पूर्णतः चुकीची होती. डॉ. अनिल कठारे 'महाराजांचा इतिहास' या ग्रथांत लिहितात, "स्वराज्य लढ्याच्या उभारणीत मुसलमान, रामोशी, पठाण, बेरड, भंडारी, कोळी, भिल्ल, बेलदार, धनगर, न्हावी, ब्राह्मण, तेली, मराठा याशिवाय ज्यांना गावकुसामध्ये प्रवेश मिळत नव्हता अशा महार, मांग व चांभार जातीच्या लोकांनासुद्धा सामावून घेतले. बहुतेक मुस्लीम शासक जनतेशी समरस होत नव्हते, आपले सर्वाधिकार ते विभिन्न प्रांतांच्या सुभेदारांकडे किंवा अधिकाऱ्यांकडे सोपवित. त्यामुळे हे अधिकारी स्वतंत्रपणे मनमानेल असा कारभार करीत. राजसत्तेच्या पाठिंब्यावर सरदार, सरंजामदार जनतेला बेलगाम छळत असत. नव्हे त्यांना तर तत्कालीन कायद्याने हे सर्व अधिकार प्रदान केले होते, असे म्हणण्यास जागा आहे.

मूल जन्मल्यानंतर पहिली गुरू आईच असते, हे नव्याने सांगण्याची गरज उद्भवली आहे. शिवरायांच्या प्रत्येक पैलूवर अखेरपर्यंत मातोश्री जिजाऊंची छाप होती, हे शिवरायांच्या चरित्र्यातून स्पष्ट दिसते. स्वराज्य स्थापन करावयाचे हा मायलेकरांचा कृतसंकल्प होता स्वराज्य निर्माण करण्याची प्रेरणा जिजाऊंची होती. शिवरायांचा जयघोष करणाऱ्यांत आज हौसे, गवसे आणि नवसे असे सर्वच प्रकारचे लोक आहेत. अशा प्रकारचे चित्र माझ्या मते कोणत्याही इतिहास पुरुषाच्या संदर्भात पाहावयास मिळणार नाही. भारतात अनेक राजे झाले ज्यांनी अलौकिक पराक्रम गाजविले. साम्राज्ये उभे केली; पण शिवरायांना जी लोकप्रियता मिळाली ती इतरांना क्वचितच मिळाली असेल.

या सरंजामकालीन राजाने स्वकर्तृत्वावर राष्ट्र घडविले. मराठी माणसाची अस्मिता जागविली आणि गोरगरीब बहुजन माणसाला व्यवस्थेत सामावून घेतले. हे सर्वश्रुत आहे; पण माझ्या दृष्टीने शिवरायांचे सर्वात मोठे आणि महत्त्वाचे कोणते कार्य असेल, तर ते म्हणजे जातिप्रथा, स्त्रीदास्य आणि ब्राह्मणी वर्चस्वाला जबर हादरे दिले हे होय. हजारो वर्षे अबाधित असलेल्या या प्रथा-परंपरांना कोणत्याही राजाने, महाराजाने धक्का लावण्याची हिंमत केली नव्हती. म्हणून शिवरायांच्या धाडशीपणाचे कौतुक वाटते.

**जातिप्रथा अमान्य :** शिवराय आजच्या परिभाषेत समाजसुधारक नव्हते, ते मध्यकाळातील एक राजे होते. त्यांना अभिप्रेत असो किंवा नसो पण स्वराज्य उभारणीत ज्या ज्या प्रथा, परंपरांचा अडथळा आला त्या त्या अडथळ्यांना त्यांनी झटक्यासरशी दूर केले आणि त्यांच्या याच वर्तनामुळे आधुनिक काळात साजेसे आणि सुसंगत बदल घडून आले. अस्पृश्य आणि आदिवासी जाती-जमातींना त्यांनी, शेतकरी जाती बनविले. ग्रॅण्ड डफचा हवाला देऊन कॉ. शरद पाटील

लिहितात - कुणबी व मावळातले कोळी इ. आदिवासी शिवाजीच्या निशाणाखाली मराठा बनण्यासाठी जमा झाले. कोळ्यांना सांगण्यात आले की त्यांनी अस्थायी शेती सोडून स्थिर शेती केली तर त्यांना मराठा, कुणबी बनता येईल, तर अस्पृश्य समाजाच्या हातात त्यांनी प्रथमच तलवार देऊन पारंपरिक संकेत मोडीत काढले अस्पृश्य स्पृश्यांच्या खांद्याला खांदा देऊन स्वराज्य उभारणीसाठी सज्ज राहिले शेकडो वर्षानंतर त्यांना शौर्य दाखविण्याची संधी मिळाली अस्पृश्य जातीमध्ये महार, मांग, चांभार, रामोशी, मेहतर या जातींना बालेकिल्ल्यात प्रवेश मिळू लागला. महार किल्लेदार बनले, तर हेर खात्यात बजंगी रामोशी लोक आले. शिवरायांच्या सिंहासनावर चादर घालण्याचे काम मेहतर भंगी करीत असत. 'तारिखे इब्राहिम खान' या ग्रंथाचा लेखक इब्राहिम लिहितो की, "मराठ्यांचे सैन्य मुख्यतः कुणबी, सुतार, वाणी आणि इतर हीन जातींनी बनलेले होते. महाराष्ट्रातील ब्राह्मण आणि श्रीमंत कुलवंत भटाळलेले मराठे शिवरायांवर असूयेच्या भावनेने टीका करताना म्हणत, शिवाजीने बरीच हलकी पोरं जमविली. या टीकेवरून शिवरायांच्या सैन्यातील शूद्रातिशूद्रांच्या संख्येचे प्रमाण लक्षात येते. शिवरायांच्या राजकीय धोरणामुळे जातिभेदावर आघात झाला. त्यामुळे भटाभिक्षूकांना धर्म बुडत असल्याचा साक्षात्कार झाला नसेल आणि त्यांनी आक्रोश केला नसेल असे वाटत नाही; परंतु त्यांच्या आक्रोशापेक्षा स्वराज्यहित महत्त्वाचे वाटल्यास नवल नाही. शिवाजीराजांनी महाराष्ट्रात राष्ट्र निर्माण केले. महाराजांनी धर्म पद्धती अवलंबिली असती तर त्यांना कधीच विजय मिळाला नसता म्हणजे शिवाजीराजे जात आणि धर्मात अडकून पडले नाहीत म्हणून ते सर्व जातिधर्मांचे राष्ट्रीय सैन्य उभारू शकले आणि स्वराज्याचे स्वप्न साकार करू शकले.

**स्त्रीवादी राजा :** शिवाजीराजे स्त्रीवादी विचारांचे होते हे सर्वमान्य होण्यास हरकत नाही. महाराजांनी दुसरा राज्याभिषेक सहज म्हणून केलेला नाही. शाक्त पद्धतीने केलेला हा विधी येथे काही सांगून जातो तंत्र हा स्त्रीप्रधान आचार विचार पंथ होता. वारकरी पंथातील समता केवळ आध्यात्मिक पातळीवर होती. तांत्रिक समतामोक्ष गावकुसाबाहेरील अस्पृश्य, आदिवासींच्या वस्तीत होता.

**संदर्भ ग्रंथ**


- प्रा. दिनेश मोरे, 'शिवरायांचा स्त्री-विषयक दृष्टिकोन', चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद
- वीरेंद्र बहुवंशी, 'छत्रपती शिवाजी', प्रिझम बुक्स, (इण्डिया) जयपूर
- गो. प. नेने, 'छत्रपती शिवाजी महाराज कारागार ते सिंहासन', राजपाल अँण्ड सन्स, कश्मिरी गेट, दिल्ली
- गजानन भास्कर मेहेंदळे, 'श्री राजा शिवछत्रपती' भाग-1, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे
- गजानन भास्कर मेहेंदळे, 'श्री राजा शिवछत्रपती' भाग-2, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे


◆◆◆◆◆



Dept. of Sociology

# Dr. Khandare Rohini Vijaykumar

Asst. Professor, Dept. fo Sociology

## Publications:

1. Articles/Research Paper Published in Journals:

| Sr. No. | Article/ Research Paper | Jouranl/ Book | National/ International | ISSN/ISBN | Impact Factor | Editor/Publisher | Year |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | जागतिकीकरणाच्या प्रवाहामध्ये स्वदेशी | CHRONICLE OF HUMANITES & CULTURAL Studies (CHCS) UGC approved Journal No. 63716 | Internationl | ISSN No. 2454-5503 | 4.197 | Chief Editor CHRONICLE OF HUMANITES & CULTURAL Studies (CHCS) | 2017-2018 VOL/ISSUE/FEB RUARY 2018 |
| 2. | सामाजिक परिस्थितीमधुन मानवी हक्काची निर्मिती | RESEARCH JOURNEY International Multidsciplinary E-Research UGC Approved No. 40705Journal | International | ISSN No. : 2348-7143 | 6.261 | Chief Editor The Role of Government to protect the Human Rights | 2018-2019 Special Issue – 130(II) Feb. 2019 |

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) -0.676 Special Issue – 130 (II) | Feb. 2019 | UGC Approved No. 40705
The Role of Government to protect the Human Rights

# सामाजिक परिस्थितीमधुन मानवी हक्काची निर्मिती

**डॉ. खंदारे रोहिणी विजयकुमार**
(समाजशास्त्र) अंबाजोगाई .

---

**सारांश :-**

जागतिक शांतता आणि सुरक्षिततेसाठी मानवी हक्काची निर्मिती झाली .मानवाला काही हक्क हे निसर्गताच मिळत असतात. माणुस हा सामाजिक प्राणी असल्यामुळे समाजामधील सर्व नियमानुसार वर्तन करणे बंधनकारक असते. समाजामध्ये समानता निर्माण करणे, संस्कृतीची जपवणुक करणे, यातुनच मानवी हक्काची निर्मीती झाली आहे. जगाने स्वातंत्र्य , समता व बंधुता हे तत्व अंगीकारने काळाची गरज आहे, कारण आधुनिक काळामध्ये सर्व देशांजवळ विध्वंसक असा शस्त्राचा साठा आहे, त्यामुळे काही क्षणामध्ये संपुर्ण जग नष्ट होऊ शकतो त्यामुळे मानवी हक्काचे स्वातंत्र्य, समता व बंधुता या तत्वाचा स्वीकार आज जगाने केलेला आहे व यामधुन जागतिक शांतता व सुव्यवस्था निर्माण होत आहे. ही मानवी हक्काची निर्मीती ही समाजातील परिस्थितीतुन निर्माण झालेली आहे.

आदिम काळामध्ये मानव हा इतर पशु व प्राण्याप्रमाणे वर्तन करत असे त्याच्यावर कुठल्याही प्रकारचे बंधन नव्हते, तो अनियंत्रितपणे वागत असे मानव प्राण्याच्या वर्तनामध्ये काळानुसार परिवर्तन होत गेले. आदिम काळाच्या नंतर मानव हळुहळु स्थिर होवु लागला. आदिम समाजामध्ये रोजच्या गरजांसाठी दररोज अन्नसंकलन व शिकार मार्गाचा अवलंब केला जात असे आदिम काळामध्ये समाजाच्या आर्थिक व सामाजिक घटक समानता असल्यामुळे समाजामध्ये भिन्नता आढळुन येत नाही. समाजामध्ये जसजसे परिवर्तन होवु लागले. मानवाने आपल्या मानवी बुध्दीचा वापर करुन वेगवेगळया साधनांचा शोध लावला. प्रत्येक समाजाचा विशिष्ट संस्कृती निर्माण झाली व यामधुनच मानव सामाजिक प्राणी बनला.

मानवाच्या अनेक विविध गरजांची पुर्तता हया मानवाला समाजामध्ये वास्तव्य करुनच पुर्ण कराव्या लागतात. मानवाच्या समाजातील वास्तव्यामुळेच त्याच्या व्यक्तिमत्वाची सामाजिकिरणाच्या माध्यमातुन जडणघडण होत असते. मानवी समाजाला स्थिरता प्राप्त झाल्यानंतरच मानवी समाजामध्ये विविधता निर्माण झाली, विविधतेमधुनच समाजामध्ये स्तर निर्माण झाले, यामध्ये जात, वंश, धर्म, पंथ, स्त्री , पुरुष यांच्या माध्यमातुन समाजामध्ये भिन्नता निर्माण झाले. आदिम काळामध्ये व्यक्तीला वर्तन स्वातंत्र्य होते कारण त्याकाळामध्ये मानव हा जैविक प्राणी होता. समाज व्यवस्था सुरळीत चालण्यासाठी समाजातील वेगवेगळया संस्था कार्यरत असतात, त्यांच्या माध्यमातुन मानवी समाज नियंत्रीत देखील केला जातो. मानवाला सामाजिक जीवन जगत असताना समाजामधील निर्बंधाचे पालन करणे गरजेचे असते. रुढी, परंपरा, प्रथा व कायदा यांच्या माध्यमातुन व्यक्तीचे वर्तन नियंत्रित केले जात असते. सामाजिक बंधनामुळे व्यक्तिच्या विकासामध्ये अडसर निर्माण होत नाही. सामाजिक जीवनात व्यक्तीला काही संधी किंवा सवलती मिळत असतात. या प्राप्त झालेल्या सवलतीनांच हक्क म्हणता येते.

``हक्कांची निर्मिती किंवा उद्भव सामाजिक परिस्थितीतुनच होत असतो. स्वाभाविकपणे हक्क सामाजिक गरजेतुनच उदयास येतात म्हणुन प्रा.लास्कींनी हक्कांना सामाजिक परिस्थितीचे घटक असे संबोधले आहे. `` 1)

मानव अधिकार हे व्यक्तीला जन्मतःच असतात. मानवी समाजामध्ये व्यक्तीला जरी जन्मतःच स्वातंत्र्य असले तरी व्यक्तीला या हक्काची जाणीव होणे गरजेचे आहे. मानवाच्या सर्वांगीण विकासासाठी हक्क महत्वाचे असतात. हक्कांशिवाय मानव प्रगती होवु शकत नाही.म नवाच्या सर्वांगीण विकासासाठी हक्क आवश्यक असतात. मानवी हक्क हे मानवजातीच्या सर्व घटकांना समान पध्दतीचे असतात.

**मानवी हक्काची निर्मीती :-**

मानवी समाजामधील अंशातता दुर करण्यासाठी मानवी हक्काची गरज असते. मानवी हक्काच्या माध्यमातुन समाजामध्ये समानता निर्माण केली जावु शकते. समाजामध्ये जातीच्या माध्यामातुन असमानता आहे तसेच धर्माच्या, गरिब श्रीमंत तसेच स्त्री पुरुष भेद या सर्व माध्यमातुन समाजामध्ये असमानता निर्माण होते. यामुळे सतत एका वर्गाचे दुसऱ्या वर्गावरती वर्चस्व गाजवण्याचा प्रयत्न केला जातो, त्यामुळे त्यामधुन दुसऱ्याच्या हक्काची पायमल्ली होते. समाजामध्ये या वर्चस्वाच्या माध्यमातुन शोषक आणि शोषीत हे दोन वर्ग निर्माण होतात. पितृसत्ताक कुटूंब पध्दतीच्या माध्यमातुन फार पूर्वीपासून पुरुष स्त्री वरती वर्चस्व गाजवतो व तिच्या हक्काची पायमल्ली करतो त्यामुळे सतत स्त्रियांचे शोषण केले जाते. जाती भेदानुसार समाजामध्ये श्रेष्ठ व कनिष्ठ जाती भेद असल्यामुळे श्रेष्ठ जाती कनिष्ठ जातीच्या व्यक्तीवरती अन्याय अत्याचार करतात त्यामुळे त्यांच्या हक्काचा वापर त्यांच्या विकासासाठी त्यांना पुरक नाही. समाजामध्ये असणारे दोन वर्ग यातुनच दुसऱ्यांचे शोषण केले जाते व यातुनच समाजामध्ये असमानता व अशांतता निर्माण होते.

युरोपमध्ये संरजामशाही पध्दती होती संरजामशाही पध्दतीमध्ये गरीब, शेतकरी, शेतमजुर लहान व्यवसाय करणारे त्रस्त झाले होते. धर्मगुरु, अमीर-अमराव व संरजामदार यांच्या सामाजिक आणि आर्थिक शोषणाला कंटाळुन गेले होते. 13,14 व 15 च्या शतकांमध्ये वैचारिक युगाची निर्मिती झाली पश्चिम युरोपमधील इटली, जर्मनी, फ्रान्स, इंग्लंड या देशात देशात प्रबोधन घडुन आले. हळुहळु हि प्रक्रिया युरोप खंडामध्ये पसरली, याचा परिणाम स्वरुप अमेरिकेची क्रांती, फ्रेंच क्रांती, घडुन आल्या. फ्रेंच राज्यक्रांती ही जागतिक युग प्रवर्तक घटना होय. फ्रेंच राज्यक्रांतीने स्वातंत्र्य, समाता आणि बंधुत्व ही वैशविक मुल्ये संपुर्ण मानवी समाजाला दिली. मानवी हक्क हे मानवाच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक आहेत त्यामुळे मानवी हक्क व्यक्तीच्या जडणघडमध्ये महत्वाची भुमिका पार पाडतात. व्यक्तीचा अंतरिक विकास व भौतिक यांचा आधार हे मानवी हक्कच असतात. फ्रेंच राज्यक्रांतीसोबत युरोपमध्ये औद्योगिक क्रांतीदेखील झाली. यामुळे वेगवेगळया उद्योग धंदयाची निर्मिती झाली नवनवीन शोध लागले व यातुन सामाजिक व आर्थिक परिस्थिती बदलली, याच दरम्यान पहिले महायुध्द 1914-17 च्या दरम्यान सुरु होते, त्यामुळे आर्थिक व सामाजिक नुकसान झाले. यातुन अशांतता निर्माण झाली. या अशांततेतुनच 1939 ते 45 च्या दरम्यान दुसरे जागतिक महायुध्द झाले . या युध्दामध्ये मानव हानी, फार मोठया प्रमाणावर झाली. अणुबॉम्बच्या साहाय्याने सर्व सामान्य जनतेला देखील यामध्ये सहभागी करुन घेतले होते. दुसऱ्या महायुध्दामध्ये प्रत्येकावर संकट निर्माण झाले होते. या दुसऱ्या महायुध्दामुळे मानव हानी व वित्त हानी फार मोठया प्रमाणावर झाली होती. यातुनच जागतिक अशांतता निर्माण झाली होती .

जगातील सर्वच राष्ट्रामध्ये सेकंदामध्ये जग नष्ट करण्याच्या ताकद निर्माण झालेली दिसून येते त्यामुळे सगळीकडे भयानक परिस्थिती निर्माण झाली. अस्थिरता , अशांतता हि दुसऱ्या महायुध्दामुळे निर्माण झाली. त्यामुळे जगामध्ये शांतता सुव्यवस्था निर्माण होण्यासाठी सर्व सामान्य व्यक्तीच्या हक्काची जपणूक होणे गरजेचे होते. या गरजुतुनच या मानवी अधिकाराची निर्मिती झाली आहे. प्रत्येक राष्ट्रामध्ये अशांतता, भिती निर्माण झाली होती व सर्वांनाच या परिस्थितीतुन याची जाणिव झाली कि सर्वांनीच शांततेचे तत्व अंगीकारल्या शिवाय इतरांच्या हक्काची जपणूक केल्याशिवाय जागतिक शांतता प्रस्थापित होणार नाही. त्यामुळेच या मानवहक्काची जपणुक होणे गरजे आहे. तसेच जन्मतःच व्यक्तीला काही हक्क असतात त्या हक्काची जपणुक होण्यासाठी मानव अधिकाराची जागतिक पातळीवर सुरुवात झाली.

दुसऱ्या महायुध्दाच्या समाप्तीनंतर संयुक्त राष्ट्र संघाची स्थापना करण्यात आली. मानवजातीच्या दृष्टीने या युध्दाचे परिणाम हे अतिशय गंभीर स्वरुपाचे होते. विज्ञान व तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे मानवाच्या हाती विध्वंसक शस्त्र अस्त्रे आली, त्यामुळे मानव जातीच्या अस्तित्वालाच धोका निर्माण झ ाला. दुसरे महायुध्दाच्या परिणामातुनच संयुक्त राष्ट्रसंघाची निर्मिती झाली. संयुक्त राष्ट्रसंघाने युध्दाच्या भयानक आपत्तीपासुन भावी पिढ्यांचे संरक्षण करणे हे प्रमुख ध्येय असल्याचे घोषित केले. मानवी हक्क आणि मुलभूत स्वातंत्र्य यांची हमी मिळाल्याशिवाय आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता यांचे संघटण होणार नाही. संयुक्त राष्ट्र संघाच्या स्थापनेच्या मुख्य उद्देश हा मानवी हक्कांचे रक्षण करुन मानवी प्रतिष्ठा अबाधित राखणे हा होय.
``संयुक्त राष्ट्राच्या आमसभेने 10 डिसेंबर 1948 रोजी पॅरिस येथे घोषणापत्र स्वीकारलेले आहे. हा मानवी हक्काचा सार्वत्रिक जाहीरनामा संमत व स्वीकृत केला . या जाहिरनाम्यामध्येच प्रस्तावनेत असे म्हटले आहे की, सर्व मानवांना समान हक्क मिळणे आणि त्यांच्या प्रतिष्ठेचे रक्षण होणे हा जगातील स्वतंत्र्य, न्याय व शांतता यांचा पाया होय.``(2) मानवी हक्काच्या जाहीरमान्यामध्ये समाजामध्ये सर्व मानव जातीला समान प्रतिष्ठा हक्क यांबाबतीमध्ये जन्मतःच सर्वांना समान स्वातंत्र्य आहे. कुठल्याही प्रकारचा भेदभाव न करता सर्वांना समानतेच्या आधारावर स्वतंत्र जीवन जगताना सर्व मुलभूत हक्काचा लाभ घेता येईल वंश, वर्ण, लिंग, भाषा, धर्म, यातुन कसल्याही प्रकारची असमानता निर्माण होणार नाही व प्रत्येकाला व्यक्तीगत सुरक्षिततेचा हक्क मिळेल. कायदा हा सर्व व्यक्तींना समान असेल सर्वांना समान संरक्षण मिळेल . पारंपारिक समाजामध्ये गुलामगिरीची पध्दत अस्तित्वात होती. त्या पध्दतीला देखील बंदी घालणे. स्त्रींना पुरुषाच्या बरोबरीने समान सर्व हक्क प्राप्त झाले पाहिजे. प्रत्येकाला त्याच्या कामाचा योग्य मोबदला मिळाला पाहिजे. प्रत्येकाला अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा हक्क आहे. सर्व जाती धर्म, पंथ यांना समान शिक्षणाचा हक्क आहे तसेच प्राथमिक शिक्षण हे सक्तीचे व मोफ त असणे गरजेचे आहे. ``मानवी हक्काच्या जाहिरनाम्यामध्ये ``संयुक्त राष्ट्राच्या मानव अधिकारांच्या आंतरराष्ट्रीय विधेयकामध्ये समानता, शिक्षण, धर्म, सामाजिक सुरक्षा, मानवी व्यवहार न्याय, आतमनिर्णयचा अधिकार उपेक्षित वर्गातील लोकांचे विशेषतः , संरक्षण, पर्यावरणाचे संरक्षण , आर्थिक आणि सांस्कृतिक उन्नतिच्या अधिकाराचा देखील यामध्ये समावेश केला आहे. ``(3)सामाजिक जीवनामध्ये व्यक्तीला समाज आणि कायद्यानुसार कोणतेही कार्य करण्यासाठी पुर्ण स्वातंत्र्यता असणे यालाच मानव अधिकार म्हटले जातो. मानव अधिार हे नैसर्गिक असतात तर काही अधिकार हे मानवाला प्राप्त करावे लागतात. हे अधिकार निश्चित करण्याचे काम हे सरकारचे असतो. प्रत्येक व्यक्तीला तो कोणत्याही जात, धर्म , वंश, लिंगचा असला तरी देखील त्याला सन्मानपुर्वक जीवन जगण्याचा पुर्ण अधिकार आहे. जगातील सर्व संस्कृती, जीवन, मुल्य आणि आदर्श यांचा आधार हे मानवअधिकारच आहेत. मानवअधिकाराचे उल्लघंन केल्यानंतर समाजामध्ये अराजिकता माजेल त्यामुळे या सर्व परिस्थिती वरती अंकुश ठेवण्यासाठी मानवधिकार गरजेचे आहे.

प्रत्येक व्यक्तीला मिळालेल्या अधिकारचा वापर स्वहितासाठी करणे आवश्यक आहे. दुसऱ्याच्या हक्कांची पायमल्ली न करता कायद्याने व समाजाने घालुन दिलेल्या नियमनानुसार व्यक्तीने समाजाने वर्तन करणे अपेक्षित आहे. जरी मानवानेच त्याला मिळालेल्या हक्काचे संरक्षण करुन त्यानुसार वर्तन करणे् अपेक्षित आहे. मानवधिकारामुळे व्यक्ती दुसऱ्याबद्दल सहिष्णुता व आदराची भावना निर्माण होते.

**निष्कर्ष :-**

- सामाजिक परिस्थितीतुनच हक्क निर्मिती होते.
- मानवाच्या गरजेमधुन व्यक्तीला त्याच्या हक्काची जाणिव होते.
- समाजामध्ये शांतता व सुव्यवस्था टिकवुन ठेवण्यासाठी मानवी हक्क उपयुक्त ठरतात.
- मानवी हक्काच्या माध्यमातुन समाजामध्ये समानता निर्माण केली जावू शकते.
- मानवी हक्कामुळे समाजातील सर्व वंचित घटकांना त्याचे हक्क मिळाले त्यामुळे या वंचित घटकांना घटकांचा विकास होण्यास मदत झाली.
- मानवी हक्कामुळे व्यक्ती दुसऱ्याच्या अधिकारावरती स्वतःहाचे वर्चस्व निर्माण करण्याचा प्रयत्न करत नाही.
- मानवी हक्कामुळे प्रत्येक व्यक्तीचा सर्वांगीण विकास होतो.
- मानवी हक्कामुळेच शिक्षण हे सर्वांना समान स्वरुपामध्ये मिळत आहे. तळागाळापर्यंत पोहण्याचे काम हे मानवी हक्कामुळे झाले आहे.

**संदर्भ :-**

1. पाटील व्हि.बी. मानवी हक्क 2012, के सागर पब्लिकेशन , पुणे पान नंबर 15.
2. https://mr.m.wikipedia.org
3. सिंह अनिता आणि यादव चंद्रेश्वर, कुरुक्षेत्र, मानवधिकार : मानवीय संवेदना का द्योतक 2006, ग्राम विकास मंत्रालय नई दिल्ली अंक - 2 पान नंबर-12.
4. पाटील शशिकांत, परदेशी आर.के., मानवी हक्क शिक्षण व विकास 2015, चिन्मय प्रकाशन औरंगाबाद.
5. देशपांडे एस.एस. मानव संसाधन विकास 2014 चेतक बुक्स प्रकाशन पुणे.

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) -0.676 Special Issue – 130 (II) | Feb. 2019 | UGC Approved No. 40705
The Role of Government to protect the Human Rights

# सामाजिक परिस्थितीमधुन मानवी हक्काची निर्मिती

डॉ. खंदारे रोहिणी विजयकुमार
(समाजशास्त्र) अंबाजोगाई .

---

सारांश :-
जागतिक शांतता आणि सुरक्षिततेसाठी मानवी हक्काची निर्मिती झाली .मानवाला काही हक्क हे निसर्गताच मिळत असतात. माणुस हा सामाजिक प्राणी असल्यामुळे समाजामधील सर्व नियमानुसार वर्तन करणे बंधनकारक असते. समाजामध्ये समानता निर्माण करणे, संस्कृतीची जपवणुक करणे, यातुनच मानवी हक्काची निर्मीती झाली आहे. जगाने स्वातंत्र्य , समता व बंधुता हे तत्व अंगीकारने काळाची गरज आहे. कारण आधुनिक काळामध्ये सर्व देशांजवळ विध्वंसक अस्त्र शस्त्राचा साठा आहे, त्यामुळे काही क्षणामध्ये संपुर्ण जग नष्ट होऊ शकते त्यामुळे मानवी हक्काचे स्वातंत्र्य, समता व बंधुता या तत्वाचा स्वीकार आज जगाने केलेला आहे व यामधुन जागतिक शांतता व सुव्यवस्था निर्माण होत आहे. ही मानवी हक्काची निर्मीती ही समाजातील परिस्थितीतुन निर्माण झालेली आहे.

आदिम काळामध्ये मानव हा इतर पशु व प्राण्याप्रमाणे वर्तन करत असे त्याच्यावर कुठल्याही प्रकारचे बंधन नव्हते, तो अनियंत्रितपणे वागत असे मानव प्राण्याच्या वर्तनामध्ये काळानुसार परिवर्तन होत गेले. आदिम काळाच्या नंतर मानव हळुहळु स्थिर होवु लागला. आदिम समाजामध्ये रोजच्या गरजांसाठी दररोज अन्नसंकलन व शिकार मार्गाचा अवलंब केला जात असे आदिम काळामध्ये समाजाच्या आर्थिक व सामाजिक घटक समानता असल्यामुळे समाजामध्ये भिन्नता आढळुन येत नाही. समाजामध्ये जसजसे परिवर्तन होवु लागले. मानवाने आपल्या मानवी बुध्दीचा वापर करुन वेगवेगळया साधनांचा शोध लावला. प्रत्येक समाजाचा विशिष्ट संस्कृती निर्माण झाली व यामधुनच मानव सामाजिक प्राणी बनला.

मानवाच्या अनेक विविध गरजांची पुर्तता हया मानवाला समाजामध्ये वास्तव्य करुनच पुर्ण कराव्या लागतात. मानवाच्या समाजातील वास्तव्यामुळेच त्याच्या व्यक्तिमत्वाची सामाजिकिरणाच्या माध्यमातुन जडणघडण होत असते. मानवी समाजाला स्थिरता प्राप्त झाल्यानंतरच मानवी समाजामध्ये विविधता निर्माण झाली, विविधतेमधुनच समाजामध्ये स्तर निर्माण झाले, यामध्ये जात, वंश, धर्म, पंथ, स्त्री , पुरुष यांच्या माध्यमातुन समाजामध्ये भिन्नता निर्माण झाले. आदिम काळामध्ये व्यक्तीला वर्तन स्वातंत्र्य होते कारण त्याकाळामध्ये मानव हा जैविक प्राणी होता. समाज व्यवस्था सुरळीत चालण्यासाठी समाजातील वेगवेगळया संस्था कार्यरत असतात. त्यांच्या माध्यमातुन मानवी समाज नियंत्रीत देखील केला जातो. मानवाला सामाजिक जीवन जगत असताना समाजामधील निर्बंधाचे पालन करणे गरजेचे असते. रुढी, परंपरा, प्रथा व कायदा यांच्या माध्यमातुन व्यक्तीचे वर्तन नियंत्रित केले जात असते. सामाजिक बंधनामुळे व्यक्तिच्या विकासामध्ये अडसर निर्माण होत नाही. सामाजिक जीवनात व्यक्तीला काही संधी किंवा सवलती मिळत असतात. या प्राप्त झालेल्या सवलतीनांच हक्क म्हणता येते.

''हक्कांची निर्मिती किंवा उद्भव सामाजिक परिस्थितीतुनच होत असतो. स्वाभाविकपणे हक्क सामाजिक गरजेतुनच उदयास येतात म्हणुन प्रा.लासकीनी हक्कांना सामाजिक परिस्थितीचे घटक असे संबोधले आहे. `` 1)

मानव अधिकार हे व्यक्तीला जन्मत:च असतात. मानवी समाजामध्ये व्यक्तीला जरी जन्मत:च स्वातंत्र्य असले तरी व्यक्तीला या हक्काची जाणीव होणे गरजेचे आहे. मानवाच्या सर्वांगीण विकासासाठी हक्क महत्वाचे असतात. हक्कांशिवाय मानव प्रगती होवु शकत नाही.म नवाच्या सर्वांगीण विकासासाठी हक्क आवश्यक असतात. मानवी हक्क हे मानवजातीच्या सर्व घटकांना समान पध्दतीचे असतात.

**मानवी हक्काची निर्मीती :-**

मानवी समाजामधील अशांतता दुर करण्यासाठी मानवी हक्काची गरज असते. मानवी हक्काच्या माध्यमातुन समाजामध्ये समानता निर्माण केली जावु शकते. समाजामध्ये जातींच्या माध्यामातुन असमानता आहे तसेच धर्मांच्या, गरिब श्रीमंत तसेच स्त्री पुरुष भेद या सर्व माध्यमातुन समाजामध्ये असमानता निर्माण होते. यामुळे सतत एका वर्गाचे दुसऱ्या वर्गावरती वर्चस्व गाजवण्याचा प्रयत्न केला जातो, त्यामुळे त्यामधुन दुसऱ्याच्या हक्काची पायमल्ली होते. समाजामध्ये या वर्चस्वाच्या माध्यमातुन शोषक आणि शोषीत हे दोन वर्ग निर्माण होतात. पितृसत्ताक कुटूंब पध्दतीच्या माध्यमातुन फार पूर्वीपासून पुरुष स्त्री वरती वर्चस्व गाजवतो व तिच्या हक्काची पायमल्ली करतो त्यामुळे सतत स्त्रियांचे शोषण केले जाते. जाती भेदानुसार समाजामध्ये श्रेष्ठ व कनिष्ठ जाती भेद असल्यामुळे श्रेष्ठ जाती कनिष्ठ जातीच्या व्यक्तीवरती अन्याय अत्याचार करतात त्यामुळे त्यांच्या हक्काचा वापर त्यांच्या विकासासाठी त्यांना पुरक नाही. समाजामध्ये असणारे दोन वर्ग यातुनच दुसऱ्यांचे शोषण केले जाते व यातुनच समाजामध्ये असमानता व अशांतता निर्माण होते.

युरोपमध्ये सरंजामशाही पध्दती होती सरंजामशाही पध्दतीमध्ये गरीब, शेतकरी, शेतमजुर लहान व्यवसाय करणारे त्रस्त झाले होते. धर्मगुरु, अमीर-अमराव व सरंजामदार यांच्या सामाजिक आणि आर्थिक शोषणाला कंटाळुन गेले होते. 13,14 व 15 च्या शतकांमध्ये वैचारिक युगाची निर्मिती झाली पश्चिम युरोपमधील इटली, जर्मनी, फ्रान्स, इंग्लंड या देशात देशात प्रबोधन घडुन आले. हळुहळु हि प्रक्रिया युरोप खंडामध्ये पसरली, याचा परिणाम स्वरुप अमेरिकेची क्रांती, फ्रेंच क्रांती, घडुन आल्या. फ्रेंच राज्यक्रांती ही जागतिक युग प्रवर्तक घटना होय. फ्रेंच राज्यक्रांतीने स्वातंत्र्य, समाता आणि बंधुत्व ही वैश्विक मुल्ये संपुर्ण मानवी समाजाला दिली. मांनवी हक्क हे मानवाच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक आहेत त्यामुळे मानवी हक्क व्यक्तीच्या जडणघडमध्ये महत्वाची भुमिका पार पाडतात. व्यक्तीचा अंतरिक विकास व भौतिक यांचा आधार हे मानवी हक्कच असतात. फ्रेंच राज्यक्रांतीसोबत युरोपमध्ये औद्योगिक क्रांतीदेखील झाली. यामुळे वेगवेगळया उद्योग धंदयाची निर्मिती झाली नवनवीन शोध लागले व यातुन सामाजिक व आर्थिक परिस्थिती बदलली, याच दरम्यान पहिले महायुध्द 1914-17 च्या दरम्यान सुरु होते, त्यामुळे आर्थिक व सामाजिक नुकसान झाले. यातुन अशांतता निर्माण झाली. या अशांततेतुनच 1939 ते 45 च्या दरम्यान दुसरे जागतिक महायुध्द झाले . या युध्दामध्ये मानव हानी, फार मोठया प्रमाणावर झाली. अणुबॉम्बच्या साहाय्याने सर्व सामान्य जनतेला देखील यामध्ये सहभागी करुन घेतले होते. दुसऱ्या महायुध्दामध्ये प्रत्येकावर संकट निर्माण झाले होते. या दुसऱ्या महायुध्दामुळे मानव हानी व वित्त हानी फार मोठया प्रमाणावर झाली होती. यातुनच जागतिक अशांतता निर्माण झाली होती .

जगातील सर्वच राष्ट्रामध्ये सेकंदामध्ये जग नष्ट करण्याच्या ताकद निर्माण झालेली दिसुन येते त्यामुळे सगळीकडे भयावह परिस्थिती निर्माण झाली. अस्थिरता , अशांतता हि दुसऱ्या महायुध्दामुळे निर्माण झाली. त्यामुळे जगामध्ये शांतता सुव्यवस्था निर्माण होण्यासाठी सर्व सामान्य व्यक्तीच्या हक्काची जपणुक होणे गरजेचे होते. या गरजुतुनच या मानवी अधिकाराची निर्मिती झाली आहे. प्रत्येक राष्ट्रामध्ये अशांतता, भिती निर्माण झाली होती व सर्वांनाच या परिस्थितीतुन याची जाणिव झाली कि सर्वांनीच शांततेचे तत्व अंगीकारल्या शिवाय इतरांच्या हक्काची जपणुक केल्याशिवाय जागतिक शांतता प्रस्थापित होणार नाही, त्यामुळेच या मानवहक्काची जपणुक होणे गरजे आहे. तसेच जन्मत:च व्यक्तीला काही हक्क असतात त्या हक्काची जपणुक होण्यासाठी मानव अधिकाराची जागतिक पातळीवर सुरुवात झाली.

दुसऱ्या महायुध्दाच्या समाप्तीनंतर संयुक्त राष्ट्र संघाची स्थापना करण्यात आली. मानवजातीच्या दृष्टीने या युध्दाचे परिणाम हे अतिशय गंभीर स्वरुपाचे होते. विज्ञान व तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे मानवाच्या हाती विध्वंसक शस्त्र अस्त्रे आली, त्यामुळे मानव जातीच्या अस्तित्वालाच धोका निर्माण झाला. दुसरे महायुध्दाच्या परिणामातुनच संयुक्त राष्ट्रसंघाची निर्मिती झाली. संयुक्त राष्ट्रसंघाने युध्दाच्या भयानक आपत्तीपासुन भावी पिढयांचे संरक्षण करणे हे प्रमुख ध्येय असल्याचे घोषित केले. मानवी हक्क आणि मुलभूत स्वातंत्र्य यांची हमी मिळाल्याशिवाय आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता यांचे संघटण होणार नाही. संयुक्त राष्ट्र संघाच्या स्थापनेच्या मुख्य उद्देश हा मानवी हक्कांचे रक्षण करुन मानवी प्रतिष्ठा अबाधित राखणे हा होय. ``संयुक्त राष्ट्राच्या आमसभेने 10 डिसेंबर 1948 रोजी पॅरिस येथे घोषणापत्र स्वीकारलेले आहे. हा मानवी हक्काचा सार्वत्रिक जाहीरनामा संमत व स्वीकृत केला . या जाहिरनाम्यामध्येच प्रस्तावनेत असे म्हटले आहे की, सर्व मानवांना समान हक्क मिळणे आणि त्यांच्या प्रतिष्ठेचे रक्षण होणे हा जगातील स्वतंत्र्य, न्याय व शांतता यांचा पाया होय.``(2) मानवी हक्काच्या जाहीरमान्यामध्ये समाजामध्ये सर्व मानव जातीला समान प्रतिष्ठा हक्क यांबाबतीमध्ये जन्मत:च सर्वांना समान स्वातंत्र्य आहे. कुठल्याही प्रकारचा भेदभाव न करता सर्वांना समानतेच्या आधारावर स्वतंत्र्य जीवन जगताना सर्व मुलभूत हक्काचा लाभ घेता येईल वंश, वर्ण, लिंग, भाषा, धर्म, यातुन कसल्याही प्रकारची असमानता निर्माण होणार नाही व प्रत्येकाला व्यक्तीगत सुरक्षिततेचा हक्क मिळेल. कायदा हा सर्व व्यक्तींना समान असेल सर्वांना समान संरक्षण मिळेल . पारंपारिक समाजामध्ये गुलामगिरीची पध्दत अस्तित्वात होती. त्या पध्दतीला देखील बंदी घालणे. स्त्रींना पुरुषाच्या बरोबरीने समान सर्व हक्क प्राप्त झाले पाहिजे. प्रत्येकाला त्याच्या कामाचा योग्य मोबदला मिळाला पाहिजे. प्रत्येकाला अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा हक्क आहे. सर्व जाती धर्म, पंथ यांना समान शिक्षणाचा हक्क आहे तसेच प्राथमिक शिक्षण हे सक्तीचे व मोफत असणे गरजेचे आहे. ``मानवी हक्काच्या जाहिरनाम्यामध्ये ``संयुक्त राष्ट्राच्या मानव अधिकाराच्या आंतरराष्ट्रीय विधेयकामध्ये समानता, शिक्षण, धर्म, सामाजिक सुरक्षा, मानवी व्यवहार न्याय, आत्मनिर्णयचा अधिकार उपेक्षित वर्गातील लोकांचे विशेषत: , संरक्षण, पर्यावरणाचे संरक्षण , आर्थिक आणि सांस्कृतिक उन्नतिच्या अधिकाराचा देखील यामध्ये समावेश केला आहे. ``(3)सामाजिक जीवनामध्ये व्यक्तीला समाज आणि कायद्यानुसार कोणतेही कार्य करण्यासाठी पुर्ण स्वातंत्र्यता असणे यालाच मानव अधिकार म्हटले जाते. मानव अधिार हे नैसर्गिक असतात तर काही अधिकार हे मानवाला प्राप्त करावे लागतात. हे अधिकार निश्चित करण्याचे काम हे सरकारचे असते. प्रत्येक व्यक्तीला तो कोणत्याही जात, धर्म , वंश, लिंगचा असला तरी देखील त्याला सन्मानपुर्वक जीवन जगण्याचा पुर्ण अधिकार आहे. जगातील सर्व संस्कृती, जीवन, मुल्य आणि आदर्श यांचा आधार हे मानवअधिकारच आहेत. मानवअधिकाराचे उल्लघंन केल्यानंतर समाजामध्ये अराजकता माजेल त्यामुळे या सर्व परिस्थिती वरती अंकुश ठेवण्यासाठी मानवधिकार गरजेचे आहे.

प्रत्येक व्यक्तीला मिळालेल्या अधिकारचा वापर स्वहितासाठी करणे आवश्यक आहे. दुसऱ्याच्या हक्कांची पायमल्ली न करता कायद्याने व समाजाने घालुन दिलेल्या नियमनानुसार व्यक्तीने समाजाने वर्तन करणे अपेक्षित आहे. जरी मानवानेच त्याला मिळालेल्या हक्काचे संरक्षण करुन त्यानुसार वर्तन करणे अपेक्षित आहे. मानवधिकारामुळे व्यक्ती दुसऱ्याबद्दल सहिष्णुता व आदराची भावना निर्माण होते.

## निष्कर्ष :-

- सामाजिक परिस्थितीतुनच हक्क निर्मिती होते.
- मानवाच्या गरजेमधुन व्यक्तीला त्याच्या हक्काची जाणिव होते.
- समाजामध्ये शांतता व सुव्यवस्था टिकवुन ठेवण्यासाठी मानवी हक्क उपयुक्त ठरतात.
- मानवी हक्काच्या माध्यमातुन समाजामध्ये समानता निर्माण केली जावू शकते.
- मानवी हक्कामुळे समाजातील सर्व वंचित घटकांना त्याचे हक्क मिळाले त्यामुळे या वंचित घटकांना घटकांचा विकास होण्यास मदत झाली.
- मानवी हक्कामुळे व्यक्ती दुसऱ्याच्या अधिकारावरती स्वत:हाचे वर्चस्व निर्माण करण्याचा प्रयत्न करत नाही.
- मानवी हक्कामुळे प्रत्येक व्यक्तीचा सर्वांगीण विकास होतो.
- मानवी हक्कामुळेच शिक्षण हे सर्वांना समान स्वरुपामध्ये मिळत आहे. तळागळापर्यंत पोहण्याचे काम हे मानवी हक्कामुळे झाले आहे.

## संदर्भ :-

1. पाटील व्हि.बी. मानवी हक्क 2012, के सागर पब्लिकेशन , पुणे पान नंबर 15.
2. https://mr.m.wikipedia.org
3. सिंह अनिता आणि यादव चंद्रेश्वर, कुरुक्षेत्र, मानवधिकार : मानवीय संवेदना का द्योतक 2006, ग्राम विकास मंत्रालय नई दिल्ली अंक - 2 पान नंबर-12.
4. पाटील शशिकांत, परदेशी आर के, मानवी हक्क शिक्षण व विकास 2015 [illegible]

## Dr. Surewad Sanjay Gangaram

**Asst. Profe Dept. of Sociology**


# Publications:

Articles/Research Paper Published in Journals:

| Sr. No. | Article/ Research Paper | Jouranl/ Book | National/ International | ISSN/ISBN | Impact Factor | Editor/Publisher | Year |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **2017-2018** | | | | | | | |
| 1. | बीड जिल्ह्यातील स्त्रीभ्रुण हत्या : एक समाजशास्त्रीय अभ्यास | NEW INTERNATIONL EMERGENT RESEARCH JOURNAL UGC Approved List No. 63847 | Internationl | ISSN No. 2393-834X | | Chief Editor Asst. Prof. A.V. Hingmire Prathmesh Prakashan, Aurangabad | 2017-2018 No. 4 Isssue No. : 01 feb. 2018 |
| 2. | पर्यटनातुन ग्रामीण विकास: एक समाजशास्त्रीय अभ्यास विशेष संदर्भ : ग्रामीण महाराष्ट्र | NEW INTERNATIONAL RELIABLE RESEARCH JOURNAL UGC Approved List. 63613 | International | ISSN No. : 2320-9410 | | Chief Editor Asst. Prof. A.V. Hingmire Prathmesh Prakashan, Aurangabad | 2017.2018 No. 6 Isssue No. : 02 feb. 2018 |
| 3. | औष्णिक विद्युत प्रकल्पाचा परळी शहरावर झालेला परिणाम | NEW INTERNATIONAL RELIABLE RESEARCH JOURNAL UGC Approved List. 63613 | International | ISSN No. : 2320-9410 | | Chief Editor Asst. Prof. A.V. Hingmire Prathmesh Prakashan, Aurangabad | 2017-2018 No. 6 Issue No. : 4 Apr. 2018 |
| 4. | नायकडा : एक आदिवासी जमात | NEW INTERNATIONAL CREATIVE RESEARCH JOURNAL UGC Approved List. 63881 | International | ISSN No.: 2393-8323 | | Chief Editor Asst. Prof. A.V. Hingmire Prathmesh Prakashan, Aurangabad | 2017-2018 Vol No. 4 Issue No.: 1 Apr. 2018 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 5. | जागतिकीकरणातील आदिवासी कविता | रयत शिक्षण संस्थेचे, महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, पनवेल. जि रायगड ४१०२०६ मराठी विभाग आयोजित एक दिवसीय आंतरराष्ट्रीय चर्चासत्र जागतिकीकरण आणि मराठी साहित्य प्रवाह दि. २८ मार्च २०१८ शोधनिबंध पुस्तिका | International | ISBN No. 978-93-5311-692-7 | | संपादक प्रा. चितामण धिंदळे मराठी विभाग प्रमुख, रयत शिक्षण संस्थेचे, महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, पनवेल. जि रायगड ४१०२०६ | 2017-2018 |
| **2018-2019** | | | | | | | |
| 6. | आदिवासी जमात व शासनाच्या कल्याणकारी योजना | INTERNATIONAL RESEARCH ASSOCIATION'S RESEARCH JOURNEY UGC Approved Multidiciplinary international E-research journal PEER REFREED & INDEXED JOURNAL | International | ISSN-2348-7143 | 6.261 | Chief Editor Dr. Dhanraj T. Dhangar Assist. Prof (Marathi) MGV'S Arts & Commerce College] Yeola, Dist. Nashik (M.S.) India | 2018-2019 28th January 2019 Special Issue-106 |
| 7. | आदिवासी जमाती व मानवी हक्क | INTERNATIONAL RESEARCH FELLOW ASSOCIATION'S RESEARCH JOURNEY UGC Approved Multidiciplinary international E-research journal PEER REFREED & INDEXED JOURNAL | International | ISSN-2348-7143 | 6.261 | Chief Editor Dr. Dhanraj T. Dhangar Assist. Prof (Marathi) MGV'S Arts & Commerce College] Yeola, Dist. Nashik (M.S.) India | 2018- 2019 18th Feb. 2019 Special Issue-130 (II) |
| **2019-2020** | | | | | | | |
| **2020-2021** | | | | | | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | चार्लस हर्टन कुले यांची प्राथमिक गटातील कुटुंबाची संकल्पना आणि एकविसाव्या शतकातील कुटुंबाची सदयस्थिती | POWER OF KNOWLEDGE An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal | International | ISSN-2320-4494 | 2.728 6 | Editor Professor Dr. Sadashiv H. Sarkate | 2020- 2021 Special Issue IV Jan. 2021 |
| 9 | आदिवासी लोकसाहित्यातील स्त्री – जीवनाचा समाजशास्त्रीय अभ्यास पृ.क्र. ११३–११६ | INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S RESEARCH JOURNEY International E-Research Journal PEER REFREED & INDEXED JOURNAL SPECIAL ISSUE 259 (B) | International | E-ISSN-2348-7143 | 6.625 | वैश्विक परिदृश्य में भारतीय भाषांए, संस्कृती और साहित्य की पारस्पारिकता Chief Editor : Dr. Dhanraj T. Dhangar | 2020-2021 January 2021 |
| 10 | भारतातील आदिवासी जमातीच्या लोकसंख्येचा समाजशास्त्रीय अभ्यास | POWER OF KNOWLEDGE An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal | International | ISSN-2320-4494 | 2.728 6 | Editor Professor Dr. Sadashiv H. Sarkate | 2020- 2021 VOLUME – I ISSUE-I April to June 2021 |
| **2021-2022** | | | | | | | |
| 11 | पर्यावरणाचा समतोल आणि आदिवासी समुदाय: एक समाजशास्त्रीय अभ्यास | Worldwide International Inter Disciplinary Research Journal (A Peer Reviewed Year- 6 | International | ISSN : 2454-7905 | 6.91 | Editor : Dr. Dharampurikar Bhalchandra Vaijanartrao | 2021-2022 Vol. I, Special Issue-XXXI, 5June 2021 |
| 12 | स्त्रीभ्रुण हत्या : एक सामाजिक समस्या | AN INTERNATIONAL | International | ISSN | | Ajanta Prakahan | 2021- |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | MULTIDISCIPLINARY QUARTERLY RESEARCH JOURNAL Peer Reviewed Refereed and UGC Listed (Journal No. 7100) | | 2279-0489 | | | 2022 VOLUME-X, ISSUE-I AUGUST – JANUARY-2021-22 |
| 13 | यशवंतराव चव्हाण : शैक्षणिक आणि सामाजिक योगदान<br>पृ.क. १५० – १५२ | B.Aadhar Peer- Reviewed & Refereed Indexed Multidisciplinary International Research Journal ISSUE No.-(CCXCIX)299 | International | ISSN-2278-9308 | 7.675 | Chief Editor Prof. Virag S. Gawande | 2021-2022<br>July 2021 |
| 14 | स्त्रीभ्रुण हत्या : एक सामाजिक समस्या<br>पृ.क. १०९–१११ | B.Aadhar Peer- Reviewed & Refereed Indexed Multidisciplinary International Research Journal ISSUE No.- (CCXXII) 322 | International | ISSN-2278-9308 | 7.675 | 21 व्या शतकातील कोरोना महामारीच्या काळात सध्यस्थितीत निर्माण झालेल्या समकालीन सामाजिक समस्या<br>Chief Editor Prof. Virag S. Gawande | 2021-2022<br>October-2021 |
| 15 | औष्णिक विदयुत प्रकल्प आणि पर्यावरण<br>पृ.क. १७२–१७५ | पर्यावरणी समस्या | Natioal | | | पर्यावरणी समस्या<br>संपादक डॉ. वसंत सातपुतेए डॉ. सुनिता टेंगसें, डॉ. मुकुंदराज पाटिल | 2021-2022 |
| 16 | पारपांरिक भारतीय आदिवासी समुदायातील लोककथेचा समाजशास्त्रीय अभ्यास<br>पृ.क. २८–३३ | POWER OF KNOWLEDGE An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal | International | ISSN-2320-4494 | 2.728 6 | Editor Professor Dr. Sadashiv H. Sarkate | 2021-2022 Special Issue IV August 2021 |
| 17 | भारतातील महिला आणि कौटुंबिक हिंसाचार<br>पृ.क. १०३–१०८ | | National | ISBN 978-93-91988-09-07 | | भारतीय स्त्री काल, आज आणि उद्या<br>संपादक डॉ. तुकाराम फिसफिसे डॉ. विश्वनाथ सूर्यवंशी | 2021-2022 |
| 18 | जातीव्यवस्था व अस्पृश्सतर – डॉ. बाबासाहेब आंबेडकर<br>पृ. क. ६३–६५ | B.Aadhar Peer- Reviewed & Refereed Indexed Multidisciplinary International Research Journal ISSUE No.- | International | ISSN-2278-9308 | 8.575 | Role of Social Sciences in Contemporary Society<br>Chief Editor Prof. Virag S. Gawande | 2021-2022<br>May 2022 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | (CCXCLIX)B | | | | | |
| 19 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भारतीय समाजातील अस्पृश्यता व धर्माच्या संदर्भात समाजशास्त्रातील योगदान पृ. क. ६६–६८ | Worldwide International Inter Disciplinary Research Journal ( A Peer Reviewed) Year-7 Vol. I Issue-L | International | ISSN :2454-7905 | 7.479 | Yugpurush Dro. Babasaheb Ambedkar Editor in Chieg : Principal Dr. Vasant Biradar | 2021-2022 07 April 2022 |
| 20 | महाराष्ट्रातील कृषी व्यवसायातील उच्च शिक्षणाची स्थिती : आव्हाने आणि उपाय पृ. क. ५०–५६ | | National | ISBN | | समकालीन भारतीय समाज आणि उपाय सपांदक प्राचार्य डॉ बाळासाहेब जाधव | 2021-2022 |
| 21 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भारतीय समाजशास्त्रातील योगदान पृ. क. ३६–४० | | International | ISBN 978—93-5635-932-1 | | फुले आंबेडकरी तत्वज्ञान संपादक – डॉ संदीप वनसोडे | 2021-2022 30 April 2022 |
| **2022-2023** | | | | | | | |
| 22 | राजर्षी शाहू महाराजांचे यांची सामाजिक न्याय संकल्पना पृ.क्र.१३८.१४२ | MANAVLOK RESEARCH BULLETIN ( A Quarterly Peer Reviewed Journal) Special Issue- I | International | ISSN-2349-3984 | 5.686 | Contribution of Chhatrapati Rajarshi Shahu Maharaj in Social Development Editors. : Dr. Prakash Jadhav Principal M. College of Social Work Ambajogai | 2022-2023 |
| 23 | शिवकालीन समाजव्यवस्थेचा समाजशास्त्रीय अभ्यास पृ. क. २५–२९ | तिफण वर्ष : १३ वे अंक १ ला एप्रिल–मे–जूल २०२२ UGC Care Listed Journal | International | ISSN 2231–573X | | कुळवाडीकर छत्रपती शिवाजी महाराज विशेषांक | तिफण वर्ष : १३ वे अंक १ ला एप्रिल–मे–जूल २०२२ |
| 24 | | | | | | | |